# इतिहास व राज्यशास्त्र

## इयत्ता नववी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक ३.३.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# इतिहास व राज्यशास्त्र

## इयत्ता नववी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

EPC4CN

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q.R.Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१७
पुनर्मुद्रण : ऑक्टोबर २०२०

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**इतिहास विषय समिती**

डॉ. सदानंद मोरे, अध्यक्ष
श्री. मोहन शेटे, सदस्य
श्री. पांडुरंग बलकवडे, सदस्य
श्री. बापूसाहेब शिंदे, सदस्य
श्री. बाळकृष्ण चोपडे, सदस्य
श्री. प्रशांत सरूडकर, सदस्य
श्री. मोगल जाधव, सदस्य-सचिव

**नागरिकशास्त्र विषय समिती**

डॉ. श्रीकांत परांजपे, अध्यक्ष
प्रा. साधना कुलकर्णी, सदस्य
डॉ. मोहन काशीकर, सदस्य
श्री. वैजनाथ काळे, सदस्य
श्री. मोगल जाधव, सदस्य-सचिव

**इतिहास व नागरिकशास्त्र अभ्यास गट**

| | |
|---|---|
| श्री. राहुल प्रभू | डॉ. रावसाहेब शेळके |
| श्री. संजय वझरेकर | श्री. मरीबा चंदनशिवे |
| श्री. सुभाष राठोड | श्री. संतोष शिंदे |
| सौ. सुनीता दळवी | डॉ. सतीश चापले |
| डॉ. शिवानी लिमये | श्री. विशाल कुलकर्णी |
| श्री. भाऊसाहेब उमाटे | श्री. शेखर पाटील |
| डॉ. नागनाथ येवले | श्री. संजय मेहता |
| श्री. सदानंद डोंगरे | श्री. रामदास ठाकर |
| श्री. रवींद्र पाटील | डॉ. अजित आपटे |
| श्री. विक्रम अडसूळ | डॉ. मोहन खडसे |
| सौ. रूपाली गिरकर | सौ. शिवकन्या कदेरकर |
| डॉ. मिनाक्षी उपाध्याय | श्री. गौतम डांगे |
| सौ. कांचन केतकर | डॉ. व्यंकटेश खरात |
| सौ. शिवकन्या पटवे | श्री. रविंद्र जिंदे |
| डॉ. अनिल सिंगारे | डॉ. प्रभाकर लोंढे |

**लेखक**

डॉ.गणेश राऊत, डॉ. वैभवी पळसुले

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री.मुकीम शेख

**नकाशाकार**

श्री. रविकिरण जाधव

**अक्षरजुळणी**

मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**कागद :** ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश :** N/PB/2021-22/Qty.- 75,000

**मुद्रक :** M/s. Adarsha Vidyarthi Prakashan, Pune

**संयोजक**

श्री. मोगल जाधव
विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र
सौ. वर्षा सरोदे
सहायक विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती**

श्री. सच्चितानंद आफळे,
मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. प्रभाकर परब,
निर्मिती अधिकारी
श्री. शशांक कणिकदळे,
सहायक निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

श्री. विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो,

इतिहास इयत्ता नववीच्या पाठ्यपुस्तकात इ.स. १९६१ ते २००० पर्यंतच्या कालावधीचा समावेश असणारे हे पुस्तक तुमच्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो. इतिहासाचा अभ्यासक्रम अधिकाधिक अद्ययावत करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणजे हे पाठ्यपुस्तक आहे.

या पाठ्यपुस्तकात इ.स. १९६१ नंतरच्या काळात भारतात झालेल्या, सामाजिक, सांस्कृतिक आणि अन्य क्षेत्रांतील विकासाचा आढावा घेण्यात आला आहे. अर्थात हा आढावा परिपूर्ण नाही याचेही भान बाळगणे आवश्यक आहे. पाठ्यपुस्तकाला असणाऱ्या पृष्ठांची मर्यादा लक्षात घेऊन हा साधारणपणे चाळीस वर्षांचा धावता आढावा घेण्यात आला आहे. उद्योग आणि शेती यांचा समावेश असलेल्या भारताच्या आर्थिक धोरणांची विज्ञान आणि तंत्रज्ञानातील बदलांची, महिलांच्या सक्षमीकरणाची आणि समाजातील शेवटच्या घटकांशी संबंधित अशा विकासाच्या घटनांची नोंद या पुस्तकात आहे. शिक्षण क्षेत्राची वाटचाल आणि बदलता भारत यांवर हे पुस्तक प्रकाश टाकते. हा विषय नीट समजावा म्हणून नकाशा, चित्रे, आकडेवारी आणि पूरक चौकटी यांचा वापर केला आहे. याशिवाय विविध उपक्रम सुचवलेले आहेत.

या पाठ्यपुस्तकाद्वारे तुम्ही भविष्यातील स्पर्धा परीक्षांचा अभ्यास व इतिहासाच्या क्षेत्रातील उच्च शिक्षण यांचा पाया रचू शकता. तुमचे पालक या इतिहासाचे साक्षीदार आहेत. त्यांच्याकडून तुम्ही पाठ्यपुस्तक अधिक विस्ताराने समजून घेऊ शकाल.

राज्यशास्त्र विषयाच्या अंतर्गत १९४५ पासूनचे जगातील प्रमुख प्रवाह, भारताच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल, भारताची सुरक्षा व्यवस्था व भारतीय सुरक्षा व्यवस्थेपुढील आव्हाने यांचा अभ्यास करायचा आहे. भारत आणि अन्य देशांचे राजकीय संबंध, संयुक्त राष्ट्रे आणि संयुक्त राष्ट्रांच्या शांततारक्षण कार्यात भारताचे योगदान इत्यादी विषयांची चर्चा करण्यात आली आहे.

तसेच मानवी हक्क संरक्षण, पर्यावरण संरक्षण आणि दहशतवाद यांसारख्या काही आंतरराष्ट्रीय समस्यांची ओळख प्रस्तुत पाठ्यपुस्तकात करून देण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील सर्व प्रकारच्या घडामोडींचे आकलन करून घेण्यासाठी प्रस्तुत पाठ्यपुस्तकातील आशय उपयुक्त ठरणार आहे.

इतिहासाच्या अभ्यासाने भूतकाळाचे आकलन होते आणि वर्तमानाचे भान येते. राज्यशास्त्राच्या अभ्यासाने भविष्यात आपणांस कोणत्या दिशेने वाटचाल करायची आहे हे कळते. त्यासाठीच हे संयुक्त पाठ्यपुस्तक आधार ठरणार आहे.



**(डॉ.सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २८ एप्रिल २०१७, अक्षय्य तृतीया
भारतीय सौर दिनांक : ८ वैशाख १९३९

# - शिक्षकांसाठी -

सर्वप्रथम मी तुमचे अभिनंदन करतो की तुम्ही इतिहास या विषयाचे अध्यापन आणि अध्ययन करत आहात. यावर्षी सन १९६१ ते २००० पर्यंतचा कालखंड आपणांस इयत्ता नववीच्या पुस्तकातून शिकवायचा आहे. हे पुस्तक शिकवणे तुमच्यासाठी अधिक आनंददायी असणार आहे कारण या पुस्तकातील काही घटनांचे तुम्ही साक्षीदार आहात. ज्या घटना तुमच्या भोवताली घडल्या त्याच घटनांचा समावेश या पुस्तकात केलेला आहे. पुनः एकदा तो काळ तुमच्यासाठी जिवंत होणार आहे.

हा भारताचा सर्वंकष इतिहास आहे. पाठ्यपुस्तकाला असणाऱ्या पृष्ठांची मर्यादा लक्षात घेऊन चाळीस वर्षांचा सलग आणि सगळा इतिहास पाठ्यपुस्तकात मांडणे हे अवघड काम आहे. विद्यार्थ्यांचा वयोगट लक्षात घेऊन त्यांना भावणाऱ्या घटनांचा समावेश या पुस्तकात करण्याचा प्रयत्न केला आहे. काही ठळक घटना आधारासाठी घेऊन अन्य घटनांची माहिती आपण विद्यार्थ्यांना आंतरजालाच्या साहाय्याने समजून घेण्यास प्रवृत्त करू शकतो.

या पाठ्यपुस्तकाचा मध्यवर्ती आशय-नुकताच स्वतंत्र झालेला देश विकासाकडे कशी वाटचाल करतो हा आहे. जगातील सगळ्यांत मोठी लोकशाही यंत्रणा राबवणारा हा देश आहे. या देशाच्या वाटचालीत राजकीय नेतृत्व, प्रशासकीय नेतृत्व आणि वैज्ञानिक, शिक्षणतज्ज्ञ, कलावंत यांचे काय योगदान आहे हे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. याच्याच जोडीला भारतीय नागरिकांची लोकशाहीवर असणारी श्रद्‌धा आणि तिच्या रक्षणासाठी येथील सर्वसामान्य जनतेने दिलेला लढा हा या पुस्तकातील महत्त्वाचा भाग आहे. व्यक्तीपेक्षा समाज श्रेष्ठ आहे. राजकीय नेतृत्वापेक्षा देश मोठा आहे. हाच संदेश स्वातंत्र्योत्तर भारतात जनतेने दिला आहे. घटनांच्या मागे असणारा आशय विद्यार्थ्यांसमोर पोचवणे हे एक मोठे आव्हान आपणासमोर आहे. सध्याच्या काळातील आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने हे आव्हान शिक्षकवर्ग सहज पेलू शकेल असा विश्वास वाटतो.

आपण जो काळ अनुभवला तोच शिकवणे हे कार्य प्रथमच होणार आहे. हे एक ऐतिहासिक कार्य आहे. स्वातंत्र्योत्तर भारताच्या जडणघडणीत आपणही योगदान देऊ शकतो हे महत्त्वाचे तत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवण्यासाठी हे पाठ्यपुस्तक उपयुक्त ठरेल. यासाठी नकाशा, चित्रे, चौकटी आणि उपक्रम ही साधने वापरायची आहेत; पण आपले साध्य मात्र 'सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ताँ हमारा' हा आशय विद्यार्थ्यांसमोर प्रभावीपणे मांडणे हेच आहे.

राज्यशास्त्र विषयांतर्गत आपण या इयत्तेत 'भारत आणि जग' यांच्यातील परस्परसंबंधाचा आढावा घेणार आहोत. आधुनिक काळात जागतिक आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील घडामोडींचा परिणाम सर्वच देशांवर होतो. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील प्रगतीमुळे राष्ट्रांमधील व्यवहार आणि देवाणघेवाण वाढली आहे. भारत केंद्रस्थानी ठेवून या गुंतागुंतीच्या आंतरराष्ट्रीय संबंधांची जाण आपणांस विद्यार्थ्यांना करून द्यायची आहे. त्याची सुरुवात अर्थातच नजीकच्या इतिहासातील महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय घडामोडी आणि प्रवाह यांच्या आकलनाद्‌वारे करून द्यावी लागेल. प्रस्तुत पाठ्यपुस्तकातील आशय नवीन आहे. त्याची सहजपणे उकल व्हावी म्हणून आशयाची मांडणी ज्ञानरचनावादी दृष्टीने केली आहे. विषयात रस निर्माण होण्यासाठी आशय वेगळ्या पद्‌धतीने मांडला आहे. आंतरराष्ट्रीय संबंध समजून घेण्याचा प्रयत्न विद्यार्थी प्रथमतःच करत असल्याने शिक्षकांनी अध्यापन करताना वैविध्यपूर्ण, अपारंपरिक अशा स्रोतांचा आधार घ्यावा. अशा पद्‌धतींच्या परिणामकारक उपयोजनाला प्रस्तुत पाठ्यपुस्तकात भरपूर वाव आहे. जागतिक शांतता व सुरक्षिततेचे जतन, मानवी हक्कांबाबतचा आदर, शांती व परस्परांवरील विश्वास या मूल्यांवरचा आणि त्या अनुषंगाने होणाऱ्या कृतींवरचा विश्वास दृढ करण्याचा प्रयत्न शिक्षक करतील अशी अपेक्षा आहे.

# अनुक्रमणिका

## स्वातंत्र्योत्तर भारत
## (इ.स.१९६१ ते इ.स.२०००)


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | इतिहासाची साधने ........................... | १ |
| २. | भारत : १९६० नंतरच्या घडामोडी ............ | ५ |
| ३. | भारतापुढील अंतर्गत आव्हाने ................. | १० |
| ४. | आर्थिक विकास ............................. | १५ |
| ५. | शैक्षणिक वाटचाल .......................... | २३ |
| ६. | महिला व अन्य दुर्बल घटकांचे सक्षमीकरण..... | ३१ |
| ७. | विज्ञान व तंत्रज्ञान .......................... | ३७ |
| ८. | उद्योग व व्यापार .......................... | ४३ |
| ९. | बदलते जीवन : भाग १ ....................... | ४७ |
| १०. | बदलते जीवन : भाग २ ....................... | ५२ |



**S.O.I. Note :** The following foot notes are applicable : (1) © Government of India, Copyright : 2017. (2) The responsibility for the correctness of internal details rests with the publisher. (3) The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. (4) The administrative headquarters of Chandigarh, Haryana and Punjab are at Chandigarh. (5) The interstate boundaries amongst Arunachal Pradesh, Assam and Meghalaya shown on this map are as interpreted from the "North-Eastern Areas (Reorganisation) Act. 1971," but have yet to be verified. (6) The external boundaries and coastlines of India agree with the Record/Master Copy certified by Survey of India. (7) The state boundaries between Uttarakhand & Uttar Pradesh, Bihar & Jharkhand and Chattisgarh & Madhya Pradesh have not been verified by the Governments concerned. (8) The spellings of names in this map, have been taken from various sources.


# क्षमता विधाने


| क्र. | घटक | क्षमता |
| --- | --- | --- |
| १. | इतिहासाची साधने | □ ऐतिहासिक साधनांचे वर्गीकरण करता येणे.<br>□ ऐतिहासिक साधनांच्या अभ्यासात तत्कालीन घटनांची कल्पना करता येणे व अंदाज बांधता येणे.<br>□ ऐतिहासिक संदर्भांचे योग्य वाचन करून त्याचा अर्थ सांगता येणे.<br>□ ऐतिहासिक वस्तू, कागदपत्रे, पुस्तके, नाणी व इलेक्ट्रॉनिक माहिती गोळा करून संग्रह करता येणे. तसेच त्यांचे वर्गीकरण वेगवेगळ्या पद्धतींनी करता येणे.<br>□ ऐतिहासिक घटनांचा अर्थ वस्तुनिष्ठ रीतीने लावता येणे. |
| २. | राष्ट्रनिर्मितीचे आव्हान : भाग १ | □ भारताच्या स्वातंत्र्यानंतरच्या वाटचालीतील ऐतिहासिक घटनांचा क्रम योग्य पद्धतीने सांगता येणे.<br>□ भारतासमोरील अंतर्गत आव्हानांचा चिकित्सक अभ्यास करता येणे.<br>□ भारतातील आर्थिक धोरणे काळानुसार बदलत गेली, हे स्पष्ट करता येणे.<br>□ जागतिकीकरणामुळे आलेल्या आर्थिक सुधारणांच्या परिणामांचा आढावा घेता येणे.<br>□ खासगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण यांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेत झालेल्या बदलांची कारणमीमांसा करता येणे. |
| ३. | राष्ट्रनिर्मितीचे आव्हान : भाग २ | □ भारतीय शिक्षण प्रणालीच्या विकासाचे टप्पे सांगता येणे.<br>□ विविध सामाजिक समस्यांच्या सोडवणुकीसाठी शिक्षण हे महत्त्वाचे माध्यम आहे, हे सांगता येणे.<br>□ समाजातील दुर्बल घटकांच्या विकासासाठीचे विविध प्रयत्न व त्यांचे महत्त्व ओळखणे.<br>□ स्वातंत्र्योत्तर भारतातील विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगतीची उदाहरणे सांगता येणे.<br>□ उद्योग व व्यापार क्षेत्राशी संबंधित संघटनांची माहिती मिळवून त्यांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम सांगता येणे.<br>□ विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगती यांविषयी अभिमान बाळगणे.<br>□ इंटरनेटच्या मदतीने नवनवीन शोधांची माहिती मिळवणे. |
| ४. | बदलते जीवन | □ जनमत निर्मितीतील व नागरी समाज सक्रीय करण्यातील प्रसारमाध्यमांची भूमिका व जबाबदाऱ्या ओळखता येणे.<br>□ शहरीकरण व ग्रामीण जीवनाची तुलना करून सांगता येणे.<br>□ सामाजिक समतेचा पुरस्कार करण्याविषयीची जाण निर्माण होणे.<br>□ वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अंगीकार करता येणे. |

# १ इतिहासाची साधने

आतापर्यंत आपण प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक भारताचा इतिहास अभ्यासला. यावर्षी आपणांस स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भारताचा इतिहास अभ्यासायचा आहे. आधुनिक काळातील इतिहासाची साधने प्राचीन व मध्ययुगीन साधनांपेक्षा वेगळी आहेत. लिखित साधने, भौतिक साधने, मौखिक साधने, दृक्-श्राव्य माध्यमातील साधने यांच्या आधारे इतिहास अभ्यासता येतो. आधुनिक काळात आपणांस प्रादेशिक, राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील साधनांची दखल घ्यावी लागते. या साधनांच्या मदतीने आपणांस इतिहासाचे लेखन करता येते.

**लिखित साधने :** खालील साधनांचा लिखित साधनांमध्ये समावेश होतो.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

ऐतिहासिक दस्तऐवज ज्या ठिकाणी जतन केले जातात, त्या ठिकाणास 'अभिलेखागार' असे म्हणतात. भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार नवी दिल्ली येथे आहे. हे आशिया खंडातील सर्वांत मोठे अभिलेखागार आहे.

आधुनिक कालखंडातील वृत्तपत्रे ही जशी लोकशाहीचा चौथा स्तंभ आहेत, तशी ती माहिती देणारी प्रमुख साधनेही आहेत. १९६१ ते २००० या कालखंडाचा विचार केल्यास सुरुवातीला छापील माध्यमांना विशेषतः वृत्तपत्रांना पर्याय नाही असेच दिसते. भारतात उदारीकरण सुरू झाले आणि इंटरनेटचा (आंतरजाल) सार्वत्रिक प्रसार सुरू झाल्यावर छापील माध्यमांना पर्याय उपलब्ध झाला. अर्थात असे झाले तरी छापील प्रसारमाध्यमांचे सामर्थ्य अजूनही कायम आहे.

**वृत्तपत्रे :** वृत्तपत्रांमधून आपणांस राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडी, राजकारण, कला, क्रीडा, साहित्य, समाजकारण आणि सांस्कृतिक घडामोडी कळतात. मानवी जीवनाशी संबंधित असणाऱ्या गोष्टी वृत्तपत्रांत येतात. राष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या वृत्तपत्रांनी आपल्या प्रादेशिक आवृत्या सुरू केलेल्या आहेत. त्यांच्या विविध विषयांची माहिती देणाऱ्या पुरवण्या असतात. छापील माध्यमांत चळवळीची मुखपत्रे, राजकीय पक्षांची दैनिके वा साप्ताहिके, मासिके, वार्षिके महत्त्वाची असतात.

काही वृत्तपत्रे वर्षाच्या शेवटी वर्षभरातील महत्त्वाच्या घटनांचा आढावा घेणाऱ्या पुरवण्या काढतात. त्यातून आपणांस वर्षभरातील प्रमुख घटना समजण्यास मदत होते.

**प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया (PTI) :** १९५३ नंतर भारतातील बहुसंख्य वृत्तपत्रांसाठी सर्व महत्त्वाच्या घटनांचे प्राथमिक तपशील, महत्त्वाच्या विषयांवरील लेख यांसाठी प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया हा महत्त्वाचा स्रोत आहे. प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियाने वृत्तलेख, छायाचित्रे, आर्थिक, वैज्ञानिक विषयांवरील लेख वृत्तपत्रांना पुरवलेले आहेत. आता पीटीआयने ऑनलाइन सेवा सुरू केली आहे. १९९०च्या दशकात पीटीआयने टेलिप्रिंटर्सऐवजी 'उपग्रह प्रसारण' तंत्राद्वारे देशभर बातम्या पाठवायला सुरुवात केली. आधुनिक भारताच्या इतिहासलेखनासाठी हा मजकूर महत्त्वाचा आहे.

**माहीत आहे का तुम्हांला?**

छापील माध्यमांत भारत सरकारच्या प्रकाशन विभागातर्फे काढण्यात येणाऱ्या वार्षिकांमधील माहिती विश्वसनीय असते. उदा., माहिती व प्रसारण खात्याने 'INDIA 2000' हा वार्षिक संदर्भग्रंथ प्रसिद्ध केला आहे. सदर ग्रंथ 'संशोधन, संदर्भ व प्रशिक्षण' विभागाअंतर्गत तयार केला आहे.

या ग्रंथात भूमी, लोक, राष्ट्रीय प्रतीके, राजकीय व्यवस्था, संरक्षण, शिक्षण, सांस्कृतिक घटना, विज्ञान व तंत्रज्ञानातील घडामोडी, पर्यावरण, आरोग्य व कुटुंब कल्याण, समाजकल्याण, प्रसारमाध्यमे, मूलभूत आर्थिक माहिती, अर्थपुरवठा, नियोजन, कृषी, जलसंधारण, ग्रामीण विकास, अन्न व नागरी पुरवठा, ऊर्जा, उद्योग, व्यापार, वाहतूक, संदेशवहन, श्रम, गृहयोजना, न्याय व विधी, युवा व क्रीडा विभाग इत्यादी क्षेत्रांमधील घटनांचा आढावा, सर्वसाधारण उपयुक्त माहिती यांचा समावेश आहे. अशा माहितीच्या आधारे आपणांस इतिहास लिहिणे शक्य होते. वेबसाईट : www.publicationsdivision.nic.in

**टपाल तिकिटे :** टपाल तिकिटे स्वतः काहीही बोलत नसली तरी इतिहासकार त्यांना बोलके करतो. भारत स्वतंत्र झाल्यापासून ते आजतागायत टपाल तिकिटांमध्ये विविध बदल घडून आलेले आहेत. तिकिटांच्या आकारांतील वैविध्य, विषयांतील नावीन्य, रंगसंगती यांमुळे टपाल तिकिटे आपणांस बदलत्या काळाविषयी सांगत असतात.

टपाल खाते राजकीय नेत्यांवर, फुलांवर, प्राणी-पक्ष्यांवर, एखाद्या घटनेवर, एखाद्या घटनेच्या रौप्य, सुवर्ण, अमृतमहोत्सव, शतक, द्विशतक, त्रिशतकपूर्ती निमित्त तिकिट काढते. तो इतिहासाचा मौल्यवान ठेवा असतो.


**माहीत आहे का तुम्हांला?**

१९७७ मध्ये भारत सरकारने जाल कूपर हे टपाल तिकिट प्रसिद्ध केले. जाल कूपर हे 'टपाल तिकिट' या विषयातले जागतिक पातळीवरचे अभ्यासक होते. मुंबईत पारशी कुटुंबात जन्मलेल्या कूपर यांनी 'इंडियाज स्टॅम्प जर्नल'चे संपादन केले. भारतातील पहिल्या टपाल तिकिट संग्राहक ब्यूरोचे ते संस्थापक (First Philatelic Bureau) होत. त्यांनी 'एम्पायर ऑफ इंडिया फिलाटेलिक सोसायटी'ची स्थापना केली. या विषयावर पुढे त्यांनी पुस्तके लिहिली. या छंदाला त्यांनी शास्त्रीय स्वरूप दिले. भारतीय टपाल तिकिटांचा अभ्यास जागतिक पातळीवर नेण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. टपाल तिकिट संग्राहक अशी कारकिर्दीची सुरुवात करून जागतिक पातळी गाठणाऱ्या कूपर यांचे योगदान समजण्यास त्यांच्यावर काढलेले टपाल तिकिट हे महत्त्वाचे साधन आहे.




जाल कूपर टपाल तिकिट

**भौतिक साधने :** खाली दिलेल्या साधनांचा समावेश भौतिक साधनांत होतो.



**नाणी :** नाण्यांच्या माध्यमातून आणि बदलत गेलेल्या नोटांच्या छपाईमधून आपणांस इतिहास समजतो. नोटा छापण्याचे काम रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया करते. तिचे मुख्यालय मुंबई येथे आहे.




नाणी

१९५० पासून ते आजतागायतची नाणी, त्यांत वापरलेले धातू, त्यांचे आकार, त्यांवरील विषय-वैविध्य यांवरून आपणांस समकालीन भारतातील महत्त्वाचे प्रश्न समजतात. उदा., लोकसंख्या नियंत्रणात ठेवण्याचा संदेश देणारी नाणी, शेती व शेतकऱ्यांचे महत्त्व सांगणारी नाणी.

**संग्रहालये :** भारतातील सर्वच राज्यांमध्ये त्या त्या राज्यांची वैशिष्ट्य सांगणारी वस्तुसंग्रहालये आहेत. त्यावरून आपणांस इतिहास समजण्यास मदत होते. (उदा., मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय) सरकारी संग्रहालयांखेरीज काही संग्राहक स्वतःची काही संग्रहालये उभारतात. ती अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असतात. उदा., नाणी, नोटा, विविध आकारांतील दिवे, अडकित्ते, क्रिकेटचे साहित्य.

**मौखिक साधने :** या साधनांमध्ये लोककथा, लोकगीते, म्हणी, ओव्या इत्यादींचा समावेश होतो. उदा., संयुक्त महाराष्ट्र चळवळीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख यांच्या पोवाड्यांतून कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळत असे.

**दृक्-श्राव्य साधने :** दूरदर्शन, चित्रपट, आंतरजाल इत्यादी साधनांना 'दृक्-श्राव्य साधने' असे म्हणतात. विविध देशी व परदेशी वाहिन्या उदा., हिस्ट्री चॅनेल, डिस्कव्हरी.

**करून पहा.**

एखाद्या घटनेचे साहित्यात कसे प्रतिबिंब उमटते आणि कवी एखाद्या घटनेकडे कसे बघतो याचे एक उदाहरण कविवर्य कुसुमाग्रज यांच्या 'आवाहन' या भारत-चीन युद्धाच्या पार्श्वभूमीवर रचलेल्या कवितेत आहे.

*बर्फाचे तट पेटुनि उठले सदन शिवाचे कोसळते*
*रक्त आपुल्या प्रिय आईचे शुभ्र हिमावर ओघळते !*
*असुरांचे पद भ्रष्ट लागुनी आज सतीचे पुण्य मळे*
*अशा घडीला कोण करंटा तटस्थेने दूर खळे*
*कृतांत ज्वाला त्वेषाची ना कोणाच्या हृदयात जळे*
*साममंत्र तो सरे, रणाची नौबत आता धडधडते*
*रक्त आपुल्या प्रिय आईचे शुभ्र हिमावर ओघळते !*

अशाच प्रकारच्या अनेक घटनांवर आधारित लिहिलेल्या साहित्याचा शोध घ्या.

**फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (FTII) :** भारत सरकारने पुणे येथे १९६० साली लोकशिक्षण देण्याच्या हेतूने फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया या संस्थेची स्थापना केली. राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा आणि संस्कृती या विविध क्षेत्रांतील महत्त्वाच्या घटनांवर आधारित वृत्तपट इंडियन न्यूज रिव्ह्यू या संस्थेने तयार केले. समाजाचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्ती, देशासाठी योगदान देणाऱ्या व्यक्ती आणि महत्त्वाच्या स्थळांची माहिती देणारे अनुबोधपट (डॉक्युमेंटरीज) या विभागाने तयार केले आहेत. आधुनिक भारताचा इतिहास अभ्यासण्यासाठी हे वृत्तपट व अनुबोधपट उपयोगी आहेत.

एफटीआयआयचे बोधचिन्ह

**करून पहा.**

देशभक्ती या विषयाशी संबंधित कोणकोणते चित्रपट तुम्हांला ठाऊक आहेत ? तुम्हांला आवडलेल्या एका चित्रपटाचे रसग्रहण तुमच्या शब्दांत लिहा.

आतापर्यंत आपण आधुनिक भारताच्या इतिहासलेखनासाठी उपयुक्त असणारी काही साधने बघितली. एकविसाव्या शतकात काळ इतक्या वेगाने बदलत आहे की ही साधने सुद्‌धा अपुरी पडतील. त्यामुळे आता स्वाभाविकपणे नवी साधने पुढे येत आहेत. उदा., घरगुती टेलिफोन ते मोबाइल. या प्रवासात 'पेजर' नावाचे साधन संपर्कासाठी आले होते. ते जेवढ्या वेगात आले तेवढ्याच वेगात ते संपुष्टात आले. आंतरजालावर (इंटरनेट) उपलब्ध असलेल्या प्रचंड माहितीचाही उपयोग इतिहासाच्या अभ्यासासाठी केला जातो; परंतु माहितीची सत्यता, यथार्थता तपासून घ्यावी लागते.

इतिहासाचा सर्व साधनांच्या आधारे अभ्यास करणे सहजसाध्य झाले आहे. तसेच ही सर्व साधने आधुनिक काळातील असल्याने त्यांची उपलब्धता होणे शक्य झाले आहे. इतिहास हा जीवनातील सर्व अंगांना स्पर्श करणारा असल्याने साधनांच्या जतनाचेही प्रयत्न सर्व स्तरांवर होताना दिसतात. ते आपणही करूयात.

## स्वाध्याय

**१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार .......... येथे आहे.

(अ) पुणे (ब) नवी दिल्ली

(क) कोलकता (ड) हैदराबाद

(२) दृक्‌-श्राव्य साधनांमध्ये.......... या साधनाचा समावेश होतो.

(अ) वृत्तपत्र (ब) दूरदर्शन

(क) आकाशवाणी (ड) नियतकालिके

(३) भौतिक साधनांमध्ये .......... चा समावेश होत नाही.

(अ) नाणी (ब) अलंकार

(क) इमारती (ड) म्हणी

**(ब) पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखून लिहा.**

| व्यक्ती | विशेष |
|---|---|
| जाल कूपर | - टपाल तिकिट अभ्यासक |
| कुसुमाग्रज | - कवी |
| अण्णाभाऊ साठे | - लोकशाहीर |
| अमर शेख | - चित्रसंग्राहक |

**२. टीपा लिहा.**

(१) लिखित साधने (२) प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया

**३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) टपाल खाते टपाल तिकिटांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचा वारसा व एकात्मता यांच्या जतनाचे प्रयत्न करते.

(२) आधुनिक भारताचा इतिहास लिहिण्यासाठी दृक्‌-श्राव्य माध्यमे महत्वाची असतात.

**उपक्रम**

(१) शाळेचे हस्तलिखित/वृत्तपट तयार करा.

(२) Archaeological Survey of India या भारत सरकारच्या अधिकृत संकेतस्थळावरील विविध माहितीपट पहा.

(३) तुमच्या गावाचा इतिहास लिहिण्यासाठी कोणती साधने वापराल ? त्या साधनांच्या साहाय्याने तुमच्या गावाचा इतिहास लिहा.

EPKZEB

# २ भारत : १९६० नंतरच्या घडामोडी

इ.स. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला. १९५० मध्ये संविधानाचा स्वीकार करत भारताचे सार्वभौम लोकशाही राष्ट्र निर्माण झाले. भारतीय समाज बहुजिनसी असून या समाजात विविध भाषा, धर्म, वंश आणि जातींचे लोक एकत्र राहात आहेत.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या सुरुवातीच्या काळात भारताला आर्थिक, राजकीय आणि सामाजिक विकासाचे प्रश्नही सोडवायचे होते. नियोजन आयोगाची निर्मिती आणि औद्योगिकीकरणावर भर हा आर्थिक विकास साध्य करण्याचा व देशातील दारिद्र्याची समस्या दूर करण्याचा एक मार्ग म्हणून स्वीकारण्यात आला. निवडणुकांचे यशस्वी आयोजन आणि लोकशाही परंपरांवरील विश्वासामुळे आपल्याला राजकीय स्थैर्य प्राप्त करणे शक्य झाले. याचबरोबर दुर्बल समाज घटकांसाठीच्या कार्यक्रमांचा आणि धोरणांचा समावेश असलेल्या अनेक सामाजिक सुधारणा प्रत्यक्षात आणण्याचेही प्रयत्न झाले.

**१९६० चे दशक :** भारताच्या राजकीय परिस्थितीवर परिणाम करणाऱ्या अनेक घडामोडी १९६० च्या दशकात घडल्या. पोर्तुगिजांच्या राजवटीखाली असलेल्या गोवा, दमण आणि दीव या प्रदेशांची मुक्तता झाली व ते भारतीय संघराज्याचे भाग बनले. उत्तरेकडील सीमारेषेवर भारत आणि चीन यांच्यातील तणाव १९५० पासून वाढत होता. या तणावांची परिणती अखेर दोन्ही देशांमधील सीमारेषा युद्धात झाली. हे युद्ध मॅकमोहन (१९६२) रेषेच्या क्षेत्रात झाले.



पं.जवाहरलाल नेहरू

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या काळात प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरूंनी भारताचे नेतृत्व केले. ते भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार होते. भारताच्या सामाजिक-आर्थिक विकासात त्यांनी घातलेली भर अत्यंत मोलाची आहे. १९६४ मध्ये भारताचे प्रधानमंत्री पं. नेहरू यांचे निधन झाले. त्यानंतर लालबहादूर शास्त्री भारताचे प्रधानमंत्री झाले. त्यांच्या कारकिर्दीत १९६५ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये काश्मीर प्रश्नावरून युद्ध झाले. सोव्हिएत रशियाने दोन्ही देशांत मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. १९६६ मध्ये ताश्कंद येथे लालबहादूर शास्त्रींचे निधन झाले. 'जय जवान, जय किसान' ही घोषणा लालबहादूर शास्त्रींनीच दिली. त्याद्वारे त्यांनी भारतीय शेतकरी व भारतीय सैनिक यांचे महत्त्व अधोरेखित केले.



लालबहादूर शास्त्री



इंदिरा गांधी

१९६६ मध्ये श्रीमती इंदिरा गांधी भारताच्या प्रधानमंत्री झाल्या. त्यांची निर्णयक्षमता प्रशंसनीय होती. बँकांचे राष्ट्रीयीकरण व संस्थानिकांचे तनखे बंद करणे या त्यांच्या निर्णयांचे दूरगामी परिणाम झाले. त्यांच्या कारकिर्दीत पाकिस्तानचे पूर्व पाकिस्तानच्या संदर्भातील दडपशाहीचे धोरण पूर्व पाकिस्तानमध्ये मोठे आंदोलन निर्माण करण्यास कारणीभूत ठरले.

या आंदोलनाचे नेतृत्व शेख मुजीबुर रहमान यांच्या मुक्ती वाहिनीने केले. पूर्व पाकिस्तानच्या या समस्येचा परिणाम भारतावरही झाला कारण कोट्यवधी निर्वासित तेथून भारतात आले.

**१९७० चे दशक :** १९७१ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्ध झाले व त्याची परिणती स्वतंत्र बांगलादेशाच्या निर्मितीत झाली. या कामी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्या कणखर नेतृत्वाचा वाटा महत्त्वाचा

मानला जातो. शांततेच्या कारणांसाठी अणू ऊर्जेचा वापर करण्याच्या आपल्या धोरणाचा एक भाग म्हणून भारताने १९७४ मध्ये राजस्थान येथील पोखरण येथे जमिनीअंतर्गत यशस्वी अणुचाचणी केली. १९७५ मध्ये सिक्कीमच्या जनतेने भारतीय संघराज्यात सामील होण्याच्या बाजूने मतदान केले आणि त्यानुसार सिक्कीमला भारतीय संघराज्यात राज्याचा दर्जा मिळाला.

या दशकात शासनाने संविधानातील आणीबाणीविषयक तरतुदींच्या आधारे राष्ट्रीय आणीबाणी घोषित केली. आणीबाणीच्या काळात भारतीय नागरिकांचे मूलभूत हक्क स्थगित करण्यात आले. आणीबाणीमुळे भारतीय प्रशासन व्यवस्थेत शिस्त आली, परंतु त्याचबरोबर मानवी हक्कांचाही संकोच झाला. राष्ट्रीय आणीबाणीचा हा काळ १९७५ पासून १९७७ पर्यंत राहिला आणि त्यानंतर सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या.

आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर अनेक विरोधी पक्षांनी एकत्र येऊन जनता पक्षाची निर्मिती केली. नव्याने स्थापन झालेल्या जनता पक्षाकडून श्रीमती इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षाचा दारुण पराभव या निवडणुकीत झाला. मोरारजी देसाई प्रधानमंत्री झाले. त्यांच्या नेतृत्वाखालील जनता पक्षाचे सरकार आपापसातील मतभेदांमुळे फार काळ टिकले नाही. त्यानंतर चरणसिंग हे प्रधानमंत्री झाले. त्यांचे सरकार अल्पकाळ टिकले. १९८० मध्ये पुन्हा निवडणुका झाल्या आणि श्रीमती इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्ष पुन्हा सत्तेवर आला.

**१९८० चे दशक :** या दशकात भारतीय राजकीय व्यवस्थेला अनेक नव्या आव्हानांना सामोरे जावे लागले. शिखांनी पंजाबमध्ये स्वतंत्र खलिस्तान राज्याच्या मागणीसाठी आंदोलन सुरू केले. या आंदोलनाने अतिशय उग्र स्वरूप धारण केले. या आंदोलनास पाकिस्तानचा पाठिंबा होता. १९८४ मध्ये अमृतसर येथील सुवर्ण मंदिरात आश्रय घेतलेल्या अतिरेक्यांना बाहेर काढण्यासाठी भारतीय लष्कर पाठवावे लागले. श्रीमती इंदिरा गांधींच्या सुरक्षा रक्षक पथकातील रक्षकांनीच त्यांची हत्या केली. याच कालखंडात ईशान्येकडील भारतात उल्फा संघटनेच्या नेतृत्वाखाली मोठे आंदोलन झाले.



राजीव गांधी

१९८४ मध्ये राजीव गांधी यांनी प्रधानमंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली. त्यांनी भारताच्या अर्थव्यवस्थेत आणि विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांत अनेक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. श्रीलंकेतील तमिळ अल्पसंख्याकांच्या समस्या सोडवण्यात राजीव गांधींनी पुढाकार घेतला. तमिळ समुदायाला देशांतर्गत स्वायत्तता देऊन एकसंध श्रीलंकेच्या कल्पनेला त्यांनी पाठिंबा दिला होता; परंतु त्यांच्या या संदर्भातील प्रयत्नांना यश आले नाही.

१९८९ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा पराभव झाला. यानंतर विविध पक्ष एकत्र येऊन जनता दलाचे विश्वनाथ प्रताप सिंग भारताचे प्रधानमंत्री झाले. इतर मागासवर्गीयांसाठीचे आरक्षण धोरण हे त्यांचे सर्वांत महत्त्वाचे योगदान मानले जाते. पक्षातील अंतर्गत वादविवादांमुळे ते फार काळ प्रधानमंत्री पदावर राहू शकले नाहीत. १९९० मध्ये चंद्रशेखर भारताचे प्रधानमंत्री झाले. त्यांचेही सरकार अल्पकाळ टिकले. १९९१ मध्ये निवडणूक प्रचारादरम्यान श्रीलंकेतील लिट्टे (LTTE) या संघटनेने राजीव गांधींची हत्या केली.

१९८० च्या दशकाच्या शेवटी जम्मू आणि काश्मीर मधील असंतोषाला सुरुवात झाल्याचे दिसते. ही समस्या अधिकाधिक वाढतच गेली आणि तिने आता दहशतवादाचे स्वरूप धारण केले आहे. तेथील अतिरेकी कारवायांनी काश्मिरी पंडितांना तेथून निघून जाण्यास भाग पाडले.

**१९९१ नंतरचे बदल :** जगाच्या आणि भारताच्या इतिहासात १९९१ हे वर्ष महत्त्वपूर्ण बदलांचे ठरले. सोव्हिएत रशियाचे या सुमारास विघटन झाले आणि जगातील शीतयुद्ध संपले. भारतात पी. व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखालील शासनाने भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक बदल घडवून आणले.

१९९६ ते १९९९ या काळात भारताच्या लोकसभेत कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. या काळात प्रधानमंत्री म्हणून अटलबिहारी वाजपेयी, एच. डी. देवेगौडा आणि इंद्रकुमार गुजराल यांनी काम पाहिले. अंतिमत: १९९९ मध्ये भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आले आणि अटलबिहारी वाजपेयी भारताचे प्रधानमंत्री झाले.


अटलबिहारी वाजपेयी

अटलबिहारी वाजपेयी यांनी पाकिस्तानबरोबर संवाद साधण्याचा प्रयत्न केला परंतु यश आले नाही. १९९८ मध्ये भारताने आणखी काही अणुचाचण्या करून स्वत:ला अण्वस्त्रधारी राष्ट्र म्हणून घोषित केले. १९९९ मध्ये कारगिल क्षेत्रात भारत आणि पाकिस्तान यांच्यात काश्मीर प्रश्नावरून युद्ध झाले. या युद्धात भारताने पाकिस्तानचा पराभव केला.

**भारतीय अर्थव्यवस्था :** अर्थव्यवस्थेचे आधुनिकीकरण, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक न्यायासह समाजवादी समाजरचना ही भारताच्या स्वातंत्र्यापासूनच भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये राहिली आहेत. भारताला उद्योग उभारून आधुनिकीकरण आणि स्वावलंबन प्राप्त करायचे होते. नियोजनाच्याद्वारे सामाजिक न्यायावर आधारलेली अर्थव्यवस्था अस्तित्वात आणायची होती. म्हणूनच योजना आयोग निर्माण करण्यात आला आणि पंचवार्षिक योजना सुरू करण्यात आली.

१९९१ मध्ये नरसिंहराव शासनाने आर्थिक सुधारणा घडवून आणण्यास प्रारंभ केला. या आर्थिक सुधारणांना आर्थिक उदारीकरण असे म्हणतात. भारताची आर्थिक व्यवस्था या धोरणामुळे भरभराटीस आली. भारतातील परकीय गुंतवणूक वाढली. उद्योग, वैज्ञानिक क्षेत्रांतील कुशल व्यावसायिक भारतीयांनी भारतीय अर्थव्यवस्था सुधारण्यास मदत केली, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योगांनी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण केल्या. १९९१ नंतर झालेल्या या बदलांचे वर्णन 'जागतिकीकरण' असेही केले जाते.

**विज्ञान आणि तंत्रज्ञान :** भारताने स्वावलंबनासाठी जे प्रयत्न केले, त्यात दोन महत्वाच्या घटनांचा समावेश करता येईल. १९६५ मध्ये सुरू झालेल्या हरितक्रांतीचे जनक डॉ. एम. एस. स्वामीनाथन होते. त्यांनी नव्या शास्त्रीय तंत्रांचा वापर करून अन्नधान्याचे उत्पादन वाढवले. डॉ. वर्गीस कुरियन यांच्या दुग्धोत्पादनातील सहकारी चळवळीच्या प्रयोगाने भारतात दुधाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढले. याला 'धवलक्रांती' असेही म्हणतात.

अणुशक्ती आणि अवकाश संशोधनाच्या क्षेत्रांतही भारताने अधिक प्रगती केली आहे. डॉ. होमी भाभा यांनी भारतातील अणुशक्ती कार्यक्रमाचा पाया घातला. अणुशक्तीचा वापर वीजनिर्मिती, औषधे आणि संरक्षण यांसारख्या शांततेच्या कारणासाठी करण्यावर भारताचा भर होता. अवकाश तंत्रज्ञानातही भारताने भरीव कामगिरी केली आहे. १९७५ मध्ये 'आर्यभट्ट' हा पहिला उपग्रह अवकाशात सोडण्यात आला. आज भारताकडे एक यशस्वी अवकाश कार्यक्रम असून त्या

अंतर्गत अनेक उपग्रह अवकाशात सोडलेले आहेत. दूरसंचार क्षेत्रातही प्रगती झाली.

**सामाजिक क्षेत्रातील बदल :** याच दरम्यानच्या काळात भारताच्या सामाजिक क्षेत्रातही अनेक महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत.

यांतील काही बदल हे महिलांच्या सक्षमीकरणाच्या समस्येशी संबंधित आहेत, तर काही वंचित घटकांच्या उन्नतीसाठी स्वीकारण्यात आलेल्या धोरणांशी संबंधित आहेत. देशातील महिला आणि बालकांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी १९८५ मध्ये मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या अंतर्गत 'महिला आणि बाल विकास विभाग' निर्माण करण्यात आला. स्त्रियांना सामाजिक न्यायाची हमी मिळावी आणि योजनांच्या कार्यवाहीस मदत व्हावी म्हणून जे कायदे करण्यात आले त्यात हुंडा प्रतिबंध कायदा, समान वेतन कायदा यांचा समावेश होता. ७३ व्या व ७४ व्या संविधान दुरुस्तीने स्थानिक शासनसंस्थांमध्ये स्त्रियांसाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या.

संविधानकारांना असे वाटले होते की, जातिव्यवस्थेमुळे भारतीय समाजातील काही समाजघटकांना सन्मान आणि समान संधींपासून वंचित राहावे लागले. या समस्येवर उपाय शोधण्यासाठी १९५३ मध्ये 'काकासाहेब कालेलकर आयोग' स्थापन करण्यात आला. १९७८ मध्ये बी. पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली इतर मागासवर्गीयांच्या समस्येचा विचार करण्यासाठी आणखी एक आयोग नेमण्यात आला. विविध सेवा आणि संस्थांमध्ये मागास समाजघटकांना योग्य प्रतिनिधित्व उपलब्ध करून देण्यासाठी आरक्षणाचे धोरण स्वीकारण्यात आले. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या समाजघटकांना उच्चवर्णीयांची भीती, हिंसा आणि दडपशाही यांच्यापासून मुक्त राहून प्रतिष्ठेने आणि आत्मसन्मानाने जगता यावे म्हणून १९८९ मध्ये शासनाने 'अत्याचार विरोधी' (ॲट्रासिटी) कायदा संमत केला.

**जागतिकीकरण :** जागतिकीकरणाने अर्थकारण, राजकारण, विज्ञान व तंत्रज्ञान, समाज आणि संस्कृती अशा सर्व क्षेत्रांमध्ये अनेक बदल घडवून आणले. यांतील काही बदलांची चर्चा वरील परिच्छेदांमध्ये केली आहे. जागतिक पातळीवरील अनेक क्षेत्रांमध्ये एक महत्त्वाचा देश म्हणून भारत उदयास आला आहे. G-20 आणि BRICS (Brazil, Russia, India, China, South Africa) यांसारख्या आंतरराष्ट्रीय संघटनांचा भारत एक महत्त्वाचा सदस्य देश आहे. दूरसंचार तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील एक महत्त्वाची क्रांती भारताने अनुभवली आहे.

भ्रमणध्वनी (मोबाइल) आणि आंतरजाल सेवा (इंटरनेट), उपग्रहावर आधारित दूरसंचार सेवा संपूर्ण भारतभर पसरल्या आहेत. राजकीय क्षेत्रातही एक स्थिर लोकशाही कशी यशस्वीरीत्या कार्य करत आहे हे भारताने जगाला दाखवून दिले आहे. याचा परिणाम म्हणून भारतीय लोकांच्या आणि विशेषत: युवकांच्या जीवनशैलीत खूप बदल झाला आहे. हे बदल त्यांच्या आहारविषयक सवयी, पोशाख, भाषा, समजुती यांतून दिसतात.

पुढील पाठात आपण भारतापुढील काही अंतर्गत आव्हानांचा अभ्यास करणार आहोत.



## स्वाध्याय

१. **(अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) श्रीलंकेतील तमिळ अल्पसंख्याकांचा प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेणारे प्रधानमंत्री ............. होते.

(अ) राजीव गांधी (ब) श्रीमती इंदिरा गांधी
(क) एच.डी.देवेगौडा (ड) पी.व्ही.नरसिंहराव

(२) भारतीय हरितक्रांतीचे जनक ............ होत.

(अ) डॉ. वर्गीस कुरीयन (ब) डॉ.होमी भाभा
(क) डॉ. एम. एस.स्वामीनाथन
(ड) डॉ. नॉमेन बोरलॉग

**(ब) पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखून लिहा.**

(१) इंदिरा गांधी - राष्ट्रीय आणीबाणी
(२) राजीव गांधी - विज्ञान-तंत्रज्ञान सुधारणा

(३) पी.व्ही.नरसिंहराव - आर्थिक सुधारणा
(४) चंद्रशेखर - मंडल आयोग

**२. (अ) दिलेल्या सूचनेप्रमाणे कृती पूर्ण करा.**

पाठातील आशयाच्या साहाय्याने प्रधानमंत्री व त्यांचा कालावधी यांचा कालानुक्रम तक्ता तयार करा.

**(ब) टीपा लिहा.**

(१) जागतिकीकरण
(२) धवलक्रांती

**३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) मोरारजी देसाई यांचे सरकार अल्पकाळच टिकले.
(२) अमृतसर येथील सुवर्ण मंदिरात लष्कर पाठवावे लागले.
(३) भारतात नियोजन आयोग निर्माण करण्यात आला.

**४. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) जग आणि भारताच्या इतिहासात १९९१ हे वर्ष महत्त्वपूर्ण बदलांचे कसे ठरले ?
(२) भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये कोणती ?

**५. पाठाच्या मदतीने भारतापुढील आव्हाने आणि भारताची बलस्थाने यांची यादी पूर्ण करा.**

| भारतापुढील आव्हाने | बलस्थाने |
|---|---|
| उदा., भारत-पाकिस्तान युद्ध | विविधतेतही एकता |
| .................... | .................... |
| .................... | अण्वस्त्र सज्जता |
| फुटीरतावाद | .................... |

**उपक्रम**

(१) भारत-पाकिस्तान युद्धात पराक्रम गाजवलेल्या भारतीय जवानांची माहिती मिळवा.
(२) कारगिल युद्धातील पराक्रमी वीरांची छायाचित्रे जमा करा.
(३) आतापर्यंत झालेल्या भारतीय प्रधानमंत्र्यांच्या चित्रांचा संग्रह करा.
(४) डॉ.होमी भाभा अणुसंशोधन केंद्राची माहिती मिळवा.
(५) दुग्ध उत्पादनातून कोणते व्यवसाय चालतात त्याची छायाचित्रांसह माहिती मिळवा.

F1Z8UV

# ३ भारतापुढील अंतर्गत आव्हाने

या पाठात आपण भारतापुढील काही अंतर्गत आव्हानांचा विचार करणार आहोत. फुटीरतावादी चळवळी, ईशान्य भारतातील समस्या, नक्षलवाद, जमातवाद, प्रदेशवाद या क्रमाने भारतापुढील अंतर्गत आव्हानांचा आपण अभ्यास करणार आहोत.

**पंजाबमधील असंतोष :** पंजाब राज्यात अकाली दल हा प्रमुख राजकीय पक्ष होता. १९७३ मध्ये अकाली दलाने 'आनंदपूर साहिब' ठराव मंजूर केला. त्यानुसार चंदीगढ पंजाबला द्यावे, इतर राज्यांतील पंजाबी भाषिक प्रांत पंजाबमध्ये समाविष्ट करावेत, सैन्यामधील शिखांचे संख्याप्रमाण वाढवावे, पंजाब राज्यास अधिक स्वायत्तता द्यावी अशा अनेक गोष्टींची मागणी या ठरावात होती. १९७७ मध्ये अकाली दल हा पक्ष पंजाबमध्ये सत्तेवर आला. अकाली दलाने सत्ता घेताना जुन्या मागण्यांबरोबर पंजाबला नदी पाणीवाटपात पाणी वाढवून द्या, अमृतसर शहराला पवित्र शहर किताब द्या अशा मागण्या केल्या.

१९८० मध्ये पंजाबमध्ये 'स्वतंत्र खलिस्तान' या चळवळीने मूळ धरले. या काळात अकाली दलाचे नेतृत्व संत हरचरणसिंग लोंगोवाल करत होते. ते सुवर्ण मंदिरात बसून आपल्या कार्यकर्त्यांना निदर्शने करण्याच्या सूचना देत होते. सुवर्णमंदिराच्या दुसऱ्या बाजूस कट्टर खलिस्तानवादी जर्नेलसिंग भिंद्रानवाले याच्याभोवती सशस्त्र अनुयायी गोळा होऊ लागले. या काळात दहशतवादी अतिरेकी कारवायांना सुरुवात झाली. १९८१ मध्ये संपादक लाला जगतनारायण यांच्या खून प्रकरणी भिंद्रानवाले यास अटक झाली. येथून पुढे वातावरण अधिक चिघळत गेले. यातूनच १९८३ मध्ये पंजाबमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली. भिंद्रानवाले अकाल तख्त या धार्मिक स्थळी राहायला गेला. भिंद्रानवालेच्या अनुयायांनी सुवर्णमंदिर परिसर आपल्या ताब्यात घेऊन तेथे वाळूची पोती रचली. परिसराला किल्ल्याचे स्वरूप आले. यामुळे पंजाबातील शांतता धोक्यात आली. लोकशाहीसमोर हे मोठे आव्हान होते.

**ऑपरेशन ब्लू स्टार :** सुवर्णमंदिरातून दहशतवाद्यांना बाहेर काढणे ही प्रमुख कामगिरी मेजर जनरल कुलदीपसिंग ब्रार यांच्याकडे सोपवली. ३ जून १९८४ रोजी सकाळी 'ऑपरेशन ब्लू स्टार' मोहिमेला प्रारंभ झाला. ६ जून रोजी कारवाई संपली. या लष्करी कारवाईत भारतीय सैन्याने विलक्षण संयम राखून कामगिरी केली. भिंद्रानवाले याच्यासह अन्य दहशतवादी मारले गेले आणि ही कारवाई संपली. त्यानंतर १९८६ मध्ये सुवर्णमंदिरात पुन्हा एकदा दहशतवाद्यांविरुद्ध कारवाई करावी लागली. त्याला 'ऑपरेशन ब्लॅक थंडर' असे म्हणतात. येथून पुढे पंजाबमध्ये शांतता प्रस्थापनेस गती मिळाली.



**माहीत आहे का तुम्हांला?**

विशिष्ट उद्दिष्ट ठेवून केलेल्या लष्करी कारवाईला ऑपरेशन म्हणतात. ऑपरेशन ब्लू स्टार म्हणजे सुवर्णमंदिरात लपलेल्या दहशतवाद्यांना बाहेर काढण्याची सैनिकी कारवाई होय.

## ईशान्य भारत समस्या

ईशान्य भारत म्हटले की आपल्या डोळ्यासमोर आठ राज्यांचा समूह येतो. आसाम, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय, मिझोरम, नागालँड, सिक्कीम आणि त्रिपुरा ही आठ राज्ये म्हणजे ईशान्य भारत होय. या आठ राज्यांना आंतरराष्ट्रीय सरहद्दीने कमी-अधिक प्रमाणात स्पर्श केला आहे. वंश, भाषा, सांस्कृतिक वैविध्य अशा विविध पातळ्यांवर येथे वेगळेपण दिसून येते. या भागातील जनजातींना भारताच्या मुख्य प्रवाहाशी जोडून घेण्याच्या कामी स्वतंत्र भारताचे पहिले प्रधानमंत्री पं. नेहरू यांनी पुढाकार घेतला. १९५४ मध्ये त्यांनी नेफा (नॉर्थ-ईस्ट फ्रंटीयर एजन्सी अर्थात पूर्वांचल) असा भाग निर्माण केला. भारत-चीन सीमेवरील प्रदेश आणि आसामच्या उत्तरेकडील जनजातींचा हा प्रदेश होय. या भागातील शेकडो जमातींचा विकास त्यांची संस्कृती जपूनच साधण्याची भूमिका पं.नेहरू यांनी

घेतली. संविधानाच्या सहाव्या अनुसूचीमध्ये या भागाविषयी खास तरतूदी करण्यात आल्या आहेत. १९६५ मध्ये या भागाची जबाबदारी परराष्ट्र मंत्रालयाकडे देण्यात आली. ईशान्यकडील या प्रदेशांना मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठी १९७१ मध्ये 'ईशान्यीय परिषद कायदा' करण्यात आला. या कायद्यानुसार ईशान्यीय परिषदेची कामे स्पष्ट करण्यात आली. आर्थिक व सामाजिक क्षेत्रांतील समान हिताच्या बाबी, आंतरराज्य वाहतूक, वीज आणि पूर नियंत्रण इत्यादी संबंधी केंद्र सरकारला सल्ला देण्याचे काम या परिषदेचे होते.

**मिझोरम :** ईशान्य भारतातील जनजमातींना प्राचीन इतिहास आहे. भारत स्वतंत्र झाल्यावर सरकारने मिझोबहुल लुशाई टेकड्यांच्या भागातील जिल्ह्यांना प्रशासकीय स्वायत्तता दिली. केंद्र सरकारने १९५४ मध्ये भाषावार प्रांतरचना आयोग नेमल्यावर तेथील जनतेच्या अपेक्षा वाढल्या. मिझोंच्या नेत्यांनी स्वायत्त 'मिझो' प्रांताची मागणी करण्यास सुरुवात केली. १९५९मध्ये मिझोरम प्रदेशात तीव्र दुष्काळ पडला. या दुष्काळाच्या काळात मिझो नेते लालडेंगा यांनी सामान्य जनतेसाठी कार्य केले.

१९६१ मध्ये लालडेंगा यांनी 'मिझो नॅशनल फ्रंट' (MNF) या संघटनेची स्थापना केली. त्रिपुरा, मणिपूर आणि लुशाई टेकड्यांमधील मिझोबहुल प्रांतांसाठी 'ग्रेटर मिझोरम'ची अर्थात स्वतंत्र राष्ट्राची मागणी लालडेंगा यांनी केली. मार्च १९६६ मध्ये मिझो नॅशनल फ्रंटने 'स्वतंत्र मिझोरम' राष्ट्र अस्तित्वात आल्याची घोषणा केली. प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी परिस्थिती कठोरपणे हाताळून बंड मोडून काढले. १९७२ मध्ये परिस्थिती निवळल्यावर मिझोबहुल भागाला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देण्यात आला. १९८५ मध्ये प्रधानमंत्री राजीव गांधी आणि मिझो नॅशनल फ्रंट यांच्यात तडजोड होऊन मिझोरमला घटकराज्याचा दर्जा देण्यात आला. लालडेंगा राज्याचे मुख्यमंत्री झाले.

**नागालँड :** ईशान्य भारतातील नागा जमात ही लढाऊ जमात म्हणून ओळखली जाते. पूर्व हिमालय, नागा टेकड्या, आसाम आणि म्यानमारचा सीमावर्ती भाग अशा परिसरात नागा या जमातीची वस्ती होती. १९४६ मध्ये काही सुशिक्षित नागा युवकांनी 'नागा नॅशनल कौन्सिल' (NNC) या संघटनेची स्थापना केली. पुढे त्यांनी 'नागालँड' या स्वतंत्र राष्ट्राची मागणी केली. त्यांचे नेतृत्व अंगामी झापू फिझो हे करत होते. १९५४ मध्ये 'एनएनसी'ने नागालँडच्या स्वतंत्र संघराज्याच्या स्थापनेची घोषणा केली. १९५५ मध्ये आसाम रायफल्सचे सैनिक आणि स्थानिक यांच्यात चकमकी उडाल्या. चकमकी दडपण्यासाठी लष्करी कारवाई करण्यात आली.

केंद्र सरकार आणि 'एनएनसी' यांच्यात चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या. केंद्र सरकारने नागाबहुल भागाला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देण्याचे ठरवले. नेफामधील नागाबहुल भाग आणि त्सुएनसाँगचा भाग एकत्र करून १ डिसेंबर १९६३ रोजी 'नागालँड' हे राज्य अस्तित्वात आले.

**आसाम :** १९८३ साली आसाममध्ये बंगालीभाषक स्थालांतरितांच्या वर्चस्वावर ऑल आसाम स्टुडंट्स युनियन आणि आसाम गणसंग्राम परिषद यांनी उग्र आंदोलन उभारले होते. १९८५ मध्ये प्रधानमंत्री राजीव गांधी, केंद्रीय गृहमंत्री शंकरराव चव्हाण, आसामी नेते प्रफुल्लकुमार महन्तो यांच्यात करार झाला. आसाममध्ये घुसखोर असणाऱ्या बांगलादेशी नागरिकांना परत मूळ ठिकाणी पाठवण्याचे ठरले. १९८६ मध्ये आसाम विधानसभेच्या निवडणुका होऊन आसाम गणपरिषदेचे प्रफुल्लकुमार महन्तो मुख्यमंत्री झाले. या लोकशाही प्रक्रियेमुळे आसाममध्ये शांतता प्रस्थापित होण्यास मदत झाली.

**अरुणाचल प्रदेश :** १९५४ मध्ये नेफा विभागाची निर्मिती झाली. त्याला १९७२ साली अरुणाचल प्रदेश (उगवत्या सूर्याचा प्रदेश) संबोधण्यात येऊ लागले. २० फेब्रुवारी १९८७ रोजी या भागास घटकराज्याचा दर्जा देण्यात आला.

१९६० ते २००० या कालखंडात ईशान्य भारताचा प्रवास लोकशाही अधिक प्रगल्भ होण्यात झाला. केंद्र सरकारच्या खास योजना, औद्योगिकरण, शिक्षणाचा प्रसार यामुळे हा भाग विकासाच्या मार्गावर चालत आहे.

## नक्षलवाद

**नक्षलवादी चळवळ :** पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्यातील नक्षलबारी येथे ही चळवळ सुरू झाली. अल्पभूधारक शेतकरी व शेतमजुरांना संघटित करून १९६७ मध्ये नक्षलबारी भागातील काही शेतजमिनींच्याभोवती लाल झेंडे रोवून पिकांचा ताबा घेतला व त्याला मुक्त प्रदेश म्हणून नक्षलवाद्यांनी घोषित केले. या उठावापासून प्रेरणा घेऊन ज्या चळवळी झाल्या त्यास 'नक्षलवादी' चळवळी म्हणतात.

जमीनदारांच्या आर्थिक शोषणाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी कृषी समित्या स्थापणे, मोठ्या जमीनदारांच्या जमिनी बळकावणे, त्यांचे कुळांमध्ये वाटप करणे ही या चळवळीची सुरुवातीची उद्दिष्टे होती. पुढे ही चळवळ आपल्या उद्दिष्टांपासून दूर गेली. शासनाचे कोणतेही उपक्रम किंवा कल्याणकारी योजना जनतेपर्यंत पोहचू न देणे यासाठी नक्षलवादी चळवळीने दहशतवादाचा आश्रय घेतला. लोकशाही व्यवस्था अमान्य करून समांतर व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न नक्षलवादी करू लागले. यातूनच नक्षलवाद हा देशाच्या अंतर्गत सुरक्षेपुढील आव्हान ठरू लागला.

नक्षलवादी चळवळीचे सुरुवातीचे प्रमुख केंद्र पश्चिम बंगाल होते. पुढे ती चळवळ आंध्र प्रदेशातील पूर्व गोदावरी, विशाखापट्टणमचा काही भाग, तेलंगणामधील करीमनगर, अदिलाबाद, छत्तीसगढमधील बस्तर, राजनांदगाव, सुकमा, महाराष्ट्रातील गडचिरोली, भंडारा, चंद्रपूरमधील काही भाग, मध्यप्रदेशातील बालाघाट, मंडला, ओडिशातील कोरापूट येथे पसरली. आपला प्रभाव कायम राहावा म्हणून सशस्त्र अशी 'पीपल्स लिबरेशन गुरिला आर्मी' (PLGA) या संघटनेची स्थापना केली. हा संघर्ष अद्यापही चालू आहे.

## जमातवाद

जमातवाद हे आपल्या देशाच्या ऐक्यापुढील एक गंभीर आव्हान आहे. संकुचित धार्मिक अभिमानातून जमातवाद निर्माण होतो. ब्रिटिशांनी आपल्या देशात जमातवादाचे बीज पेरले. आपल्या देशात विविध धर्मांचे लोक शतकानुशतकापासून गुण्यागोविंदाने राहत आले आहेत. एखाद्या समाजात भिन्न-भिन्न धर्मांच्या लोकांचे वास्तव्य असणे व त्यांनी आपापल्या धर्माचा योग्य तो अभिमान बाळगणे यात वावगे काहीच नाही. पण जेव्हा या धर्माच्या अभिमानाचा अतिरेक होतो तेव्हा त्याचे रूपांतर दुरभिमानात झाल्यावाचून राहत नाही. प्रत्येकाला मग आपलाच धर्म श्रेष्ठ आणि बाकीचे सर्व तुच्छ वाटतात. यातून धर्मांधता येते.

धर्मांधता हा जमातवादाचा पाया आहे. धर्मांधतेमुळे व्यापक राष्ट्रीय हिताचा विसर पडतो. भिन्नधर्मीयांचा एकमेकांवरचा विश्वास उडतो. परस्परांविषयी त्यांना संशय वाटू लागतो. परधर्मीय देशबांधवांना शत्रू लेखले जाते. एकमेकांच्या सणासुदीच्या प्रसंगी एकत्र येणेही कमी होऊ लागते. नागरिक म्हणून सर्वांनी रास्त मागण्यांसाठी व हक्कांसाठी संघटित होणेही अशक्य होऊन बसते. धर्मांधतेमुळे भोवतालच्या घटनांकडे, माणसांकडे बघण्याची दृष्टीच कलुषित होऊन जाते.

काही लोक आर्थिक व सामाजिक प्रश्नांचा विचारही आपापल्या धर्माच्या चौकटीतूच करू लागतात. आपण विशिष्ट धर्माचे असल्यामुळे राजकारणात प्रभावशून्य आहोत असे सर्वच धर्मांतील काही व्यक्तींना वाटते. आपल्यावर सतत अन्याय होतो आहे अशी त्यांची समजूत होते. आपल्या समाजाबाबत सरकार पक्षपातच करत आहे अशी भावना बळावते. अशा अवस्थेत ते आपल्या धर्माविषयी, धर्मबांधवांविषयी हळवे बनतात. आपल्या धर्माच्या लोकांबाबत कोणी काही बोलले किंवा धार्मिक प्रतीकांचा कळत-नकळत कोणी अपमान केला तर यातूनच दंगली पेटतात. शेकडो निरपराध जीव मारले जातात. कोट्यवधी रुपयांच्या सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होते. सार्वजनिक शांतता नष्ट होते. दंगलीतील कटू आठवणींमुळे माणसांची मने दुरावतात आणि एकमेकांबद्दलच्या विश्वासाला तडा जातो.

माणसामाणसांतील विश्वास हाच सहजीवनाचा आधार असतो. तो तुटला की सामाजिक ऐक्यास

तडा जातो. सामाजिक ऐक्याशिवाय राष्ट्रीय ऐक्य कसे साधणार? म्हणूनच आपणा सर्वांनी या धार्मिक जमातवादाचा सर्वशक्तीनिशी मुकाबला करणे आवश्यक आहे. त्यासाठी भिन्नधर्मीय लोकांत आपण मिसळले पाहिजे. परस्परांच्या सण-उत्सवांत सहभागी झाले पाहिजे. एकमेकांच्या चांगल्या चालीरीती, सद्विचार आपण स्वीकारले पाहिजेत. आपल्या सामाजिक वा आर्थिक प्रश्नांकडे आपणांस तर्कशुद्ध पद्धतीने पाहता आले पाहिजे. या प्रश्नांची धर्माशी गल्लत करता कामा नये. धार्मिक सलोखा का बिघडतो ? त्याला आर्थिक, राजकीय, ऐतिहासिक अशी कोणती कारणे आहेत अशा प्रश्नांचा आपण शोध घेतला पाहिजे. जमातवाद नष्ट करून राष्ट्रीय ऐक्यास बळकटी आणण्याचा हाच एक मार्ग आहे.

## प्रदेशवाद

'प्रदेशवाद' म्हणजे आपल्या प्रदेशाविषयी अवाजवी अभिमान बाळगणे होय. उदा., मी बंगाली, मी मराठी अशी आपली ओळख सांगणे वेगळे; पण मी बंगाली, मी मराठी म्हणून इतर प्रांतीयांपेक्षा श्रेष्ठ आहे अशी भावना होणे हा अवाजवी प्रांताभिमान झाला. आपल्या प्रदेशाविषयी वाटणाऱ्या आत्मीयतेला अशा अवाजवी प्रांताभिमानामुळे विकृत स्वरूप प्राप्त होते. आपल्या प्रांतावर आपले प्रेम असणे स्वाभाविक आहे - पण त्याचे विकृतीकरण नसावे.

विकासातील असमतोलामुळे प्रदेशवादाला खतपाणी मिळते. स्वातंत्र्यानंतर देशाचा आर्थिक विकास साधताना सुरुवातीला काही राज्यांची अधिक प्रगती झाली तर इतर राज्ये आर्थिकदृष्ट्या मागासच राहिली. उदा., महाराष्ट्र, गुजरात, पंजाब, तमिळनाडू ही राज्ये आर्थिक व औद्योगिकदृष्ट्या बरीच विकसित झाली; तर ओडिशा, बिहार, आसामसारखी राज्ये आर्थिक तसेच औद्योगिकदृष्ट्या अप्रगत राहिली. आर्थिक विकास व सुधारणा हा प्रगतीचा पाया असल्याने ज्या राज्यांत आर्थिक विकास होतो ती राज्ये शिक्षण, आरोग्य, संस्कृती या अन्य क्षेत्रांतही प्रगती साधू शकतात. ज्या राज्यांत असा विकास झालेला नसतो ती राज्ये मात्र शैक्षणिक तसेच नागरी सुविधांच्या बाबतीच खूपच मागे राहतात. प्रगत राज्यांतील लोकांना उपलब्ध होणाऱ्या विकासाच्या संधी अशा राज्यांना मिळत नाहीत. शैक्षणिक मागासलेपणा, बेरोजगारी, दारिद्र्य अशा प्रश्नांनी ते गांजले जातात. आपली फसवणूक होत आहे, आपल्याला विकासाच्या लाभांपासून दूर ठेवले जात आहे, अशी भावना त्यांच्या मनात बळावते. यातूनच मग राज्याराज्यांतील सलोखा नष्ट होतो. हा सलोखा नष्ट झाला तर त्याचा विपरीत परिणाम राष्ट्रीय ऐक्यावर होतो. त्यासाठी हा सलोखा ज्यामुळे नष्ट होतो, त्या आर्थिक असमतोलाचा प्रश्न आपण तातडीने सोडवायला हवा. आपले सरकार त्या दृष्टीने प्रयत्नशील आहे.

प्रदेशवाद हा प्रगत व अप्रगत अशा दोन्ही प्रकारच्या राज्यांना झपाटू शकतो. आपण प्रगत आहोत कारण आपल्या प्रदेशाचा इतिहास, संस्कृती हीच मुळात श्रेष्ठ आहे, असा श्रेष्ठत्वाचा गंड विकसित राज्याच्या लोकांमध्ये निर्माण होतो व मग ते अविकसित राज्यांतील लोकांना कमी लेखू लागतात. आपल्या विकासाच्या लाभांत त्यांना वाटेकरी करून घेण्यास त्यांची तयारी नसते. याउलट मागास भागातील लोकांना आपली संघटित शक्ती उभी करण्यासाठी प्रादेशिक अस्मिता जागवावी लागते. त्यासाठी ते स्थानिक परंपरा, संस्कृती यांचा अनाठायी गौरव करून स्वतःचे वेगळेपण सिद्ध करायचा प्रयत्न करतात. यातून प्रदेशवाद बळावतो. त्यामुळे राष्ट्रीय ऐक्यास बाधा येते. विकासातील असमतोल कमी करून अनिष्ट प्रदेशवाद निकालात काढला जाऊ शकतो.

भारतापुढील काही मोजक्या अंतर्गत आव्हानांचा आपण अभ्यास केला. याच्याच जोडीला लोकसंख्या, स्वच्छता, शेती व शेतकऱ्यांच्या समस्या, गरिबी, राहण्यासाठी घर आणि दोन वेळचे भोजन अशा कितीतरी समस्या आजही आहेत. आपण या आव्हानांवर मात करून पुढे जाण्यासाठी प्रयत्न करत आहोत. प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहोत. पुढील पाठात आर्थिक क्षेत्रातील प्रगतीबाबत अभ्यास करणार आहोत.




## स्वाध्याय

**१. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) ‘आनंदपूर साहिब’ या ठरावात अकाली दलाने कोणत्या मागण्या केल्या ?

(२) जमातवाद नष्ट करण्यासाठी काय केले पाहिजे ?

(३) प्रदेशवाद केव्हा बळावतो ?

**२. टीपा लिहा.**

(१) जमातवाद (२) प्रदेशवाद

**३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) ‘ऑपरेशन ब्लू स्टार’ करावे लागले.

(२) जमातवादाचा सर्वशक्तीनिशी मुकाबला करणे आवश्यक आहे.

**४. पुढील संक्षिप्त रूपाचे पूर्ण रूप लिहा.**

(१) MNF (२) NNC (३) PLGA

**उपक्रम**

१. घटकराज्ये/केंद्रशासित प्रदेश व त्यांच्या राजधान्या यांचा तक्ता तयार करा व नकाशात आराखड्यात त्यांच्या नोंदी करा.

२. मणिपूर, मेघालय, त्रिपुरा आणि सिक्कीम या राज्यांची माहिती आंतरजालाच्या साहाय्याने मिळवा.

# ४ आर्थिक विकास

भारताच्या आर्थिक धोरणाचा अभ्यास आपण या प्रकरणात करणार आहोत. मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार, पंचवार्षिक योजना व त्यांचे यशापयश, बँकांचे राष्ट्रीयीकरण, वीस कलमी कार्यक्रम, गिरणी कामगारांचा संप, १९९१ चे नवे आर्थिक धोरण यांचा विशेषत्वाने अभ्यास करणार आहोत.

**मिश्र अर्थव्यवस्था :** भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच आपण कोणत्या प्रकारच्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार करायचा याविषयी विचारमंथन चालू होते. प्रधानमंत्री पंडित नेहरू यांनी कोणताही टोकाचा मार्ग स्वीकारण्याऐवजी मध्यम मार्गाचा अवलंब केला. काही देशांमध्ये भांडवलशाही अर्थव्यवस्था होती, तर काही देशांमध्ये समाजवादी अर्थव्यवस्था होती. प्रत्येक अर्थव्यवस्थेचे काही फायदे आणि काही तोटे असतात.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पादनाची साधने खासगी मालकीची असतात. समाजवादी अर्थव्यवस्थेत उत्पादनाची साधने समाजाच्या म्हणजेच शासनाच्या मालकीची असतात. मिश्र अर्थव्यवस्था खासगी आणि सामाजिक अशा दोन्ही क्षेत्रांत कार्य करते. आधुनिक भारताचा आर्थिक विकास साधण्यासाठी दोन्ही अर्थव्यवस्थांपेक्षा 'मिश्र अर्थव्यवस्थे'ला भारताने प्राधान्य दिले. या अर्थव्यवस्थेत आपणांस तीन भाग दिसून येतात.

**(१) सार्वजनिक क्षेत्र :** या क्षेत्रातील उद्योगधंदे पूर्णपणे सरकारच्या नियंत्रणाखाली व व्यवस्थापनाखाली असतात. उदा., संरक्षण साहित्य उत्पादन.

**(२) खासगी क्षेत्र :** या क्षेत्रातील उद्योगधंदे पूर्णपणे खासगी उद्योजकांच्या मालकीचे असतात. अर्थात त्यावर सरकारी देखरेख व नियंत्रण असते. उदा., उपभोग्य वस्तू.

**(३) संयुक्त क्षेत्र :** या क्षेत्रात काही उद्योग खासगी उद्योजकांच्या मालकीचे, तर काही सरकारी व्यवस्थापनाखाली चालवले जातात.

मिश्र अर्थव्यवस्था सुरळीत चालण्यासाठी खासगी व सार्वजनिक क्षेत्र यांत सुसंवाद असणे गरजेचे असते. या व्यवस्थेचे एकच उद्दिष्ट आहे ते म्हणजे अधिकाधिक उत्पादन आणि मोठ्या प्रमाणावर लोकसहभाग. या व्यवस्थेत भांडवलशाही व समाजवादी अर्थव्यवस्थेतील चांगले गुण एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आहे. नफ्याची प्रेरणा, उपक्रमशीलता, नियमपालन, कालबद्ध नियोजन इत्यादी गोष्टी मिश्र अर्थव्यवस्थेत दुर्लक्षून चालत नाही.

या व्यवस्थेत देशहिताला प्राधान्य देण्याची प्रवृत्ती असते. दीर्घकालीन विकासावर अधिक भर देण्यात येतो. संरक्षण, शास्त्रीय संशोधन, शिक्षण, रस्ते, रेल्वे, कालवे, बंदरे आणि विमानतळ उभारणी ही क्षेत्रे भरपूर भांडवल गुंतवणूक लागणारी पण फळ मात्र उशिरा देणारी आहेत. या क्षेत्रांत खासगी उद्योजक मोठ्या प्रमाणात पुढे येत नाहीत. अशा वेळी सरकारलाच पुढाकार घ्यावा लागतो.

वरील पद्धतीने मिश्र अर्थव्यवस्थेचे प्रारूप वापरून आणि पंचवार्षिक योजनांचा स्वीकार करून भारताने विकासाची वाटचाल सुरू केली. १९७३ च्या औद्योगिक धोरणाने विकासाची गती वाढली. या धोरणानुसार अवजड उद्योग, उद्योजक घराणी व परकीय उद्योग यांचा प्रभाव आटोक्यात आणणे आणि प्रादेशिक विकासाचा समतोल साधणे या गोष्टींना प्राधान्य दिले गेले. लघुउद्योग, ग्रामोद्योग, घरगुती उद्योग यांच्या विकासावर लक्ष देण्यात आले. सहकार क्षेत्राकडे विशेष लक्ष देण्यास सुरुवात झाली.

## पंचवार्षिक योजना

भारत स्वतंत्र होईपर्यंत परकीय राजवटीने भारताचे पुरेपूर आर्थिक शोषण केलेले होते. दारिद्र्य, बेकारी, लोकसंख्या वाढ, निकृष्ट राहणीमान, शेती व

उद्योगधंदे यांची अल्प उत्पादनक्षमता तसेच ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांसंबंधीचे मागासलेपण अशा बिकट समस्या देशासमोर होत्या. त्या सोडवण्यासाठी नियोजनाची गरज होती.

१९५० मध्ये भारत सरकारने नियोजन मंडळाची स्थापना केली. प्रधानमंत्री पं.जवाहरलाल नेहरू हे या मंडळाचे अध्यक्ष होते.

या मंडळाने कृषी आणि ग्रामीण विकास, संतुलित उद्योगीकरण, किमान जीवनमानाची तरतूद, लोकशाहीशी सुसंगत असा आर्थिक विकास, नियोजनाची आखणी व अंमलबजावणी यांमध्ये लोकांचा सहभाग आणि व्यक्तीचा विकास करणारी पाच वर्षांची योजना तयार केली. ही योजना म्हणजेच 'पंचवार्षिक योजना' होय.

**नियोजनाचे मूलभूत तत्त्व :** एखाद्या देशातील साधनसामग्रीचे प्रमाणशीर वाटप व तेथील मनुष्यबळाचा योग्य वापर त्या देशातील जनतेच्या गरजा भागवण्यासाठी झाला पाहिजे हे नियोजनाचे सर्वमान्य तत्त्व आहे.

## योजनांची उद्दिष्टे

भारताच्या आर्थिक नियोजनाची सर्वसाधारणपणे उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

(१) राष्ट्रीय उत्पन्नात वाढ.

(२) मूलभूत उद्योगधंद्यांवर भर देऊन झपाट्याने उद्योगीकरण घडवून आणणे.

(३) अन्नधान्याच्या बाबतीत देश स्वावलंबी बनावा म्हणून कृषी उत्पादनात वाढ घडवून आणणे.

(४) वाढत्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देऊन, देशातील मनुष्यबळाचा पुरेपूर उपयोग करून घेणे.

(५) प्राप्ती आणि संपत्ती यांमधील विषमता दूर करणे.

(६) वस्तूंच्या किमती स्थिर पातळीवर ठेवणे.

(७) कुटुंबनियोजन करून वाढत्या लोकसंख्येला आळा घालणे.

(८) दारिद्र्यनिवारण करून राहणीमान उंचावणे.

(९) सामाजिक सेवांचा विकास करणे.

(१०) आर्थिक क्षेत्र स्वावलंबी करणे.

**पहिली पंचवार्षिक योजना (१९५१–१९५६) :** या योजनेत शेती, सामाजिक विकास, जलसिंचन व पूरनियंत्रण, ऊर्जा साधने, ग्रामीण व छोटे उद्योग, मोठे उद्योग व खनिजे, वाहतूक व दळणवळण, शिक्षण, आरोग्य यांवर खर्च करण्यात आला. नियोजनबद्ध आर्थिक विकासाची पायाभरणी करणारी ही योजना होती.

**दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६–१९६१) :** या योजनेत औद्योगिकीकरणाचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट साध्य करायचे होते. दुर्गापूर, भिलाई, राऊरकेला येथील पोलादाचे कारखाने, सिंद्री येथील रासायनिक खतांचा कारखाना, चित्तरंजन येथील रेल्वे इंजिनाचा कारखाना, पेरांबुरचा आगगाडीच्या डब्यांचा कारखाना, विशाखापट्टणमचा जहाज बांधणीचा कारखाना इत्यादी प्रचंड व अवजड उद्योगधंद्यांचे कारखाने सार्वजनिक क्षेत्रात उभारण्यात आले. शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी भाक्रा-नांगल, दामोदर यांसारखी प्रचंड धरणे उभारण्यात आली. या योजनेमुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली.



भिलाई पोलाद कारखाना

**तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१–१९६६) :** या योजनेत उद्योग व कृषीविकासाचे संतुलन साध्य करायचे होते. दरसाल राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून

आणणे, अवजड उद्योग, वाहतूक व खनिज उद्योग विकास, विषमतेचे निर्मूलन करणे आणि रोजगार संधी विस्तार हा मुख्य हेतू होता.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेनंतर तीन एकवार्षिक योजना (१९६६ ते १९६९) हाती घेण्यात आल्या. या काळात तीव्र दुष्काळाचा सामना करावा लागला. चीनचे आक्रमण आणि पाकिस्तानशी युद्ध यांमुळे विकासाच्या कामांपेक्षा संरक्षणाकडे व दुष्काळ निवारणाकडे सरकारला अधिक लक्ष द्यावे लागले. या गोष्टींमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेवर फार ताण पडला.

**चौथी पंचवार्षिक योजना (१९६९-१९७४) :** या योजनेची उद्दिष्टे ठरवताना भारत स्वावलंबी बनावा, मूलभूत उद्योगांचा सरकारने विकास करावा, आर्थिक विकासाचा वेग वाढावा आणि समाजवादी समाजरचना निर्माण करण्याकडे लक्ष पुरवावे असे ठरवण्यात आले. या योजनेच्या काळात देशातील १४ प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. ही योजना अपेक्षेइतकी यशस्वी झाली नाही. चौथ्या योजनाकाळात बांगलादेश युद्धाचे परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेला सहन करावे लागले. निर्वासितांवरील खर्च सहन करावा लागला. सरकारी नोकरांची पगारवाढ, रेल्वे कर्मचारी वेतनवाढ, आंतरराष्ट्रीय बाजारातील पेट्रोलचे वाढते दर यांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला धक्के सहन करावे लागले.

**पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४-१९७९) :** गरिबी दूर करून देश आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्याचे प्रमुख उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून ही योजना तयार करण्यात आली. या योजनेत राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे, मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देणे, शिक्षण, सकस आहार, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे, वैद्यकीय उपचाराच्या सुविधा ग्रामीण भागाला पुरवणे, ग्रामीण भागात वीजपुरवठा व दळणवळणाची साधने पुरवण्यासाठी रस्ते बांधणे, समाजकल्याणाच्या योजना व्यापक प्रमाणावर राबवणे, कृषी विकास घडवून आणणे, मूलभूत उद्योगधंदे वाढवणे, अन्नधान्य व इतर जीवनोपयोगी वस्तूंची खरेदी एकाधिकार पद्धतीने करून त्या सार्वजनिक वितरण व्यवस्थांद्वारा गरिबांना रास्त किमतीत पुरवणे अशी उद्दिष्टे नमूद करण्यात आली आहेत.

पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात दारिद्र्यनिवारण व रोजगार वाढवणे शक्य झाले नाही.

१९७७ मध्ये लोकसभेच्या निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाचा पराभव झाला. जनता पक्ष सत्तेवर आला. नव्या सरकारने पाचवी पंचवार्षिक योजना १९७८ च्या मार्च अखेर समाप्त करून एप्रिल १९७८ पासून साखळी योजना सुरू केली परंतु ती अपयशी ठरली. १९८० मध्ये लोकसभेच्या मध्यवर्ती निवडणुका होऊन काँग्रेस पक्ष सत्तेवर आला. या सरकारने साखळी योजना बंद करून पुन्हा जुन्या पद्धतीचे नियोजन सुरू केले.

**सहावी पंचवार्षिक योजना (१९८०-१९८५) :** या योजनेचा भर दारिद्र्यनिर्मूलन व रोजगार निर्मिती यांवर होता. योजनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती. अर्थव्यवस्थेच्या विकासदरात लक्षणीय वाढ करणे, गरिबी व बेकारी यांच्या प्रमाणात घट करणे, लोक छोटी कुटुंब पद्धती स्वेच्छेने स्वीकारतील असे धोरण ठेवून लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणे.

सहाव्या पंचवार्षिक योजनेत पुढील कार्यक्रम राबवण्यात आले.

* एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP)
* ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम (RLEGP)
* राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम (NREP)
* सलेम पोलाद प्रकल्प

**सातवी पंचवार्षिक योजना (१९८५-१९९०) :** या योजनेचा भर अन्न, रोजगार आणि उत्पादकता यांवर होता. विकास, आधुनिकीकरण, आत्मनिर्भरता, सामाजिक न्याय यांवर भर देणे, उत्पादनाच्या तंत्रांमध्ये सुधारणा करणे, राष्ट्रीय उत्पन्नात दरवर्षी ५% वाढ करणे, अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ

करणे ही या योजनेची उद्‌दिष्टे होती.

या योजनेत पुढील कार्यक्रम सुरू करण्यात आले.

✽ जवाहर रोजगार योजना ✽ इंदिरा आवास योजना ✽ दशलक्ष विहिरींची योजना

रोजगार निर्मितीच्या दृष्टीने सातवी पंचवार्षिक योजना महत्त्वपूर्ण ठरली.

**आठवी पंचवार्षिक योजना (१९९२–१९९७):** या योजनेत खासगी क्षेत्राला वाव देण्यात आला.

योजनेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती. राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर ६.५% इतका राखणे, लोकसंख्या वाढीला आळा घालणे, कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमाला उत्तेजन देणे, प्राथमिक शिक्षणाचा सार्वजनिक विस्तार करून निरक्षरतेचे उच्चाटन करणे.

या योजनेत पुढील कार्यक्रम सुरू करण्यात आले.

✽ प्रधानमंत्री रोजगार योजना ✽ महिला समृद्‌धी योजना ✽ राष्ट्रीय सामाजिक, आर्थिक साहाय्य योजना ✽ मध्यान्ह आहार योजना ✽ इंदिरा महिला योजना ✽ गंगा कल्याण योजना.

आठव्या पंचवार्षिक योजनेत खासगी क्षेत्राचे महत्त्व वाढले. १९९१ मध्ये स्वीकारलेल्या उदार व मुक्त धोरणाचे प्रतिबिंब या योजनेत दिसते.

**नववी पंचवार्षिक योजना (१९९७–२००२) :** कृषी व ग्रामीण विकास यांवर या योजनेत भर देण्यात आला. आर्थिक विकासाचा दर वाढवणे, पायाभूत क्षेत्रात निकोप स्पर्धा निर्माण करणे, परकीय गुंतवणुकीसाठी औद्योगिक धोरणाला नवी दिशा देणे ही या योजनेची उद्‌दिष्टे होती.

या योजनेत स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना, भाग्यश्री बालकल्याण योजना, राजराजेश्वरी महिला कल्याण योजना, स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजना, जवाहर ग्राम समृद्‌धी योजना, अंत्योदय अन्न योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना इत्यादी कार्यक्रम सुरू करण्यात आले.

या योजनेत संपर्क व्यवस्था आणि सेवा क्षेत्राची प्रगती अपेक्षित प्रमाणात साध्य झाली. बांधकाम, दळणवळण या क्षेत्रांत वाढ झाली.

### बँकांचे राष्ट्रीयीकरण

पंडित नेहरू आणि लालबहादूर शास्त्री या प्रधानमंत्र्यांच्या काळात भारतातील बँकिंग व्यवसाय खासगी क्षेत्राच्या मक्तेदारीचा व्यवसाय होता. या बँका उद्योग समूहांचे प्रतिनिधित्व करत होत्या. या बँकांचे संचालक मंडळ उद्योगांचा विकास व नफा वाढवण्यासाठी कार्यरत होते. याला छेद देण्यासाठी सरकारने १९५५ मध्ये ‘इम्पिरियल बँके’चे राष्ट्रीयीकरण केले आणि तिचे रूपांतर ‘भारतीय स्टेट बँके’त झाले. या बँकेने अल्पावधीत आपल्या शाखा देशभर उघडून शासकीय विकासात महत्त्वाची भूमिका बजावण्यास सुरुवात केली.

**राष्ट्रीयीकरणाची पार्श्वभूमी :** भारताने स्वातंत्र्योत्तर कालखंडात मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली होती. योजना राबवताना तूट निर्माण झाल्यास ती भरून काढण्यासाठी बँकांचे राष्ट्रीयीकरण होणे गरजेचे होते. राष्ट्रीयीकरण झाल्यावर या बँकांना मिळणारा



**माहीत आहे का तुम्हांला?**

प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी १९ जुलै १९६९ रोजी १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. यांत अलाहाबाद बँक, बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, कॅनरा बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, देना बँक, इंडियन बँक, इंडियन ओव्हरसीज बँक, पंजाब नॅशनल बँक, सिंडिकेट बँक, युनायटेड बँक ऑफ इंडिया, युनायटेड कमर्शियल बँक (युको बँक), युनियन बँक ऑफ इंडिया या १४ बँकांचा समावेश होता. १९८० मध्ये आणखी सहा बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

नफा सरकारी खजिन्यात जमा होणार होता. याच्याच जोडीला लघु व मध्यम उद्योगांचे विकासधोरण राबवणे आवश्यक होते. लालबहादूर शास्त्रींनी अन्नधान्य टंचाई आणि दुष्काळावर मात करण्यासाठी हरितक्रांतीचा प्रयोग हाती घेतला होता. प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात काँग्रेस पक्षातील समाजवादी विचारांनी प्रेरित झालेल्या 'काँग्रेस फोरम फॉर सोशॅलिस्ट ॲक्शन' या गटाने व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करावे अशी मागणी केली. कम्युनिस्ट पक्षाचाही या निर्णयाला पाठिंबा होता.

**वीस कलमी कार्यक्रम :** १ जुलै १९७५ रोजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी वीस कलमी कार्यक्रमाची घोषणा करून विकसित राष्ट्राच्या दिशेने वेगवान वाटचाल करण्याच्या प्रयत्नांचा संकल्प सोडला. यातील प्रमुख तरतुदी पुढीलप्रमाणे –

(१) शेती आणि शहरी भागातील कमाल जमीन धारणा, संपत्तीची समान वाटणी, शेतमजुरांना किमान वेतन, जलसंधारण योजनांत वाढ करणे.

(२) कामगारांचा उद्योगक्षेत्रात सहभाग, राष्ट्रीय प्रशिक्षण योजना आणि वेठबिगार मुक्ती करणे.


(३) करचुकवेगिरी, आर्थिक गुन्हे व तस्करी रोखणे.

(४) जीवनावश्यक वस्तूंचे दरनियंत्रण, रेशनिंग व्यवस्थेत सुधारणा करणे.

(५) हातमाग क्षेत्र विकासाद्वारे उत्तम वस्त्रोद्योग निर्मिती, दुर्बल घटकांची कर्जमुक्ती, घरबांधणी, दळणवळण सुविधा, शाळांसाठी शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे.

**कामगार समस्या :** ११ जुलै १८५१ रोजी मुंबईत पहिली कापड गिरणी कावसजी दावर यांनी सुरू केली. पुढे दादर, परळ, भायखळा, शिवडी, प्रभादेवी आणि वरळी येथे कापडगिरण्या सुरू झाल्या. हा भाग गिरणगाव म्हणून ओळखला जाऊ लागला.

८० च्या दशकात कामगारांमध्ये असंतोष निर्माण होण्यास अन्य क्षेत्रांतील आर्थिक परिस्थिती कारणीभूत



**कापड गिरणी**

होती. काही उद्योगांत कामगारांचे पगार वाढत होते. त्यांना बोनसची रक्कम जास्त मिळत होती. गिरणी कामगारांपेक्षा त्यांना जास्तीच्या सुविधा मिळत होत्या.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

महात्मा जोतीराव फुले यांचे सहकारी नारायण मेघाजी लोखंडे यांच्या प्रयत्नांमुळे १ जानेवारी १८८२ पासून गिरणी कामगारांना आठवड्यातून एक दिवस 'रविवारी' सुट्टी देण्यात यावी असा निर्णय झाला.

१९८१ च्या दिवाळीत कामगारांना २०% बोनसची अपेक्षा होती. कामगारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राष्ट्रीय मिल मजदूर संघाने मालकवर्गाशी वाटाघाटी करून, कामगार वर्गाला विश्वासात न घेता ८ ते १७% वर तडजोड केली. बोनसमधील कपात ही असंतोषाची ठिणगी ठरली. काही कामगार डॉ. दत्ता सामंत यांच्याकडे गेले. त्यांनी डॉ. दत्ता सामंत यांना नेतृत्व स्वीकारण्याची विनंती केली. ६५ गिरण्यांमधील कामगार एकत्र आले आणि दत्ता सामंत संपाचे नेतृत्व करू लागले. १८ जानेवारी १९८२ रोजी मुंबईत अडीच लाख कामगार संपावर गेले. गिरणगावची धडधड थांबली जणू मुंबईचे हृदयच बंद पडले.

**माहीत आहे का तुम्हांला?**

सांस्कृतिकदृष्ट्याही लोकनाट्य, लोककला, साहित्य या क्षेत्रांत कामगारवर्गाने मोठे योगदान दिलेले आहे. अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख, शाहीर साबळे इत्यादी अनेक लोकशाहीर प्रबोधनकारी कार्यक्रमामुळे लोकप्रिय होते. नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ इत्यादी कवींनी श्रमिकांचे वास्तव दर्शन आपल्या कवितांद्वारे घडवले होते.

मुख्यमंत्री बॅ.अ.रा.अंतुले यांनी ही समस्या सोडवण्यासाठी त्रिपक्षीय समिती नेमली. पुढे बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री झाले. कायद्यानुसार सरकार राष्ट्रीय मिल मजदूर संघाशीच बोलणे करेल अशी भूमिका त्यांनी घेतली. डॉ. दत्ता सामंत यांनी हा कायदा रद्द करण्याची मागणी केली.

संपाच्या सुरुवातीच्या काळात कामगारांना गावाकडून मदत सुरू झाली. सुरुवातीला एकमेकांना मदत करणे कामगारांना फारसे अवघड गेले नाही. विभागीय समित्या स्थापन करून त्यांनी अन्नधान्य, मदतनिधी यांचे वाटप केले. डाव्या पक्षांनी संपाला पाठिंबा दिला होता. संप रेंगाळायला लागताच कामगारांमध्ये फूट पाडण्याचे प्रयत्न सुरू झाले. संपाला ६ महिने पूर्ण झाले. केंद्र सरकारने संपाकडे पूर्ण दुर्लक्ष केले. कामगारांनी 'जेल भरो आंदोलन' सुरू केले. सप्टेंबर १९८२ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर दीड लाख कामगारांचा मोर्चा गेला. त्याचा उपयोग झाला नाही. संपाला एक वर्ष पूर्ण झाले. एवढा प्रदीर्घ काळ चाललेला हा पहिलाच संप होता. या कालावधीत सुमारे दीड लाख कामगार बेकार झाले.

कापडापेक्षा पॉलिएस्टरला महत्त्व आल्याने मुळातच गिरणीतील कापडाच्या खपावर परिणाम झाला होताच. मुंबईतून कापड गिरण्या सुरत आणि गुजरातमध्ये गेल्या. केंद्र सरकारने १३ गिरण्यांचे राष्ट्रीयीकरण केले. समस्या सोडवण्यासाठी लवाद नेमले गेले पण तो यशस्वी झाला नाही.

**नवे आर्थिक धोरण :** आधुनिक भारताच्या इतिहासात १९९१ साल महत्त्वाचे आहे. दहाव्या लोकसभा निवडणुकांनंतर केंद्रात पी. व्ही. नरसिंहराव प्रधानमंत्री झाले. त्यांनी अर्थमंत्री डॉ.मनमोहन सिंग यांच्या सहकार्याने भारताची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडण्यासाठी नवे आर्थिक धोरण स्वीकारले. यासाठी भारतीय अर्थव्यवस्थेत मूलभूत स्वरूपाचे बदल घडवले. भारतीय अर्थव्यवस्थेला जागतिक प्रवाहात आणले.



पी.व्ही. नरसिंहराव

या काळात भारताची आर्थिक अवस्था बिकट झाली होती. पी.व्ही.नरसिंहराव यांच्या अगोदर चंद्रशेखर यांचे सरकार होते. या सरकारच्या काळात चलनवाढीचा दर १७ टक्के होता. आर्थिक वृद्धी दर १.१ टक्क्यांनी घटला होता. आयातीसाठी आठवडाभर पुरेल एवढेच परकीय चलन भारताकडे होते. परकीय कर्जाची परतफेड करणे आणि त्यावरील व्याज देणे कठीण झाले होते. मे १९९१ मध्ये चंद्रशेखर यांच्या काळात सरकारने काही सोने विकून तर काही सोने गहाण टाकून परिस्थिती आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला होता. चंद्रशेखर यांच्या अगोदर विश्वनाथ प्रताप सिंग यांच्या सरकारने सगळ्या शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देऊन १० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त बोजा अर्थव्यवस्थेवर टाकला होता. केंद्र व राज्य सरकारांचे एकत्रित अंतर्गत कर्जाचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेले प्रमाण सुमारे ५५ टक्के एवढे झाले. १९८०-८१ मध्ये परकीय कर्ज २३५० कोटी डॉलर्स होते. ते १९९०-९१ मध्ये ८३८० कोटी डॉलर्सपर्यंत वाढले. या वेळेस भारताचा परकीय चलनसाठा फक्त १०० कोटी डॉलर्स होता. याला इराकने कुवेतवर आक्रमण

करून तेलाच्या वाढलेल्या किमतींची पार्श्वभूमी होती. भारताला परकीय कर्ज उभारणे अवघड झाले. अनिवासी भारतीयांनी आपल्या परकीय चलनातील ठेवी काढून घेण्यास सुरुवात केली.

**उपाययोजना :** या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी पी.व्ही. नरसिंह राव यांनी डॉ.मनमोहन सिंग यांना अर्थमंत्री नेमले. डॉ. मनमोहन सिंग यांनी दोषदुरुस्ती उपाययोजना (करेक्टिव्ह मेजर्स) केल्या. परिस्थिती बदलण्यास सुरुवात झाली.


डॉ.मनमोहन सिंग

त्यांनी परकीय गुंतवणुकीवरचे निर्बंध उठवले. उद्योग क्षेत्रातील परवाना पद्धती १८ उद्योगांपुरती मर्यादित केली. सार्वजनिक उद्योगांमधील वाढता तोटा व कार्यक्षमता लक्षात घेऊन सार्वजनिक क्षेत्रे खासगी उद्योगांकरिता खुली केली. शेअर बाजारावर नियंत्रण आणण्यासाठी १९९२ मध्ये सेबीची (सेक्युरिटिज् अॅण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया) स्थापना केली. नॅशनल स्टॉक एक्सचेंजचे संगणकीकरण करण्यात आले. मंदीचे सावट दूर करण्यास प्राधान्य दिले.

डॉ. मनमोहन सिंग यांच्या पहिल्या अर्थमंत्रीपदाच्या कारकिर्दीत भारतातील परकीय गुंतवणूक वाढली. भारताने बँक ऑफ इंग्लंडमध्ये गहाण ठेवलेले सोने परत भारतात आणले. देशातील भांडवलदारवर्ग व मध्यमवर्गाचा पाठिंबा सरकारला मिळाला. सरकारने दूरसंचारक्षेत्र खुले केल्यामुळे मोबाइल फोन सेवा देशभर सुरू झाली. डॉ. मनमोहन सिंग यांनी जागतिक व्यापार संघटनेच्या करारावर सही करून खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण यास सुरुवात केली.

**वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन (जागतिक व्यापार संघटना) :** भारताने १९९५ मध्ये 'वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन'चे (WTO) सदस्यत्व स्वीकारले. या संघटनेचा उद्‌देश पुढीलप्रमाणे होता –

देशा-देशांमधील व्यापार खुला करणे, आंतरराष्ट्रीय मुक्त व्यापाराला अडथळा आणणारे व भेदाभेद करणारे कायदे, निर्बंध, नियम व धोरणे संपुष्टात आणणे व जगभरातील व्यापाराचे रीतसर बहुपक्षीय यंत्रणेच्या माध्यमातून नियमन करणे.

WTO अस्तित्वात येण्यापूर्वी 'गॅट' अस्तित्वात होते. 'जनरल अॅग्रीमेंट ऑन टॅरिफ्स अँड ट्रेड' ही संघटना आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत होती. ती व्यापार नियमन करायची. भारतात WTO संदर्भात परस्परविरोधी टोकाची मते होती. असे असूनही WTO चे सदस्यत्व स्वीकारण्याचा निर्णय घेतला. 'जागतिक व्यापार संघटने'च्या तरतुदी अनुदाने, आयातनिर्यात, परकीय गुंतवणूक संरक्षित क्षेत्रे, शेती, तंत्रज्ञान आणि सेवा यांच्याशी संबंधित आहेत. भारत सदस्य झाल्यापासून वीज, पाणी, वाहतूक, शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांचे झपाट्याने व्यापारीकरण झाले. 'जागतिक व्यापार संघटने' च्या वेगवेगळ्या अहवालांनुसार दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येत घट, बालमृत्यूमध्ये घट, पिण्याचे पाणी, सांडपाणी यांबाबतच्या सोईसुविधा उपलब्धता यांत भारताने सुधारणा केलेल्या आहेत.

'जागतिक व्यापार संघटने'च्या धर्तीवर भारताने पुढे 'दक्षिण आशियाई प्राधान्य व्यापार करार' (साउथ एशिया प्रेफरेंशियल ट्रेड अॅरेंजमेंट – SAPTA) केला. भारताने सार्क देशांकरिता विविध वस्तूंच्या आयातीवरील निर्बंध उठवले. आयात शुल्कात सवलत दिली. भारतीय विमा क्षेत्र खासगी व परकीय गुंतवणुकीला खुले केले.

अशा रीतीने आपण स्वातंत्र्योत्तर भारताची आर्थिक वाटचाल अभ्यासली. मिश्र अर्थव्यवस्था ते जागतिकीकरण असा प्रवास आपण केला. पुढील पाठात भारताची अन्य क्षेत्रातील प्रगती पाहणार आहोत.

## स्वाध्याय

**१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) १९ जुलै १९६९ साली देशातील प्रमुख ........... बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

(अ) १२ (ब) १४ (क) १६ (ड) १८

(२) वीस कलमी कार्यक्रमाची............. यांनी घोषणा केली.

(अ) पं.नेहरू (ब) लालबहादूर शास्त्री

(क) इंदिरा गांधी (ड) पी.व्ही.नरसिंहराव

**(ब) पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखून लिहा.**

(१) कावसजी दावर – पोलादाचा कारखाना

(२) डॉ.दत्ता सामंत – गिरणी कामगारांचे नेतृत्व

(३) ना.मे.लोखंडे – गिरणी कामगारांना सुट्टी

(४) नारायण सुर्वे – कवितांद्वारे श्रमिकांच्या जीवनाचे दर्शन

**२. (अ) दिलेल्या सूचनेप्रमाणे कृती करा.**

पुढील तक्ता पूर्ण करा.

| पंचवार्षिक योजना | कालावधी | उद्दिष्टे |
|---|---|---|
| पहिली | ---- | शेती, सामाजिक विकास |
| दुसरी | १९५६-१९६१ | औद्योगिकीकरण |
| तिसरी | ---- | विषमतेचे निर्मूलन, रोजगार संधी विस्तार, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ |
| ......... | १९६९-१९७४ | शास्त्रीय संशोधन, आरोग्य व कुटुंबनियोजन ....... |
| पाचवी | ---- | ..................... |

**(ब) टीपा लिहा.**

(१) मिश्र अर्थव्यवस्था (२) वीस कलमी कार्यक्रम

**३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) स्वतंत्र भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला.

(२) १९६९ मध्ये बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

(३) गिरणी कामगार संपावर गेले.

**४. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) आठव्या पंचवार्षिक योजनेत कोणते कार्यक्रम सुरू करण्यात आले ?

(२) दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत कोणते प्रकल्प सुरू करण्यात आले ?

**उपक्रम**

(१) WTO या संघटनेची माहिती इंटरनेटच्या मदतीने मिळवा – बोधचिन्ह, सदस्य देश, उद्दिष्टे, कार्यक्रम इत्यादी.

(२) राष्ट्रीयीकृत बँकेस/शाखेस भेट देऊन त्यांच्या कामकाजाची माहिती मिळवा.

F2HZY6

# ५ शैक्षणिक वाटचाल

भारतीय शिक्षण व्यवस्थेतील मुख्य टप्पे आणि योजना यांचा थोडक्यात आढावा आपण या पाठात घेणार आहोत. प्राथमिक, माध्यमिक व उच्चशिक्षण यांचा विचार यात केलेला आहे. याच्याच जोडीला भारतातील काही प्रातिनिधिक क्षेत्रातील संशोधन संस्थांचा आढावा घेतला आहे. त्यावरून आपणांस देशभरातील शिक्षण व्यवस्थेची कल्पना येऊ शकेल.

भारतातील शिक्षणाचा प्रश्न किती जटिल आहे, याची प्रचिती आपणांस स्वतंत्र भारतातील पहिल्या इ.स.१९५१ च्या जनगणनेत आली. पहिल्या जनगणनेत साक्षरता प्रमाण १७% होते. ते पुढीलप्रमाणे वाढले.

| जनगणना वर्ष | साक्षरता |
| --- | --- |
| १९७१ | ३४% |
| १९८१ | ४३% |
| १९९१ | ५२% |
| २००१ | ६४% |

हे प्रमाण वाढवणे हे भारत सरकारपुढचे मोठे आव्हान होते. या आव्हानाचा सामना करण्यासाठी सरकारने अनेक उपाययोजना केल्या.

**प्राथमिक शिक्षण :** ६ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांना जे शिक्षण दिले जाते त्याला प्राथमिक शिक्षण म्हणतात. १९८८ मध्ये केंद्र सरकारने प्राथमिक शिक्षणाचा प्रसार व शैक्षणिक दर्जामध्ये सुधारणा करण्यासाठी 'खडू-फळा' योजना सुरू केली. ही योजना 'ऑपरेशन ब्लॅक बोर्ड' या नावाने ओळखली जाते. शाळांचा दर्जा सुधारणे, किमान शैक्षणिक गरजांची पूर्तता करणे, सुयोग्य अशा किमान दोन वर्गखोल्या, स्वच्छतागृह, दोन शिक्षकांपैकी एक स्त्री शिक्षिका, फळा, नकाशा, प्रयोगशाळा साहित्य, छोटेसे ग्रंथालय, मैदान, क्रीडा साहित्य यांसाठी सरकारने शाळांना निधी उपलब्ध करून दिला. या योजनेमुळे प्राथमिक शिक्षण व्यवस्था गतिमान होण्यास मदत झाली.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

महाराष्ट्र राज्याची (१९६०) स्थापना झाल्यानंतर शासनाने राज्याकरिता इयत्ता १ली ते ७ वी चा एकसारखा अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला. मुंबईच्या एस.टी.कॉलेजचे प्राचार्य सय्यद राऊफ यांच्याकडे अभ्यासक्रमाचा मसुदा तयार करण्याचे काम सोपवले होते.

१९९४ मध्ये या योजनेचा विस्तार करून १०० पेक्षा अधिक विद्यार्थी संख्या असणाऱ्या शाळांमध्ये एक जादा वर्गखोली व एका जादा शिक्षकाच्या नेमणुकीची तरतूद करण्यात आली. मुलींच्या शाळा, अनुसूचित जाती-जमाती बहुल असणाऱ्या शाळा, ग्रामीण भाग यास प्राधान्य देण्यात आले. शिक्षकभरतीत ५०% जागांवर स्त्रियांची नेमणूक करण्याचे बंधन राज्य सरकारवर घालण्यात आले. १९९४ मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी 'जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम' (DPEP) सुरू करण्यात आला. महाराष्ट्रासह सात राज्यांत हा उपक्रम सुरू झाला. प्राथमिक शाळेत मुलांची १००% उपस्थिती, विद्यार्थी गळती रोखणे, मुलींचे शिक्षण, दिव्यांगांसाठी शिक्षण, प्राथमिक शिक्षणावर संशोधन व मूल्यमापन, पर्यायी शिक्षण, समाजजागृती इत्यादी उपक्रमांचा समावेश यात होता. विद्यार्थ्यांचे योग्य पोषण व्हावे म्हणून १९९५ मध्ये 'मध्यान्ह भोजन योजना' सुरू करण्यात आली.

**हे जमेल का ?**

१९९१ मध्ये केरळ राज्य पूर्णतः साक्षर ठरले. महाराष्ट्र राज्य पूर्णतः साक्षर होण्यासाठी काय उपाययोजना करता येतील ?

### माहीत आहे का तुम्हांला ?

ताराबाई मोडक यांनी बोर्डी व कोसबाड येथे शैक्षणिक कार्याला सुरुवात केली. आदिवासी मुलांसाठी अंगणवाड्या सुरू केल्या. प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण, कुरणशाळा, तांत्रिक व्यावसायिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी खूप परिश्रम घेतले.

अनुताई वाघ यांनी ठाणे जिल्ह्यातील कोसबाड येथे आदिवासींच्या उन्नतीसाठी एक संस्था स्थापन केली. या संस्थेला 'कोसबाड प्रकल्प' म्हणून ओळखले जाते. आदिवासींच्या शिक्षणासाठी अनुताई वाघ यांनी पाळणाघरे, बालवाड्या, प्राथमिक शाळा, प्रौढ शिक्षण वर्ग, बालसेविका प्रशिक्षण महाविद्यालय इत्यादी शैक्षणिक संस्था सुरू केल्या आहेत.

**माध्यमिक शिक्षण :** भारत स्वतंत्र झाल्यावर शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांनी शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणण्याचे ठरवले. यासाठी 'विद्यापीठ शिक्षण आयोग' नेमण्यात आला होता. या आयोगाने माध्यमिक शिक्षणासंदर्भात एक स्वतंत्र आयोग नेमण्याची शिफारस केली. त्यानुसार १९५२-५३ मध्ये 'मुदलियार आयोग' नेमण्यात आला. या वेळी भारतात अकरावी + पुढची पदवीची ४ वर्षे किंवा ११+१+३ असा हा शिक्षणाचा आकृतिबंध होता.


मौलाना आझाद

**आयोगाचे कामकाज :** आयोगाने माध्यमिक शिक्षण, अभ्यासक्रमाचे स्वरूप, शिक्षणाचे माध्यम, अध्यापन पद्धती यांचा अभ्यास करून शिफारशी केल्या. या आयोगाने उच्च माध्यमिक वर्गांची संकल्पना मांडली होती. संपूर्ण देशभरात त्या व्यवस्थेची अंमलबजावणी करणे अवघड झाले.

### माहीत आहे का तुम्हांला ?

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ :** या संस्थेची स्थापना १ जानेवारी १९६६ रोजी पुणे येथे करण्यात आली. इयत्ता १० वी व १२ वी च्या शालान्त परीक्षा या मंडळामार्फत घेतल्या जातात. 'शिक्षण संक्रमण' हे मासिक मंडळाच्या वतीने प्रकाशित केले जाते.

**कोठारी आयोग :** १९६४ मध्ये डॉ.डी.एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमण्यात आला. या आयोगाच्या कामकाजात जे.पी.नाईक यांचे मोलाचे योगदान आहे. या आयोगाने माध्यमिक, उच्च माध्यमिक व विद्यापीठ स्तरावरील १०+२+३ या आकृतिबंधाचा पुरस्कार केला. १९७२ पासून ही व्यवस्था अमलात आली.


डॉ.डी.एस.कोठारी


कोठारी आयोगाने शिक्षणाची एकच राष्ट्रीय पद्धत असावी, मातृभाषा, हिंदी व इंग्रजी भाषांचा शिक्षणात समावेश करावा, शिक्षण तळापर्यंत झिरपण्यासाठी निरंतर शिक्षण, प्रौढशिक्षण, पत्राद्वारे शिक्षण, मुक्त विद्यापीठ असे उपक्रम सुचवले. अनुसूचित जाती-जमातींसारख्या उपेक्षित घटकांस प्राधान्य देणे,


जे.पी.नाईक

सरकारी अंदाजपत्रकात शैक्षणिक खर्चावरील तरतुदी वाढवणे अशा शिफारशी केल्या.

महाराष्ट्र राज्याने १०+२+३ ही शैक्षणिक रचना १९७२ मध्ये स्वीकारून १९७५ मध्ये दहावीची पहिली शालान्त परीक्षा घेतली.

**कोठारी आयोगाने सांगितलेली शिक्षणाची उद्‌दिष्टे**




## उच्च शिक्षण

**स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शिक्षण :** भारत स्वतंत्र झाल्यावर १९४८ मध्ये केंद्र सरकारने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ शिक्षण आयोगाची नियुक्ती केली. आयोगाकडे आर्थिक अनुदान, विद्यापीठांचा दर्जा व समन्वय ही कामे देण्यात आली.


डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन

**कार्यपद्‌धती :** आयोगाने पंचवार्षिक पद्‌धती स्वीकारली. विद्यापीठांना अनुदान मंजूर करून वाटप करण्याचे कार्य सरकारच्या वतीने करण्यास सुरुवात केली. विद्यापीठीय शिक्षण नियोजन, अभ्यासक्रमात सुसूत्रता, शिक्षणाद्‌वारे राष्ट्रीय गरजांना प्राधान्य, उच्च शिक्षणाच्या विविध योजनांची आखणी व अंमलबजावणी या गोष्टी आयोग करत आहे. आयोगाने विद्यापीठ विकास परिषदा स्थापणे, पदव्युत्तर अध्यापनासाठी प्रगत अध्यापन केंद्रे, नवी विद्यापीठे स्थापन करणे यात मोलाचे कार्य केले. भारतात दूरदर्शनचे आगमन झाल्यावर 'कंट्रिवाइड क्लासरूम' या कार्यक्रमाचे आयोगाच्या वतीने दूरदर्शनवरून प्रसारण करण्यात आले.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

१९६५ मध्ये महाराष्ट्रात कलाशिक्षणाचे धोरण आखण्यासाठी व ते कलासंस्थांद्‌वारे अमलात आणण्यासाठी कला संचालनालयाची स्थापना करण्यात आली. शालेय पातळीवर घेतल्या जाणाऱ्या 'ड्रॉइंग ग्रेड' परीक्षांचे आयोजन करण्याची जबाबदारी या विभागाने घेतली.

**नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग (NCERT) :** १ सप्टेंबर १९६१ रोजी दिल्ली येथे या संस्थेची स्थापना करण्यात आली. केंद्र सरकारला शालेय शिक्षणाच्या बाबतीत, सर्वंकष धोरणासंदर्भात आणि शैक्षणिक योजनांच्या अंमलबजावणीत मदत करणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे. शिक्षणविषयक संशोधन, विकास, प्रशिक्षण, विस्तार, शैक्षणिक कार्यक्रम, शालेय अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकांची पुनर्रचना यांची जबाबदारी NCERT कडे सोपवण्यात आली. या संस्थेने केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सहकार्याने शालेय अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकांची निर्मिती करण्यात मध्यवर्ती भूमिका बजावली. राज्य शासनास प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या संदर्भात सहकार्य व मार्गदर्शन NCERT ने उपलब्ध करून दिले. शिक्षकांसाठी मार्गदर्शिका, कार्यपुस्तिका, अध्यापन प्रशिक्षण, अध्ययन-अध्यापन तंत्राचा विकास, राष्ट्रीय स्तरावर प्रज्ञाशोध परीक्षा असे उपक्रम राबवले.

NCERT च्या धर्तीवर सर्व राज्यांत SCERT ही संस्था स्थापन करण्यात आली.

महाराष्ट्र राज्यासाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (MSCERT) ही संस्था १९८४ साली पुणे येथे स्थापन करण्यात आली. प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावणे, शिक्षकांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षण, अभ्यासक्रम व मूल्यमापन यांबाबत प्रशिक्षण देणे, विद्यार्थ्यांना दहावी व बारावी परीक्षेनंतर कोणते व्यावसायिक अभ्यासक्रम निवडावे याचे मार्गदर्शन करणे इत्यादी शैक्षणिक कामे ही संस्था करते. या संस्थेला 'विद्या प्राधिकरण' या नावाने संबोधण्यात येते. 'जीवन शिक्षण' हे मासिक या संस्थेमार्फत प्रकाशित केले जाते.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) या संस्थेची स्थापना २७ जानेवारी १९६७ रोजी पुणे येथे झाली. इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतच्या शालेय विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तके तयार करण्याचे काम बालभारती करते. मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, कन्नड, सिंधी, गुजराती, तेलुगु या आठ भाषांमधून पाठ्यपुस्तके तयार केली जातात. 'किशोर' हे विद्यार्थ्यांसाठीचे मासिक बालभारती प्रकाशित करते.


**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ :** या धोरणानुसार समाजाच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणात मूलभूत स्वरूपाचे बदल घडवण्यात आले. या धोरणात सर्व राज्यांकरिता किमान एक राष्ट्रीय अभ्यासक्रम सूचित करण्यात आला. त्यात भारतातील सर्व विद्यार्थ्यांना समान शैक्षणिक संधी उपलब्ध व्हावी अशी अपेक्षा आहे. प्रत्येक राज्यातील त्यांच्या सांस्कृतिक, भौगोलिक व ऐतिहासिक गरजांनुसार राष्ट्रीय अभ्यासक्रमात लवचीकता आणण्यास वाव दिलेला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ ची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर तयार करण्यात आलेल्या कृतिकार्यक्रमावर आधारित 'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम १९८८' तयार करण्यात आला.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**क्षमताधिष्ठित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम १९९५ :** प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम १९८८ कार्यान्वित होत असतानाच राष्ट्रीय स्तरावर किमान अध्ययनक्षमता निश्चित करण्यासाठी डॉ. आर. एच. दवे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली. दवे समितीने भाषा, गणित व परिसर अभ्यास या विषयांसाठी इयत्ता पाचवीपर्यंतच्या किमान अध्ययन क्षमतांचे तक्ते विकसित केले. त्यामध्ये एकाच इयत्तेमधील क्षमता कोणत्या क्रमाने विकसित व्हाव्यात हे दर्शवले होते.

**उपग्रह वापर :** १९७५ मध्ये शैक्षणिक कारणासाठी उपग्रहाचा वापर करणे साध्य करण्यात



एज्युसॅट उपग्रह

भारताने यश मिळवले. इस्रोचे शास्त्रज्ञ एकनाथ चिटणीस यांनी यात महत्त्वाची भूमिका बजावली.

स्पेस ॲप्लिकेशन सेंटर या अहमदाबाद येथील अंतरिक्ष उपयोग केंद्राच्या नेतृत्वाखाली 'साईट' (सॅटेलाईट इन्स्ट्रक्शनल टेलिव्हिजन एक्सपिरीमेंट) हा शैक्षणिक कारणासाठी प्रयोग करण्यात आला. 'उपग्रहाद्‌वारे शिक्षणप्रणाली' ही कल्पना येथून पुढे आली. या उपक्रमात अमेरिकेने भारताला मदत केली होती. यातूनच ग्रामीण भागात दर्जेदार शिक्षणाची सोय करणे शक्य झाले.

**इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ :** देशातील सर्वसामान्यांच्या घरात ज्ञानगंगा नेण्यासाठी या मुक्त विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. संयुक्त राष्ट्रे या संघटनेने १९७० हे वर्ष 'जागतिक शैक्षणिक वर्ष' घोषित केले होते. याच वर्षी भारत सरकारचे शिक्षण व समाजकल्याण खाते, माहिती व प्रसारण खाते, विद्यापीठ अनुदान आयोग व युनेस्को यांच्या संयुक्त विद्यमाने 'मुक्त विद्यापीठ' या विषयावर नवी दिल्ली येथे चर्चासत्र घेण्यात आले. या चर्चासत्रातून मुक्त विद्यापीठ स्थापन करण्याची कल्पना पुढे आली.

१९७४ मध्ये सरकारने पी.पार्थसारथी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. त्यांच्या सूचनांनुसार व शिफारशींनुसार २० सप्टेंबर १९८५ रोजी मुक्त विद्यापीठ आकारास आले. प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांचे नाव विद्यापीठाला देण्यात आले.

**जाणून घ्या.**

महाराष्ट्रामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक येथे १९८९ साली स्थापन करण्यात आले. या मुक्त विद्यापीठाबाबत आंतरजालाच्या (इंटरनेट) मदतीने माहिती करून घ्या.

या मुक्त विद्यापीठात ज्यांना औपचारिक पद्‌धतीत महाविद्यालयीन शिक्षण घेता आले नाही त्यांना प्रवेशासाठी पात्रता, वय व अन्य अटींमध्ये सूट देण्यात आली. विद्यापीठाने १९९० मध्ये आकाशवाणी व दूरदर्शनच्या माध्यमातून दृक्-श्राव्य पद्‌धतीने दूरस्थ शिक्षण कार्यक्रम सुरू केला. विद्यापीठाने विविध शाखांमधून एक हजारांहून अधिक अभ्यासक्रम राबवले. देशात ५८ प्रशिक्षण केंद्रे, परदेशात ४१ केंद्रे स्थापन करून विद्यापीठाने शिक्षणाची सोय केली.

## संशोधन संस्था – विज्ञान

स्वातंत्र्योत्तर काळात देशात वैज्ञानिक संशोधनाला चालना द्यावी व त्या संशोधनाचे लाभ सर्वांपर्यंत पोहचावेत म्हणून १९५० मध्ये 'कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च' या संस्थेची स्थापना झाली. पदार्थविज्ञान, रसायन, औषधे, अन्नप्रक्रिया, खाणकाम अशा क्षेत्रांत संशोधन सुरू झाले. या संस्थांमधील संशोधनाचा लाभ भारतातील उद्योगांना व्हावा म्हणून औद्योगिक संस्थांबरोबर करार करण्यात आले. त्यामुळे भारताची आयात कमी होऊन परकीय चलनाची बचत झाली. या संस्थेने मूलभूत संशोधनाला चालना दिली. उच्च शिक्षणासाठी परदेशात गेलेल्या विद्यार्थ्यांना भारतात परत येण्यासाठी या संस्थेच्या प्रयोगशाळांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

या संस्थेने मतदानाकरता बोटाला लावण्यात येणारी शाई, हिवताप, हत्तीरोग, क्षयरोग यांवरील औषधे, पाणीशुद्‌धीकरण तंत्रज्ञान, बांबू उत्पादन काळात कपात या गोष्टी केल्या. डीएनए फिंगर प्रिंटिंग तंत्रज्ञान भारतात सर्वप्रथम वापरणे, अंदमानातील आदिवासींचा जनुकीय अभ्यास करून त्या जमाती साठ हजार वर्षे जुन्या आहेत हे सिद्‌ध करणे, भूकंपाची आगाऊ सूचना मिळवणे इत्यादी गोष्टी या संस्थेने केल्या.

कडुनिंबाचा कीटकनाशक म्हणून वापर करणे, जखम बरी करण्यासाठी हळदीचा वापर, तांदळाच्या जातींसंदर्भातील स्वामित्व (पेटंट) या गोष्टींमध्ये CSIR या संस्थेने महत्त्वाची भूमिका बजावली. भारतीय परंपरागत ज्ञानाचा डिजिटल कोश तयार करून तो आठ आंतरराष्ट्रीय भाषांमध्ये CSIR ने उपलब्ध करून दिला.

**गणित :** तमिळनाडूमधील 'नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर रिसर्च इन द मॅथेमॅटिकल ॲण्ड फिजिकल सायन्स' ही संस्था १९६२ मध्ये स्थापन झाली होती. गणित विषयातील सर्वोच्च संशोधनाला या संस्थेने चालना दिली.

**संगणक :** १९६९ मध्ये आपण स्वदेशी बनावटीचा संगणक तयार केला. इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट आणि जादवपूर विद्यापीठ यांनी संयुक्तपणे 'आयएसआयजेयू' हा देशी बनावटीचा पहिला संगणक तयार केला. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस अर्थात 'टीसीएस' या कंपनीला १९७४ मध्ये अमेरिकेतून सॉफ्टवेअर निर्मिती क्षेत्रातील कंत्राट मिळाले आणि भारतात सॉफ्टवेअर उद्योगाची सुरुवात झाली. संगणकांमुळे शास्त्रीय संशोधनाचा वेग वाढला.

१९८७ मध्ये अमेरिकेने भारताला महासंगणक देण्यास नकार दिला. राजीव गांधी सरकारने स्वतःच महासंगणक विकसित करण्याचा निर्णय घेतला. १९८८ मध्ये केंद्र सरकारने पुणे येथे 'सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग' (सीडॅक) या संशोधन संस्थेची स्थापना केली. १९९१ मध्ये डॉ.विजय भटकर यांच्या नेतृत्वाखाली परम-८००० हा महासंगणक तयार केला.

**भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर (BARC) :** या संस्थेने न्यूक्लिअर फिजिक्स, सॉलिड स्टेट फिजिक्स, स्पेक्ट्रोस्कोपी केमिकल अँड लाईफ सायन्सेस अशा विविध विषयांत मोलाचे संशोधन केले. अणुभट्टी निर्मितीसाठी शास्त्रज्ञांना प्रशिक्षण देण्यासाठी ट्रेनिंग स्कूल काढण्यात आले.

## अभियांत्रिकी

**आयआयटी :** १९५१ मध्ये पश्चिम बंगालमधील खरगपूर येथे भारतातील पहिली इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (IIT) या संस्थेची स्थापना करण्यात आली. भारतात अभियांत्रिकीच्या सर्व शाखांमधील उच्च व प्रगत शिक्षण उपलब्ध होऊन देशाची गरज भागावी हा या संस्थेचा उद्देश होता. पवई (मुंबई), चेन्नई, कानपूर नंतर नवी दिल्ली येथील अभियांत्रिकी महाविद्यालयांचे आयआयटीमध्ये रूपांतर करण्यात आले. या संस्थांच्या उभारणीकरिता सोव्हिएत रशिया, अमेरिका, जर्मनी आणि युनेस्को यांनी मदत केली.

भारतातील आयआयटी या संस्थेला स्वायत्त विद्यापीठांचा दर्जा देऊन बी.टेक व एम.टेक अभ्यासक्रम सुरू करण्यात आले. प्रवेश परीक्षेद्वारे प्रवेश आणि माफक शुल्क व विद्यार्थ्यांसाठी आरक्षण हे आयआयटी या संस्थेचे वैशिष्ट्य आहे. १९७०-८० च्या दशकात या संस्थेतील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात परदेशी जाऊ लागले. यामुळे ब्रेन ड्रेनची समस्या (म्हणजे उच्चशिक्षित विद्यार्थी कायमस्वरूपी परदेशात जाणे) निर्माण झाली. १९९० नंतर मात्र ही परिस्थिती बदलली. १९९४ मध्ये गुवाहाटी (आसाम), २००१ मध्ये रुरकी येथे आयआयटी या संस्थेची स्थापना करण्यात आली.

**इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (IIM) :** आयआयटीमधून उच्च दर्जाचे अभियंते तयार होऊ लागल्यावर कुशल दर्जाचे व्यवस्थापक घडवण्यासाठी केंद्र व गुजरात राज्य सरकारने अहमदाबाद येथे या संस्थेची स्थापना केली. अमेरिकेच्या हॉर्वर्ड बिझनेस स्कूल या संस्थेने वरील संस्थेच्या उभारणीत मदत केली. कोलकता, बंगलोर, लखनौ, कोझिकोडे, इंदूर आणि शिलाँग येथे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (IIM) या संस्था स्थापन करण्यात आल्या.



**माहीत आहे का तुम्हांला?**

'फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' या संस्थेत चित्रपटनिर्मिती संदर्भातील शिक्षण मिळते. दिग्दर्शन, संकलन आणि अभिनय अशा चित्रपटांशी निगडित असणाऱ्या सर्वच गोष्टींचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्याची सोय या संस्थेत झाली. पुण्यातील 'प्रभात फिल्म कंपनी'चा वारसा या संस्थेला मिळाला.

**नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन (NID) :** १९६१ मध्ये अहमदाबाद येथे औद्योगिक आरेखन (इंडस्ट्रियल डिझायनिंग) या विषयाचे शिक्षण देण्यासाठी या संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेने १९६३-६४ मध्ये बेसिक डिझाइन, ग्राफिक डिझाईन, वस्तूंचे डिझाइन, व्हिज्युअल कम्युनिकेशन हे अभ्यासक्रम सुरू केले. या संस्थेने आकाशवाणी संच (ट्रान्झिस्टर), गणकयंत्र (कॅलक्युलेटर) या वस्तूंचे आरेखन (डिझाइन), इंडियन एअरलाइन्स व स्टेट बँक यांची बोधचिन्हे तयार करणे ही कामे केली आहेत.

## संशोधन संस्था – वैद्यक क्षेत्र

स्वातंत्र्योत्तर कालखंडात वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनासाठी १९४९ मध्ये 'भारतीय वैद्यकीय अनुसंधान परिषदे'ची **(ICMR)** स्थापना झाली. या संस्थेवर देशातील विद्यापीठे, वैद्यकीय महाविद्यालये, शासकीय व बिगरशासकीय संशोधन संस्था यांना संशोधनासाठी सहकार्य, मार्गदर्शन व आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देण्याची जबाबदारी देण्यात आली. विविध रोगांवर संशोधन करणारी २६ केंद्रे देशभरात सुरू झाली. या संस्थेच्या संशोधनामुळे क्षयरोग व कुष्ठरोगावर नियंत्रण मिळवणे शक्य झाले.

याच क्षेत्रातील प्रगत वैद्यकीय शिक्षण व संशोधनाला चालना देण्यासाठी 'ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस' **(AIIMS)** या संस्थेची स्थापना झाली. या संस्थेवर वैद्यकशास्त्राच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या शिक्षणाची जबाबदारी टाकली गेली. वैद्यकशास्त्राच्या बहुतांश शाखांमधील पदवी व पदव्युत्तर शिक्षणाच्या सुविधा असलेली महाविद्यालये, संशोधनाच्या चांगल्या सुविधा, सुसज्ज सार्वजनिक इस्पितळे ही या संस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये होत. सर्वसामान्यांना माफक दरात वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देणे, परिचारिकांच्या प्रशिक्षणासाठी स्वतंत्र महाविद्यालये, हृदयविकार, मेंदूविकार व नेत्रविकारांवर उपचार करण्यासाठी सुपर स्पेशालिटी केंद्रे या संस्थेने काढली. सरकारने वैद्यकीय क्षेत्राचा अधिक विकास करण्यासाठी १९५८ मध्ये 'मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया' या संस्थेचे पुनर्गठन केले. या संस्थेवर वैद्यकीय शिक्षणाच्या गुणवत्तेचे निकष निश्चिती व देखरेख आणि तपासणीची जबाबदारी टाकली.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

आयुर्वेद, निसर्गोपचार, युनानी व होमिओपॅथी या चिकित्सा पद्धतींमध्ये संशोधन व विकास घडवून आणण्यासाठी १९६९ मध्ये 'सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन इंडियन मेडिसिन अँड होमिओपॅथी' या संस्थेची स्थापना करण्यात आली होती. १९७९ मध्ये या संस्थेचे विसर्जन करून तीन नव्या संस्था स्थापण्यात आल्या. (१) सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन युनानी मेडिसिन (२) सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन होमिओपॅथी (३) सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन योग अँड नेचर क्युअर.

या संस्थांकडे त्या त्या चिकित्सापद्धतीनुसार विविध रोगांवर संशोधन, चाचण्या, औषधांच्या प्रमाणीकरणांची जबाबदारी सोपवण्यात आली.

**कर्करोग शिक्षण :** 'अॅडव्हान्स्ड सेंटर फॉर ट्रिटमेंट, रिसर्च अँड एज्युकेशन इन कॅन्सर' ही टाटा मेमोरियल सेंटरची शाखा आहे. कर्करोगावरील उपचार, संशोधन आणि कर्करोगासंबंधीच्या शिक्षणासाठी राष्ट्रीय स्तरावरील केंद्र म्हणून ही संस्था कार्यरत आहे.

## संशोधनसंस्था – कृषी

भारतात कृषी क्षेत्रातील संशोधन १९०५ मध्ये सुरू झाले. भारतीय कृषी संशोधन संस्थेला (इंडियन ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूट) १९५८ मध्ये विद्यापीठाचा दर्जा देण्यात आला. कृषी क्षेत्राचा

विकास, संशोधन, सुसज्ज प्रयोगशाळा, मृदाशास्त्र, कृषिशास्त्र, आर्थिक वनस्पतिशास्त्र इत्यादी विभागांद्वारे विद्यापीठाचे कार्य सुरू झाले.

या संस्थेच्या नवी दिल्ली येथील मुख्यालयात ग्रंथालय आहे. हे ग्रंथालय देशातील सर्वांत मोठे कृषीविषयक ग्रंथालय आहे. गहू, कडधान्ये, गळिताची पिके, भाजीपाला अशा अनेक गोष्टींवर संशोधन सुरू झाले. या संस्थेची सर्वांत महत्त्वाची कामगिरी म्हणजे एका वर्षात एकाहून अधिक पिके घेण्याच्या पद्धतींविषयी मूलभूत संशोधन येथे सुरू झाले. याचा फायदा शेतकऱ्यांना झाला.

पुढील पाठात आपण महिलांविषयीचे कायदे, स्त्रियांचे योगदान, अन्य दुर्बल घटकांच्या संदर्भात शासनाची भूमिका यांविषयी अभ्यास करणार आहोत.



## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) परम-८००० हा महासंगणक तयार करणारे शास्त्रज्ञ -
(अ) डॉ.विजय भटकर (ब) डॉ.आर.एच.दवे
(क) पी.पार्थसारथी
(ड) वरीलपैकी कोणीही नाही.

(२) जीवन शिक्षण हे मासिक ........ या संस्थेमार्फत प्रकाशित केले जाते.
(अ) बालभारती (ब) विद्या प्राधिकरण
(क) विद्यापीठ शिक्षण आयोग (ड) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

(३) आय.आय.टी. ही शैक्षणिक संस्था पुढील क्षेत्रातील शिक्षण देण्यासाठी प्रसिद्ध आहे.
(अ) कृषी (ब) वैद्यकीय (क) कुशल दर्जाचे व्यवस्थापक (ड) अभियांत्रिकी

**२. दिलेल्या सूचनेप्रमाणे कृती करा.**

(१) भारतातील शैक्षणिक क्षेत्रातील पुढील व्यक्ती व त्यांच्या कार्यासंबंधी तक्ता पूर्ण करा.

| व्यक्ती | कार्य |
|---|---|
| भारताचे पहिले शिक्षणमंत्री | ..................... |
| ................. | विद्यापीठ शिक्षण आयोगाचे अध्यक्ष |
| प्रा.सय्यद राऊफ | ..................... |
| ................... | कोसबाड प्रकल्प |

(२) 'नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग' या संस्थेची माहिती आंतरजालाच्या साहाय्याने मिळवा व ती माहिती ओघ तक्त्याच्या स्वरूपात लिहा.

**३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आला.
(२) NCERT ची स्थापना करण्यात आली.
(३) भारतीय कृषी संशोधन संस्थेद्वारे शेतकऱ्यांना फायदा झाला.

**४. टीपा लिहा.**

(१) इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ
(२) कोठारी आयोग
(३) भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर
(४) बालभारती

**५. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) 'खडू-फळा' (ऑपरेशन ब्लॅक बोर्ड) या योजनेत कोणत्या उपक्रमांचा समावेश होता ?
(२) शेतीच्या विकासात कृषी विद्यालये/महाविद्यालये कोणती भूमिका बजावतात ?
(३) भारताच्या वैद्यकीय क्षेत्रातील प्रगती विविध उदाहरणांच्या साहाय्याने स्पष्ट करा.
(४) तुमच्या शाळेत आयोजित करण्यात येणाऱ्या शालेय आणि सहशालेय उपक्रमांविषयी माहिती लिहा.

**उपक्रम**

तुमच्या शाळेत विज्ञान मेळावा आयोजित करा. त्यातून 'पाणी शुद्धीकरणा'बाबत जाणीव जागृतीसाठी प्रयत्न करा.

F2RVZT

# ६ महिला व अन्य दुर्बल घटकांचे सक्षमीकरण

स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात भाग घेतला होता. स्वातंत्र्योत्तर काळातही स्त्रियांचे योगदान सर्वच क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण आहे. त्याचा अभ्यास आपण या पाठात करणार आहोत. तसेच स्त्रियांच्या आणि अन्य दुर्बल घटकांच्या संदर्भातील कायद्यांचा अभ्यास करणार आहोत.

**हे माहीत करून घ्या.**

**दरहजारी पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण**

| अ.क्र. | जनगणना वर्ष | स्त्रियांचे प्रमाण |
|---|---|---|
| १. | १९५१ | ९४६ |
| २. | १९६१ | ९४१ |
| ३. | १९७१ | ९३० |
| ४. | १९८१ | ९३४ |
| ५. | १९९१ | ९२७ |
| ६. | २००१ | ९३३ |

दरहजारी पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण का घटत आहे या कारणांचा शोध घ्या.

भारतातील स्त्रियांच्या परिस्थितीचा अभ्यास करताना असे लक्षात येते, की त्यांच्या अनेक समस्यांचे मूळ पुरुषांच्या मानसिकतेत दडले आहे. आज आपण एकविसाव्या शतकात आलो तरी या पुरुषी मानसिकतेतून आपली सुटका झालेली नाही. महात्मा गांधीजींच्या तत्त्वज्ञानावर विश्वास ठेवून सुरू झालेल्या भूदान चळवळीत विनोबांनी स्त्री शक्तीचा उपयोग केला. स्त्री कार्यकर्त्या भारतभर भूदानाचा विचार घेऊन गेल्या. निजामशाही व सरंजामी व्यवस्थेला आव्हान देणाऱ्या तेलंगणातील शेतकऱ्यांच्या मुक्तिलढ्यात स्त्रियांचा सहभाग लक्षणीय होता. हा भाग वेठबिगारमुक्त झाल्याने स्त्रियांची या संकटातून मुक्तता झाली.

**स्त्रीशक्तीचा आविष्कार :** जीवनावश्यक वस्तूंची टंचाई आणि महागाई यांचा सर्वाधिक सामना करणाऱ्या स्त्रियांनी १९७२ मध्ये महाराष्ट्रात आपली संघटित ताकद दाखवून दिली. समाजवादी नेत्या मृणाल गोरे यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत महिलांनी लाटणे मोर्चा काढला. ऐन दिवाळीत तेल, तूप, साखर, रवा, मैदा या वस्तू मिळत नव्हत्या. रॉकेल महाग झाले होते. यामुळे महिलांनी एकत्र येऊन हातात लाटणे घेतले आणि मोर्चे काढले. या आंदोलनाला यश मिळाले आणि महिलांच्या सामूहिक शक्तीचा आविष्कार जनतेला समजला.



मृणाल गोरे

**चिपको आंदोलन :** स्त्रीशक्तीचा विधायक आविष्कार १९७३ च्या चिपको आंदोलनात दिसून आला. हिमालयाच्या पायथ्याशी असणाऱ्या जंगलातील झाडे व्यापारी उद्देशासाठी मोठ्या प्रमाणावर तोडली जाणार होती. या विरोधात चंडिप्रसाद भट्ट व सुंदरलाल बहुगुणा यांनी आंदोलन केले. स्त्रियांनी हातात हात घालून वृक्षाभोवती फेर धरण्याचे तंत्र अवलंबले. वृक्षतोड होऊ नये म्हणून जंगलातील झाडांना मिठी मारून त्यांचा बचाव करणे असे आंदोलनाचे स्वरूप असल्याने त्याला 'चिपको आंदोलन' म्हणतात. आंदोलनात स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. या परिसरातील कृषी अर्थव्यवस्थेत महिलांचा व्यापक सहभाग होता.



सुंदरलाल बहुगुणा



गौरादेवी

गौरादेवी या कार्यकर्तीने स्त्रियांमध्ये जागृती केली. त्यांना सुदेशादेवी, बचनीदेवी यांची मदत मिळाली.

**मद्यपानविरोधी आंदोलन :** १९९२ मध्ये आंध्र प्रदेशात 'मद्यपान-विरोधी चळवळ' सुरू झाली. पुढे त्याला विविध राज्यांमध्ये चांगला प्रतिसाद मिळाला. मद्यपानाच्या व्यसनामुळे घरातील कर्ता पुरुष अकाली मृत्यू पावल्यास घरातील अन्य सदस्यांवर संकट ओढवते. याचा सर्वाधिक फटका स्त्रियांना बसतो. दारूमुळे दु:ख, दैन्य यांचा सामना करावा लागतो. या आंदोलनाला आंध्र प्रदेशातील 'अरक' विरोधी आंदोलन उपयोगी पडले.

आंध्र प्रदेशात सरकारी धोरणामुळे अरक (स्थानिक दारू) विक्रेत्यांनी गावोगावी दुकाने उघडली. गावोगावची गरीब, कष्टकरी जनता दारूच्या आहारी गेली होती. अशातच राज्यात साक्षरता कार्यक्रम खेड्यापाड्यांत राबवला जात होता. या कार्यक्रमात 'सीतामा कथा' (सीतेची गोष्ट) सांगितली जायची. सीता गावकऱ्यांत जागृती निर्माण करून दारूला कशी अटकाव करते हे या कथेत सांगितले होते. १९९२ मध्ये आंध्र प्रदेशातील नेल्लोर जिल्ह्यातील दुबागुंटा गावात तीन तरुण दारूच्या नशेत एका तळ्यात बुडून मरण पावले. या घटनेच्या निमित्ताने गावातील महिला एकत्र आल्या. त्यांनी अरक विक्रीचे दुकान बंद पाडले. ही बातमी स्थानिक वर्तमानपत्रात छापून येताच गावोगावी तिचा परिणाम झाला. राज्यभर आंदोलन पसरल्याने सरकारने दारूविक्री विरोधात कडक धोरण स्वीकारले.

**आंतरराष्ट्रीय महिला वर्ष :** संयुक्त राष्ट्रे या संघटनेने १९७५ हे 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून घोषित केले होते. शांतता, विकास आणि स्त्री-पुरुष समानता ही या कार्यक्रमाची त्रिसूत्री होती. भारत सरकारने १९७५ मध्ये डॉ. फुलरेणू गुहा यांच्या अध्यक्षतेखाली महिला आयोगाची स्थापना केली. स्त्रियांचे सामाजिक स्थान, त्यांचा दर्जा, स्त्रियांसंदर्भातील घटनात्मक तरतुदींचे परिणाम तसेच स्त्रियांचे शिक्षण व त्याची टक्केवारी, शिक्षणामुळे त्यांचा झालेला विकास, नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या अडचणी, स्त्रियांची रोजगारासंदर्भातील वर्तमान परिस्थिती, त्यांचे वेतन (पुरुषांच्या तुलनेत) स्त्री-पुरुष प्रमाण, जन्म-मृत्यू दर, स्त्रियांची भूमिका अशा सर्वंकष मुद्द्यांच्या आधारे पाहणी करण्यात आली.



डॉ.फुलरेणू गुहा

या सगळ्या पार्श्वभूमीचा विचार करून महाराष्ट्रात १९७५ मध्ये 'स्त्रीमुक्ती संघर्ष समिती'च्या वतीने स्त्रियांसाठी राज्यव्यापी परिषद झाली. सर्वच क्षेत्रांतील स्त्रियांचा या परिषदेत सहभाग होता. १९७८ मध्ये समितीचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. लिंगभेद, जातिभेद, वर्णभेद या असमान घटकांच्या विरोधात संघर्ष छेडण्याचे धोरण ठरले. यातूनच 'स्त्रीमुक्तीची ललकारी' हा गीतसंग्रह, ज्योती म्हापसेकर यांचे 'मुलगी झाली हो' हे पथनाट्य, 'प्रेरक ललकारी' हे मुखपत्र असे उपक्रम सुरू झाले. १९७७ मध्ये सौदामिनी राव यांनी स्थापन केलेली पुण्यातील 'स्त्रीमुक्ती आंदोलन समिती', 'बायजा' हे द्वैमासिक, औरंगाबादमध्ये 'स्त्री उवाच', 'मैत्रीण', 'स्त्री अन्यायविरोधी मंच', कोल्हापूरमध्ये 'महिला दक्षता समिती', नाशिकमध्ये 'महिला हक्क', लातूरमधील 'नारी प्रबोधन मंच' असे गट तयार झाले. महाराष्ट्रभर हुंडा विरोधी संरक्षण समित्या स्थापन झाल्या. धुळे शहरात स्त्री अत्याचारविरोधी परिषद आयोजित करण्यात आली होती.

विद्या बाळ यांची 'नारी समता मंच' आणि 'मिळून साऱ्याजणी' ही नियतकालिके, समाजवादी

महिला सभा, क्रांतिकारी महिला संघटना यांचेही कार्य स्त्री प्रश्नांच्या संदर्भात महत्त्वाचे ठरले. महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेने स्त्री सबलीकरणास मदत केली.

प्रमिला दंडवते यांनी दिल्लीत १९७६ मध्ये 'महिला दक्षता समिती' स्थापली. आंध्र प्रदेश, तमिळनाडू, केरळ, ओडिशा, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, पंजाब या राज्यांतून या समितीच्या शाखा निघाल्या. कम्युनिस्ट पक्षाने 'अखिल भारतीय जनवादी महिला संघटना' १९८० मध्ये स्थापन केली. या संघटनेच्या शाखा भारतभर काढण्याचे प्रयत्न केले गेले. संघटनेने हुंडा, स्त्री भ्रूणहत्या, कौटुंबिक अत्याचार या प्रश्नांवर संघर्ष छेडला. विविध पातळ्यांवर स्त्री प्रश्नांवर संशोधन सुरू झाले. भारतातील पहिले महिला विद्यापीठ श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई, टाटा समाज विज्ञान संस्था, मुंबई, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे स्त्री अभ्यास केंद्रे स्थापण्यात आली. आलोचना व दृष्टी या केंद्रांनी सुद्धा या प्रश्नी महत्त्वाची भूमिका बजावली.



प्रमिला दंडवते

**स्त्रियांच्या संदर्भातील कायदे :** १९५२ च्या कायद्यानुसार भारत सरकारने हिंदू स्त्रियांना पोटगीचे अधिकार दिले. वडिलांच्या संपत्तीत वाटा देण्यात आला. स्त्रीधनावर तिचा अधिकार निर्माण झाला. बहुपत्नित्व संपुष्टात येऊन पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही घटस्फोटाचा अधिकार देण्यात आला. पुढच्या दशकभरात स्त्रियांच्या संदर्भात एक पाऊल पुढे टाकणारा कायदा झाला. 'हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१' अन्वये हुंडा घेणे अथवा मागणे हा फौजदारी स्वरूपाचा गुन्हा ठरवण्यात आला. हुंडा प्रथेचे निर्मूलन करून सामाजिक चळवळीला प्रोत्साहन देण्यात आले. या कायद्यामुळे हुंड्यासारख्या अनिष्ट प्रथेमुळे स्त्रियांना होणारा त्रास कमी झाला. त्यापुढे स्त्रियांना बाळंतपणाची सुटी मिळवून देणारा 'प्रसूती सुविधा अधिनियम' (मॅटर्निटी बेनिफिट ॲक्ट – १९६१) हा कायदा अस्तित्वात आला. या कायद्याने स्त्रियांना बाळंतपणासाठी रजा मिळवण्याचा अधिकार मिळाला.

**हुंडा प्रथेच्या विरोधात जागृती :** भारतात हुंडा बंदी कायदा असला तरी वर्तमानपत्रांतून 'स्वयंपाक करताना पदर पेटून महिलेचा मृत्यू', 'धुणे धुताना पाय घसरून विहिरीत पडून स्त्रीचा मृत्यू' अशा बातम्या येत. याच्या खोलवरच्या चौकशीत हुंडा हेच कारण कितीतरी वेळा पुढे आले होते. पोलिस, प्रशासन, न्याय व्यवस्था यांच्या भूमिका समोर आल्या. यातून जागृती घडली. यामुळे १९८४ मध्ये 'हुंडाबंदी सुधारणा कायदा' अस्तित्वात आला. १९८८ मध्ये २२०९ स्त्रिया, १९९० मध्ये ४८३५, १९९३ मध्ये ५३७७ स्त्रिया हुंडाबळी ठरल्या. या आकडेवारीवरून आपणांस या प्रश्नाची तीव्रता लक्षात येईल.

**कौटुंबिक न्यायालय (१९८४) :** विवाहासंदर्भातील वाद, सांसारिक समस्या व त्यांतून निर्माण होणारे प्रश्न, पोटगी, एकल पालकत्व, विभक्त राहणे, अपत्यांचे संगोपन व मालकी अशा कुटुंबव्यवस्थेशी निगडित वादांची सोडवणूक करण्यासाठी कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्यात आली. या न्यायालयात साक्षी, पुरावे तपासण्यापेक्षा सामंजस्य आणि वकिलांऐवजी समुपदेशकांना प्राधान्य देण्यात आले. प्रकरणे वेगाने पण न्याय्य पद्धतीने सोडवण्यावर भर देण्यात आला.

**पोटगीबाबतचा खटला (१९८५) :** एखाद्या विवाहित महिलेला तिच्या नवऱ्याने घटस्फोट दिल्यावर तिच्या उदरनिर्वाहाचे साधन म्हणून तिला दरमहा ठरावीक रक्कम नवऱ्याने देणे याला पोटगी असे म्हणतात. सर्वोच्च न्यायालयात मोहम्मद अहमद खान विरुद्ध शाहबानो बेगम खटल्यात शाहबानो

यांस पोटगी मागण्याचा अधिकार आहे असा निर्णय न्यायालयाने दिला. मात्र धार्मिक संघटनांनी याविरुद्ध गदारोळ केला. परिणामतः संसदेत 'मुस्लिम वुमेन ॲक्ट' (प्रोटेक्शन ऑफ राईट्स ऑन डायव्होर्स) संमत झाला.

**सती प्रतिबंधक कायदा :** ४ सप्टेंबर १९८७ रोजी राजस्थानातील देवरा गावात रूपकुंवर नावाची विवाहिता सती गेली. ती स्वेच्छेने सती गेली नाही. तिला सती जाण्यासाठी प्रवृत्त करण्यात आले. तिचे सती जाणे, सती प्रथेचे उदात्तीकरण करणे या सर्वच गोष्टी बेकायदेशीर होत्या. मीना मेनन, गीता सेधू, सुजाता आनंदन, अनू जोसेफ, कल्पना शर्मा या स्त्री मुक्तिवादी कार्यकर्त्या आणि पत्रकार यांनी या प्रकरणी सत्यशोधन केले. सरकारने १९८८ मध्ये कडक तरतुदी करून 'सती प्रतिबंधक कायदा' संमत करण्यात आला.

**मानव अधिकार संरक्षण कायदा :** स्त्री आणि पुरुष यांच्यावरील अन्याय दूर व्हावा म्हणून १९९३ मध्ये हा कायदा करण्यात आला. यासाठी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची नेमणूक करण्यात आली. त्याच धर्तीवर काही राज्यांमध्ये 'राज्य मानवाधिकार आयोग' स्थापन झाले. या कायद्यानुसार सामूहिक अत्याचार, घटस्फोटित महिलांची सामाजिक स्थिती, स्त्रिया व सुरक्षित कार्यस्थळ अशा विविध गोष्टींवर कायद्याने प्रभावी भूमिका बजावून स्त्रियांवरील अन्याय कमी करण्यास मदत केली.

**महिलांसाठी आरक्षण :** ७३ आणि ७४ व्या संविधान दुरुस्तीने ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिकांमध्ये एक तृतीयांश जागा स्त्रियांसाठी राखून ठेवल्या आहेत. सरपंच, अध्यक्ष, नगराध्यक्ष, महापौर या पदांसाठीही एक तृतीयांश पदे स्त्रियांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत. देशातील महाराष्ट्रासह अन्य १५ राज्यांत महिलांसाठी ५०% आरक्षण देण्यात आले आहे. या तरतुदीमुळे महिलांना राज्यकारभारात सहभाग घेण्याची संधी मिळते.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय संविधानाने स्त्री-पुरुष समतेची तत्त्वे स्वीकारली. त्यामुळे मतदानासारखा महत्त्वाचा राजकीय हक्क स्त्रियांना मिळाला. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना शिक्षणाच्या, रोजगाराच्या समान संधी उपलब्ध करून दिल्या गेल्या. सती, हुंडा, बहुपत्नीत्व यांसारख्या दुष्ट प्रथांवर कायद्याने बंदी घातली. स्त्रियांचा घटस्फोटाचा अधिकार मान्य करण्यात आला. त्यांना मालमत्तेतही कायदेशीर वाटा दिला गेला. राजकीय सत्तेत स्त्रियांना न्याय्य वाटा देण्याच्या हेतूने स्थानिक शासन संस्थांमध्ये काही जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत. या सर्व तरतुदींमुळे आज आपल्याला असे दिसते, की स्त्रिया शिक्षण घेऊन अर्थार्जन करू लागल्या आहेत. स्त्री-मुक्तीच्या विचाराने स्त्रियांना आत्मभान येत आहे. शिक्षण, अर्थार्जन, प्रशासन, राजकारण या सर्व क्षेत्रांत स्त्रिया हिरीरीने भाग घेऊ लागल्या आहेत.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

**भारतातील महिला मुख्यमंत्री**

सुचेता कृपलानी (उत्तर प्रदेश), नंदिनी सत्पथी (ओडिशा), जयललिता (तमिळनाडू), मायावती (उत्तर प्रदेश), वसुंधरा राजे (राजस्थान), ममता बॅनर्जी (प.बंगाल), राबडीदेवी (बिहार), आनंदीबेन पटेल (गुजरात), शीला दीक्षित (दिल्ली), मेहबूबा मुफ्ती सयिद (काश्मीर), उमा भारती (मध्य प्रदेश), राजेंद्रकौर भट्टल (पंजाब), सुषमा स्वराज (दिल्ली), शशिकला काकोडकर (गोवा), सयिदा अन्वर तैमूर (आसाम), जानकी रामचंद्रन (तमिळनाडू) या महिलांनी मुख्यमंत्री म्हणून आपापल्या राज्याचे नेतृत्व केले.

**माहीत आहे का तुम्हांला?**

न्यूयॉर्क शहरात ८ मार्च १८५७ रोजी एक मोर्चा निघाला होता. कामाचे तास कमी करावे, योग्य मोबदला मिळावा, पाळणाघरे असावीत इत्यादी मागण्यांसाठी निघालेला हा कामकरी महिलांचा पहिलाच मोर्चा होता. याच मागण्यांसाठी ८ मार्च १९०९ रोजी महिलांनी संप केला. परिणामी डेन्मार्कला झालेल्या 'वुमेन्स सोशलिस्ट इंटरनॅशनल'च्या बैठकीत हा 'महिलांच्या लढ्याचा दिवस' म्हणून जाहीर झाला. १९७५ हे 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून साजरे झाले, तर १९७७ मध्ये तत्कालीन संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने ठराव करून ८ मार्च हा दिवस 'जागतिक महिला दिन' म्हणून जाहीर केला.

**अनुसूचित जाती :** स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या संविधानाने स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व सामाजिक न्याय या मूल्यांचा पुरस्कार केला. त्याला अनुसरून अस्पृश्यतेच्या रूढीवर कायद्याने बंदी आणली. संविधानाच्या १७ व्या अनुच्छेदानुसार अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आणि अस्पृश्य वर्गाचा समावेश अनुसूचित जातींमध्ये करण्यात आला. अनुसूचित जातींचे सामाजिक व आर्थिक मागासलेपण लक्षात घेऊन त्यांचा विकास साधता यावा म्हणून त्यांना शिक्षणात व नोकऱ्यांत प्रतिनिधित्व देण्यात आले.

**अनुसूचित जमाती :** अनुसूचित जातींप्रमाणेच देशाच्या दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी समाजाचेही काही प्रश्न आहेत. आधुनिक सुधारणांपासून दूर राहिल्यामुळे त्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती मागासलेली आहे. अलीकडे आदिवासी जमातींच्या परिस्थितीत सुधारणा होत असली तरी जंगल उत्पादने व शेतीशिवाय त्यांना उपजीविकेचे अन्य साधन नाही. शेती करण्याची आधुनिक अवजारे त्यांच्यापर्यंत पोहचली नाहीत. त्यामुळे शेतीतून त्यांना मिळणारे उत्पन्न अत्यल्प असते. शिवाय त्यांची शेती डोंगरमाथ्यावर असते, ती सुपीक नसते. निकृष्ट व अपुऱ्या आहारामुळे त्यांचे पोषण व्यवस्थित होत नाही. दुर्गम भागातील आदिवासींना वेळेवर वैद्यकीय मदत मिळणे कठीण जाते. यासाठी आदिवासी जमातींना विशेष संरक्षण देण्याची गरज आहे.

भारतीय संविधानात आदिवासींना 'अनुसूचित जमाती' म्हणून गणले आहे. त्यांना कायदेमंडळ, शिक्षण, सरकारी सेवा, इत्यादी क्षेत्रांत प्रतिनिधित्व देण्यात आले.

**भटक्या व विमुक्त जाती-जमाती :** उदरनिर्वाहासाठी गावोगावी फिरत राहणाऱ्या जाती-जमातींचा 'भटक्या जमाती' या गटात समावेश होतो. पशुपालन व अन्य स्वरूपाचे व्यवसाय करून हे गट आपली उपजीविका करतात. ब्रिटिशांनी यातील काही जमातींवर गुन्हेगारी जमाती असा शिक्का मारला. ब्रिटिशांनी १८७१ सालच्या गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्यांतर्गत या जमातींपैकी प्रमुख गटांचा 'गुन्हेगारी जमाती' म्हणून उल्लेख करण्यात आला आणि त्यांचे व्यवसाय व हालचाली यांवर निर्बंध घालण्यात आले.

स्वातंत्र्योत्तर काळात हा अन्यायकारक कायदा रद्द करण्यात आला. या जमातींवरील बंधने उठवण्यात आली. अशा जमातींचा समावेश 'विमुक्त जमाती' या गटात करण्यात आला. त्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी शासनामार्फत विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. शैक्षणिक संस्था व शासकीय क्षेत्रात या जमातींना प्रतिनिधित्व देण्यात आलेले आहे.

**अल्पसंख्याक :** एखाद्या समाजात धार्मिक, भाषिक किंवा वांशिकदृष्ट्या संख्येने कमी असलेल्या व्यक्तींचा समूह होय. आपल्या देशात विविध धर्म, पंथ आणि भाषा असल्यामुळे भारतात सांस्कृतिक विविधता आहे. सांस्कृतिक परंपराही वेगवेगळ्या

आहेत. या सांस्कृतिक परंपरा जपता याव्यात, आपल्या वैशिष्ट्यपूर्ण भाषेचा विकास करता यावा यांसाठी संविधानाने नागरिकांना सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क दिले आहेत. अल्पसंख्य असलेल्या गटांना आपापली भाषा, संस्कृती, परंपरा यांचे रक्षण आणि संवर्धन करण्याचा हक्क आहे. त्यासाठी स्वतंत्र शिक्षण संस्था स्थापन करण्याचा त्यांना हक्क आहे. त्यांची प्रगती साधण्यासाठी शासनामार्फत विविध योजना राबवल्या जातात.

पुढील पाठात आपण भारताने स्वातंत्र्योत्तर काळात विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रांत केलेल्या प्रगतीविषयी माहिती घेणार आहोत.



## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) इ.स.१९९२ मध्ये ....... या राज्यात मद्यपानविरोधी चळवळ सुरू करण्यात आली.
(अ) महाराष्ट्र (ब) गुजरात
(क) आंध्र प्रदेश (ड) उत्तराखंड

(२) भारत सरकारने १९७५ मध्ये ........ यांच्या अध्यक्षतेखाली महिला आयोगाची स्थापना केली.
(अ) डॉ.फुलरेणू गुहा (ब) उमा भारती
(क) वसुंधरा राजे (ड) प्रमिला दंडवते

**२. पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखून लिहा.**

(१) सौदामिनी राव – स्त्रीमुक्ती आंदोलन समिती
(२) विद्या बाळ – नारी समता मंच
(३) प्रमिला दंडवते – महिला दक्षता समिती
(४) ज्योती म्हापसेकर – महिला आयोग

**३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) स्त्री मुक्ती चळवळीस सुरुवात झाली.
(२) १९८४ मध्ये हुंडाबंदी सुधारणा कायदा करण्यात आला.
(३) अस्पृश्यतेच्या रूढीवर कायद्याने बंदी आणली.
(४) संविधानाने अल्पसंख्याकांना सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क दिले आहेत.

**४. टीपा लिहा.**

(१) चिपको आंदोलन
(२) मानव अधिकार संरक्षण कायदा

**५. पुढील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

स्त्रियांची एकत्रित शक्ती विविध क्षेत्रांत सुधारणात्मक बदल घडवून आणू शकते, हे विविध उदाहरणांनी स्पष्ट करा.

### उपक्रम

(१) ग्रामीण भागातील महिला सभांच्या कामकाजाची माहिती मिळवा.
(२) विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या स्त्रियांची माहिती असणारी संचायिका (portfolio) तयार करा.
(३) महिला बचत गटाच्या कामकाजाची माहिती मिळवून लिहा.

F31S2G

# ७ विज्ञान व तंत्रज्ञान

स्वातंत्र्योत्तर भारताची विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रांतील कामगिरी या पाठात आपण अभ्यासणार आहोत. तसेच विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रांतील महत्त्वाच्या संस्था आणि त्यांचे योगदान यांचाही अभ्यास करणार आहोत.

**भारतीय अणुऊर्जा आयोग :** भारताचे प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांना वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवून राष्ट्राची प्रगती साधायची होती. या विचारातूनच त्यांनी १० ऑगस्ट १९४८ रोजी अणुऊर्जा आयोगाची स्थापना केली. आयोगाचे पहिले अध्यक्ष म्हणून डॉ.होमी भाभा यांची नेमणूक झाली. अणुऊर्जेपासून वीजनिर्मिती, अन्नधान्य उत्पादन वाढवणे व ते टिकवणे, यासाठीचे प्रगत तंत्रज्ञान उभारणे, नॅनो टेक्नॉलॉजी विकसित करणे अशी अणुऊर्जा आयोगाची उद्दिष्टे होती. १९५६ मध्ये या विभागाने अणुऊर्जेवर चालणारी भारताची पहिली अणुभट्टी 'अप्सरा' कार्यान्वित केली.


डॉ. होमी भाभा

१९६९ मध्ये अणुऊर्जेपासून विद्युतनिर्मिती करण्यासाठी मुंबईजवळ तारापूर येथे अणुशक्ती केंद्राची स्थापना झाली. थोरियमचा विद्युतनिर्मितीसाठी उपयोग साध्य करण्यासाठी तमिळनाडू राज्यात कल्पकम येथे 'रिॲक्टर रिसर्च सेंटर' सुरू करण्यात आले. अणुऊर्जेच्या विकासात रिॲक्टर्सची भूमिका महत्त्वाची असते.

अणुशक्तीच्या निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या 'जड पाण्याचे' कारखाने वडोदरा, तालचेर, तुतिकोरिन, कोटा इत्यादी ठिकाणी उभारले आहेत. अणुभट्ट्यांसाठी जड पाण्याचे (हेवी वॉटर) देशांतर्गत मोठ्या प्रमाणावर उत्पादन व संशोधन करण्यासाठी 'हेवी वॉटर प्रोजेक्ट्स' या संस्थेची उभारणी करण्यात आली. पुढे याच संस्थेचे 'हेवी वॉटर बोर्ड' असे नामकरण झाले.

**माहिती मिळवा.**

२८ फेब्रुवारी हा दिवस देशभर 'विज्ञान दिन' म्हणून साजरा करण्यात येतो.

या दिवशी शाळेत तुम्ही कोणते उपक्रम राबवता ?

**ध्रुव अणुभट्टी :** मुंबईजवळील तुर्भे येथे १९८५ मध्ये संपूर्णपणे भारतीय बनावटीची ध्रुव अणुभट्टी सुरू करण्यात आली. युरेनियमच्या धातूचा इंधन म्हणून वापर करण्यासाठी ध्रुव अणुभट्टीचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो. तुर्भे येथील केंद्रात सुमारे ३५० किरणोत्सारी पदार्थांची निर्मिती केली जाते. त्यांचा उपयोग उद्योग, शेती व वैद्यक क्षेत्रात केला जातो.

**न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (NPCIL) :** अणुऊर्जेपासून विद्युतनिर्मिती करण्यासाठी १९८७ मध्ये या कंपनीची स्थापना करण्यात आली. सुरक्षित, स्वस्त आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातून फायदेशीर विद्युतनिर्मितीचे तंत्रज्ञान सिद्ध करणे आणि त्याचा विकास करून देशाला स्वावलंबी करणे हे कंपनीचे उद्दिष्ट आहे.

### अणुचाचणी


डॉ. होमी सेठना

**पोखरण येथील पहिली अणुचाचणी :** शांतता व स्वयंपूर्णतेसाठी अणुऊर्जेचा उपयोग या धोरणास अनुसरून भारताने १८ मे १९७४ रोजी राजस्थानमधील पोखरण येथे पहिली अणुचाचणी



डॉ.राजा रामण्णा

यशस्वी केली. भारताने हा निर्णय घेण्यास चीनची अण्वस्त्रसज्जता आणि पाकिस्तानची चीनच्या मदतीने अण्वस्त्रसज्ज होण्यास चाललेली धडपड कारणीभूत होती. अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष डॉ. होमी सेठना व भाभा आण्विक संशोधन केंद्राचे संचालक डॉ.राजा रामण्णा यांचा या चाचणीत महत्त्वाचा वाटा होता. प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी 'अणुस्फोट' चाचणीचा निर्णय घेतला. मानवी वस्तीपासून दूर व भूगर्भात पाण्याचा साठा जवळपास नाही अशा निकषांवर राजस्थानमधील पोखरण भागाची निवड करण्यात आली.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

१९७४ मध्ये भारताने पोखरणमध्ये पहिली अणुचाचणी केल्यावर अमेरिकेने अंतराळ संशोधन संदेश यंत्रणा व क्षेपणास्त्र विकास अशा संरक्षण विषयांशी संबंधित तंत्रज्ञान भारताला देण्यास नकार दिला. यामुळे अमेरिकेवर विसंबून न राहता स्वबळावर क्षेपणास्त्र विकासाचा कार्यक्रम आखण्याचे धोरण भारताने स्वीकारले. यातूनच भारत अमेरिका, सोव्हिएत रशिया, फ्रान्स, चीन आणि जर्मनी या क्षेपणास्त्र विकसित करणाऱ्या राष्ट्रांच्या रांगेत जाऊन बसला.

**दुसरी अणुचाचणी :** ११ मे १९९८ रोजी भारताने अण्वस्त्रसज्जता सिद्ध करण्यासाठी पोखरण येथे दुसरी अणुस्फोट चाचणी केली. या दिवशी तीन अणुचाचण्या घेण्यात आल्या. त्यात एक हायड्रोजन बॉम्बची होती. प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांनी 'भारताकडून अण्वस्त्रांचा प्रथम वापर केला जाणार नाही' अशी ग्वाही दिली. मात्र अमेरिकेने भारतावर तात्काळ आर्थिक निर्बंध लादले.

## क्षेपणास्त्र विकास

**पृथ्वी :** १९८८ मध्ये 'पृथ्वी' क्षेपणास्त्राची आणि १९८९ मध्ये 'अग्नि' या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी झाली. जगाने भारताच्या आण्विक क्षेपणास्त्र विकासाच्या कार्यक्रमाची दखल घेतली. इंटिग्रेटेड गाइडेड मिसाईल डेव्हलपमेंट प्रोग्रॅम (IGMDP) अंतर्गत हा क्षेपणास्त्र विकासाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. त्यानुसार 'संरक्षण संशोधन आणि विकास संस्था' (DRDO) या संस्थेने क्षेपणास्त्र निर्मितीला सुरुवात केली. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या नेतृत्वाखाली या गोष्टी साध्य झाल्या.



डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम

'पृथ्वी-१' हे जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे क्षेपणास्त्र पायदळाकडे, 'पृथ्वी-२' वायुदलाकडे, 'पृथ्वी-३' नौदलाकडे सोपवण्यात आले. पृथ्वी क्षेपणास्त्राची पाचशे ते हजार किलो

**माहीत आहे का तुम्हांला ?**

भारत सरकारच्या संरक्षण विभागांतर्गत १९५८ साली 'संरक्षण संशोधन आणि विकास संस्था' (DRDO) स्थापन झाली. संरक्षणाची साधने, उपकरणे आणि शस्त्रास्त्रे या बाबतींत देशाला स्वावलंबी बनवणे हा या संस्थेचा उद्देश होता. १९८३ नंतर डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या नेतृत्वाखाली या संस्थेने अनेक क्षेपणास्त्रे विकसित केली. क्षेपणास्त्र निर्मितीत डॉ.कलाम यांनी मोठे योगदान दिले आहे. डॉ.कलाम यांना क्षेपणास्त्र कार्यक्रमाचे जनक तसेच 'मिसाईल मॅन' असे म्हटले जाते.

आण्विक विस्फोटके वाहून नेण्याची क्षमता होती. न्युक्लिअर बॅलिस्टिक मिसाईलद्‌वारे १५० ते ३०० किलोमीटर अंतरापर्यंतचा पल्ला साधणे पृथ्वी या क्षेपणास्त्राला शक्य झाले.

**अग्नी :** चीन व पाकिस्तानला भारताच्या क्षेपणास्त्र सामर्थ्याची कल्पना यावी. भारताच्या सीमा सुरक्षित राहाव्यात म्हणून 'अग्नी-१' ची चाचणी घेण्यात आली. या सामरिक क्षेपणास्त्राचा पल्ला ७०० किलोमीटर इतका होता. पुढे 'अग्नी-२' व 'अग्नी-३' यांचीही निर्मिती करण्यात आली.

**आकाश, नाग क्षेपणास्त्रे :** जमिनीवरून आकाशात मारा करण्यासाठी १९९० मध्ये 'आकाश' या क्षेपणास्त्राची निर्मिती झाली. ३० किलोमीटर पल्ला आणि ७२० किलोची विस्फोटके स्वनातीत (सुपरसॉनिक) वेगाने नेण्याची या क्षेपणास्त्राची क्षमता आहे. शत्रूचे रणगाडे नष्ट करण्यासाठी फायर अ‍ॅण्ड फरगेट स्वरूपाचे 'नाग' हे क्षेपणास्त्र तयार करण्यात आले. क्षेपणास्त्र निर्मितीमुळे भारत लष्करदृष्ट्या सुरक्षित झाला आहे.

**अवकाश संशोधन :** केरळ राज्यातील थुंबा येथील 'थुंबा इक्विटोरियल लाँच सेंटर' वरून इंडियन नॅशनल कमिटी फॉर स्पेस रिसर्च या संस्थेने भारताच्या पहिल्या संशोधक अग्निबाणाचे १९६१ मध्ये यशस्वी प्रक्षेपण केले.

१९६९ मध्ये थुंबा येथे स्वदेशी बनावटीच्या 'रोहिणी-७५' अग्निबाणाचे यशस्वी प्रक्षेपण केले गेले. याच्या पुढचा टप्पा म्हणजे १९७५ मध्ये सोव्हिएत रशियाच्या सहकार्याने पहिल्या भारतीय 'आर्यभट्ट' उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण केले.

या यशामुळे अंतरिक्षात सोडण्याजोग्या उपग्रहाची संरचना व निर्मिती देशात होऊ शकते हे सिद्ध झाले. भूकेंद्राकडून उपग्रहाकडे संदेश पाठवणे, उपग्रहाकडून आलेल्या संदेशाचे भूकेंद्रावर ग्रहण करणे हे तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी व उपग्रहाच्या कार्यशैलीचे मूल्यमापन करण्यासाठी उच्च तंत्रज्ञान अवगत होऊ शकते असा आत्मविश्वास भारतीय शास्त्रज्ञांना आला.

**इस्रो (Indian Space Research Organisation) :** अवकाश संशोधनातील पायाभूत कार्यक्रम व अग्निबाणासंबंधित यशस्वी उपक्रम साध्य केल्यावर अवकाश क्षेत्रात अधिक संशोधन करण्यासाठी १५ ऑगस्ट १९६९ रोजी 'इस्रो'ची स्थापना करण्यात आली. इस्रोचे मुख्य कार्यालय बंगळूरू येथे आहे. अंतरिक्षात उपग्रह प्रक्षेपित करण्यासाठी इस्रोने आंध्र प्रदेश या राज्यातील श्रीहरीकोटा येथील अवकाशतळ कार्यान्वित केला.

**भास्कर-१ :** १९७९ मध्ये पृथ्वीच्या पृष्ठभागावरील विविध गोष्टींचे निरीक्षण दूरसंवेदन तंत्राने साध्य व्हावे, यासाठी इस्रोने तयार केलेला 'भास्कर-१' हा दूरसंवेदक प्रायोगिक उपग्रह भारताने सोव्हिएत रशिया या देशातून पाठवला. देशातील पाण्याचे साठे, खनिजांचे साठे, हवामान यांचा अंदाज घेऊन देशाच्या विकासासाठी दूरसंवेदन तंत्र उपयोगी पडणारे होते. या तंत्राच्या मदतीने भूगर्भविषयक, पर्यावरणविषयक, जंगलविषयक काढलेली छायाचित्रे महत्त्वाची होती. या उपग्रहाद्‌वारे मिळालेल्या माहितीचा उपयोग समुद्रविज्ञान (ओशनॉग्राफी) मध्ये झाला. १९८१ मध्ये 'भास्कर-२' हा उपग्रह सोव्हिएत रशिया या देशातून पाठवण्यात आला.

**ॲपल :** इस्रोने पूर्णतः भारतात बनवलेला 'ॲपल' हा भारताचा पहिला दूरसंचार उपग्रह १९ जून १९८१ रोजी 'फ्रेंच गियाना' येथून पाठवला. 'ॲपल'मुळे शिक्षण क्षेत्राला मदत झाली. आपत्कालीन दूरसंचारसेवा पुरवण्याचा उद्‌देश सफल झाला.

**इन्सॅट (Indian National Satellite) :** ऑगस्ट १९८३ मध्ये 'इन्सॅट-१ बी' या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण झाले. यामुळे भारताच्या दूरसंचार, दूरदर्शन, आकाशवाणी, हवामानाचा अंदाज वर्तवणे आणि अंतरिक्ष विभाग या क्षेत्रांत क्रांती घडून आली. इन्सॅटमुळे देशभरातील २०७ आकाशवाणी केंद्रे एकमेकांना जोडता आली. या यंत्रणेचा उपयोग आपद्‌ग्रस्तांचा शोध व बचाव (जहाज किंवा

विमानाच्या अपघातप्रसंगी), हवामानाचा पूर्वअंदाज, वादळांचा शोध व मागोवा, टेलिमेडिसिन आणि शैक्षणिक संस्थांना होत आहे. इन्सॅट प्रणालीतील टेलिमेडिसीन या सेवेमुळे ग्रामीण व दुर्गम भागातील जनतेला तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला व औषधोपचार सहज उपलब्ध होऊ शकतात. ग्रामीण व छोट्या गावांतील वैद्यकीय सेवाकेंद्रे मोठ्या शहरांतील सुपर स्पेशालिटी सेवा असलेल्या रुग्णालयांसाठी 'इन्सॅट'द्वारा जोडली गेली आहेत.

**तंत्रज्ञानातील प्रगती :** रेल्वे इंजिनची निर्मिती करणाऱ्या 'चित्तरंजन लोकोमोटिव्ह वर्क्स' या कारखान्याची पश्चिम बंगालमधील बरद्वान जिल्ह्यातील चित्तरंजन येथे उभारणी करण्यात आली. या कारखान्यात वाफेची इंजिने, डिझेल आणि विद्युत इंजिनांची निर्मिती करण्यात आली. वाराणसी येथील डिझेल लोकोमोटिव्ह वर्क्समध्ये पहिल्या डिझेल इंजिनची निर्मिती झाली. येथूनच श्रीलंका, बांगलादेश, टांझानिया आणि व्हिएतनाम येथे इंजिनांची निर्यात सुरू झाली.

**टेलेक्स सेवा :** देशाच्या एका भागातून दुसऱ्या भागात जलदगतीने टंकमुद्रित स्वरूपात संदेशाचे वहन करणारी टेलेक्स सेवा १९६३ मध्ये केंद्रीय दळणवळण खात्याने सुरू केली. १९६९ मध्ये देवनागरी लिपीतून टेलेक्स सेवा प्रथम दिल्लीत सुरू झाली. पुढे तिचा विस्तार भारतभर झाला. या सेवेचा उपयोग सर्वच क्षेत्रांत सुरू झाला. १९९० नंतर इंटरनेटच्या उदयानंतर या सेवेचे महत्त्व संपुष्टात आले.

**उपग्रहीय दूरसंचार केंद्र :** कृत्रिम उपग्रहाच्या साहाय्याने देशांतर्गत 'संदेश दळणवळण' (सॅटेलाईट कम्युनिकेशन) शक्य व्हावे, यासाठी उपग्रहाकडे संदेश पाठवण्यासाठी व उपग्रहावरून संदेश ग्रहण करण्यासाठी आवश्यक असलेले देशांतर्गत (डोमेस्टिक) उपग्रहीय दूरसंचार भूकेंद्र १९६७ मध्ये अहमदाबादजवळील 'जोधपूर टेकरा' या भागात उभारण्यात आले. यामुळे भारतीय शास्त्रज्ञ व तंत्रज्ञांना भूकेंद्र उभारणीचे व त्याच्या कार्यप्रणालीचे देशांतर्गत प्रशिक्षण देणे सुलभ झाले. १९७० मध्ये पुण्याजवळील आर्वी येथे आंतर्देशीय दूरसंचार सेवेसाठी सुसज्ज असे भूकेंद्र उभारण्यात आले.

**पिनकोड :** १५ ऑगस्ट १९७२ पासून भारतीय टपाल व तार विभागाने देशात सहा आकडी पोस्टल इंडेक्स कोड (पिनकोड) पद्धती चालू केली. टपाल वाटपात कार्यक्षमता आणणे हा याचा हेतू आहे. या पद्धतीत देशाचे नऊ विभाग पाडण्यात आले. पिनकोडमधील पहिल्या क्रमांकाद्वारे मुख्य विभाग दर्शवतात. दुसरा क्रमांक उपविभाग, तिसरा क्रमांक उपविभागातील प्रमुख बटवडा जिल्हा तर उर्वरीत तीन क्रमांकांद्वारे स्थानिक बटवडा डाकघराची स्थाननिश्चिती करण्यात आली. महाराष्ट्रासाठी ४०,४१,४२,४३,४४ हे पहिले दोन आकडे आहेत. १९८६ मध्ये टपाल वेगाने पोहचवण्यासाठी 'स्पीड पोस्ट' सेवा सुरू झाली.

**आयएसडी (इंटरनॅशनल सबस्क्रायबर डायल्ड टेलिफोन सर्व्हिस) :** १९७२ मध्ये मुंबईत 'ओव्हरसीज कम्युनिकेशन्स सर्व्हिस'ची स्थापना करून आंतरराष्ट्रीय दूरसंचार सेवेची व्यवस्था करण्याचे काम सुरू झाले. १९७६ मध्ये मुंबई व लंडन या दोन शहरांत थेट दूरध्वनी संपर्क साध्य करणारी आयएसडी सेवा सुरू झाली. दूरध्वनीप्रमाणे टेलेक्स, टेलिप्रिंटर, रेडिओ छायाचित्रे अशा सेवा सुरू झाल्या. १९८६ मध्ये विदेश संचार निगम लिमिटेडने (VSNL) या क्षेत्रात आणखी मोठी उडी घेतली. त्याआधी महानगर टेलिफोन निगम लिमिटेड ही मोठ्या शहरांतील दूरसंचारसेवेसाठी स्थापन करण्यात आलेली सार्वजनिक कंपनी होती. १९९० च्या दशकात VSNL ने भारतात इंटरनेट सेवा पुरवणारी प्रमुख कंपनी म्हणून स्थान मिळवले. या क्षेत्रात सॅम पित्रोदा यांचे योगदान लक्षणीय आहे.

**मोबाइल :** २२ ऑगस्ट १९९४ रोजी भारतात मोबाइल सेवा सुरू झाली. यावेळी मोबाइल हँडसेट ४५ हजार रुपये आणि कॉल दर प्रतिमिनिट १७ रूपये होता. १९९९ मध्ये या क्षेत्रात अनेक खासगी

कंपन्या आल्या. यामुळे सेवा स्वस्त होऊ लागली.

**चर्चा करा.**

भ्रमणध्वनी (मोबाइल) तंत्रज्ञानात झालेल्या विविध बदलांविषयी माहिती जाणून घ्या. त्याचे फायदे-तोटे यांविषयी चर्चा करा.

**भारत संचार निगम लिमिटेड (BSNL) :** २००० मध्ये दूरसंचार विभागाची पुनर्रचना करण्यात आली. धोरणात्मक निर्णयांची जबाबदारी दूरसंचार विभागाकडे कायम ठेवून ग्राहकांना प्रत्यक्ष सेवा पुरवण्याकरता 'भारत संचार निगम लिमिटेड'ची स्थापना करण्यात आली. दूरध्वनी सेवेबरोबर सेल्युलर फोन, इंटरनेट, ब्रॉडबॅण्ड सेवा उपलब्ध झाल्या.

**ऑईल ॲण्ड नॅचरल गॅस कमिशन (ओएनजीसी) :** खनिज तेल व नैसर्गिक वायूच्या साठ्यांचा शोध घेणे, त्यांचे उत्पादन वाढवणे यांसाठी १९५६ मध्ये खनिज तेल व नैसर्गिक वायू आयोग म्हणजेच 'ऑईल ॲण्ड नॅचरल गॅस कमिशन' (ओएनजीसी) ची स्थापना झाली. आसाम राज्यातील दिग्बोईनंतर गुजरातमधील अंकलेश्वर परिसरात खनिज तेल साठे सापडले. पुढे गुजरातमधील खंबायतच्या आखातात खनिजतेल व नैसर्गिक वायूचे साठे सापडले.

खनिज तेल व नैसर्गिक वायू आयोगाने (ओएनजीसी) १९७४ मध्ये 'सागरसम्राट' या ड्रीलशीपद्‌वारे (सागरी छिद्रणयंत्र) 'बॉम्बे हाय' परिसरात रशियन संशोधकांच्या मदतीने तेलविहीर खोदण्यास प्रारंभ केला. येथे १९७५ पासून खनिज तेल व नैसर्गिक वायू मिळण्यास सुरुवात झाली. पुढे या भागात ८५०० पेक्षा जास्त तेलविहिरी व नैसर्गिक वायूच्या ३३ विहिरी खणण्यात आल्या. यामुळे भारतातील खनिज तेलाच्या एकूण उत्पादनात या क्षेत्राचा वाटा ३८ टक्क्यांपर्यंत पोहचला, तर देशाच्या खनिज तेलाच्या एकूण गरजेपैकी १४ टक्के गरज या क्षेत्रामुळे पूर्ण झाली.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

ई.श्रीधरन हे 'मेट्रोमॅन' या टोपण नावाने प्रसिद्ध आहेत. दिल्ली मेट्रो आणि कोकण रेल्वे ही त्यांची अजोड कामगिरी आहे.

**कोकण रेल्वे :** १९९८ मध्ये कोकण रेल्वे सुरू झाली. सुमारे ७६० किलोमीटर लांबीच्या गोवा, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र या चार राज्यांत पसरलेल्या कोकण रेल्वे मार्गावर तंत्रज्ञानाचे अनेक विक्रम आहेत. या मार्गावर एकूण १२ बोगदे आहेत. या मार्गावरील कारबुडे येथील ६.५ किमी लांबीचा बोगदा सर्वांत मोठा बोगदा आहे. १७९ मोठे आणि १८१९ छोटे पूल या मार्गावर आहेत. त्यांपैकी होनावरजवळील शरावती नदीवरील २०६५.८ मीटर लांबीचा पूल सर्वांत मोठा आहे. रत्नागिरीजवळील पनवल नदीवरील ६४ मीटर उंचीचा पूल सर्वांत उंच पूल आहे. दरडी कोसळणाऱ्या मार्गावर इंजिनांमध्ये सेन्सर्स बसवण्यात आले आहेत.

**रेल्वे आणि तंत्रज्ञान :** आधुनिक भारताच्या इतिहासात रेल्वेने अंगीकारलेल्या तंत्रज्ञानाचा फार मोठा वाटा आहे.

रेल्वेप्रवासाच्या आरक्षण व्यवस्थेत कार्यक्षमता, अचूकता आणि सुसूत्रता यावी म्हणून १९८४ मध्ये दिल्लीत सर्वप्रथम संगणकीकृत आरक्षण व्यवस्था करण्यात आली. याच वर्षी कोलकता येथे मेट्रो रेल्वे सुरू झाली.

अशा प्रकारे भारताने विज्ञान, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सतत प्रगती केली आहे. नवनवीन संशोधने केलेली आहेत. भारत हा एकविसाव्या शतकातील एक महत्त्वपूर्ण देश आहे. भारताने तंत्रज्ञानाचा उपयोग जगात शांतता निर्माण करण्यासाठीच केलेला आहे. भारत हा २१ व्या शतकात अग्रेसर होण्याच्या उद्दिष्टाने हे कार्य करत आहे.

पुढील पाठात आपण भारताने उद्योग व व्यापार या क्षेत्रांत केलेल्या प्रगतीविषयी माहिती घेणार आहोत.



## स्वाध्याय

**१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) अणुऊर्जा आयोगाचे पहिले अध्यक्ष म्हणून ........... यांची नेमणूक झाली.
   (अ) डॉ.होमी भाभा (ब) डॉ.होमी सेठना
   (क) डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम
   (ड) डॉ.राजा रामण्णा


(२) इस्रोने पूर्णतः भारतात तयार केलेला .........हा पहिला दूरसंचार उपग्रह होय.
   (अ) आर्यभट्ट (ब) इन्सॅट १ बी
   (क) रोहिणी-७५ (ड) ॲपल

**(ब) पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखून लिहा.**

(१) पृथ्वी – जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे क्षेपणास्त्र.
(२) अग्नी – जमिनीवरून पाण्याखाली मारा करणारे क्षेपणास्त्र.
(३) आकाश – जमिनीवरून आकाशात मारा करणारे क्षेपणास्त्र.
(४) नाग – शत्रूचे रणगाडे नष्ट करणारे क्षेपणास्त्र.

**प्र.२ (अ) दिलेल्या सूचनेप्रमाणे कृती पूर्ण करा.**

भारताच्या विज्ञान, तंत्रज्ञान क्षेत्रांतील प्रगतीची कालरेषा दशकानुसार तयार करा.




**प्र.२ (ब) टिपा लिहा.**

(१) अवकाश संशोधन
(२) टेलेक्स सेवा
(३) पोखरण अणुचाचणी
(४) भास्कर-१ उपग्रह

**३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) पं.नेहरूंनी अणुऊर्जा आयोगाची स्थापना केली.
(२) भारताने अणुचाचणी घेण्याचा निर्णय घेतला.
(३) अमेरिकेने भारतावर आर्थिक निर्बंध लादले.

**४. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) तुमच्या वापरात असणाऱ्या कोणकोणत्या सुविधांमध्ये उपग्रह तंत्रज्ञानाचा प्रभाव पडलेला आढळतो ?
(२) डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना 'मिसाईल मॅन' असे का संबोधले जाते ?
(३) संगणकीकृत रेल्वे आरक्षण कसे करता येते ?
(४) कोकण रेल्वेची वैशिष्ट्ये कोणती ते लिहा.

**उपक्रम**

(१) आंतरजालाच्या मदतीने 'थुंबा इक्विटोरियल लाँच सेंटर'ची माहिती मिळवा.
(२) तुमच्या जवळच्या आकाशवाणी केंद्राला/ दूरचित्रवाणी केंद्राला भेट द्या व माहिती मिळवा.

F3AN44

# ८ उद्योग व व्यापार

या पाठात आपण स्वातंत्र्योत्तर कालखंडातील उद्योग व व्यापार यांविषयी माहिती घेणार आहोत.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी १९४८ मध्ये 'भारतीय औद्योगिक वित्त महामंडळा'ची स्थापना औद्योगिक प्रकल्पांना दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देणे या हेतूने करण्यात आली. तसेच १९५४ मध्ये औद्योगिक क्षेत्राचा विकास अधिक होण्यासाठी भारतीय 'औद्योगिक विकास महामंडळा'ची स्थापना करण्यात आली.

## भारतातील काही उद्योग

**वस्त्रोद्योग :** देशाच्या एकूण औद्योगिक उत्पादनात वस्त्रोद्योगाचा वाटा सुमारे १४% आहे.

वस्त्रोद्योगात यंत्रमाग उद्योग, हातमाग उद्योग यांचा समावेश होतो. हातमाग उद्योग श्रमप्रधान आहे. 'टेक्सटाईल कमिटी ॲक्ट १९६३' नुसार वस्त्रोद्योग समितीची स्थापना करण्यात आली आहे. देशांतर्गत बाजारपेठ आणि निर्यातीसाठी तयार केल्या जाणाऱ्या वस्त्रांची गुणवत्ता निश्चित करण्याचे काम या समितीचे आहे.

**रेशीम उद्योग :** वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत या उद्योगाचे काम चालते. रेशमी किड्याच्या जाती आणि तुतीच्या झाडांवरील संशोधन बंगळूरू येथील 'सेरिबायोटिक रिसर्च लॅबोरेटरी' मध्ये केले जाते. हा उद्योग प्रामुख्याने कर्नाटक, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल, जम्मू-काश्मीर या राज्यांत आहे. तसेच उद्योगाचा प्रसार आदिवासीबहुल राज्यांत केला जात आहे.

**ताग उद्योग :** ताग उत्पादनात भारत प्रमुख देश आहे. भारतातून मोठ्या प्रमाणावर ताग उत्पादनाची निर्यात होते. तागापासून कापड, गोणपाट, दोरखंड इत्यादी वस्तू मिळतात.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

स्वबचत गट व स्वयंसेवी संस्थांच्या (एन. जी.ओ.) साहाय्याने विणकरांना मदत करणारी 'मेगा क्लस्टर' ही योजना आहे. त्यात कच्चा माल, डिझाइन सामग्री, तंत्रज्ञान विकास, विणकरांचे कल्याण यासाठी मदत केली जाते.

**हस्तशिल्प :** हे श्रमप्रधान क्षेत्र आहे. अधिक रोजगार क्षमता, कमी गुंतवणूक, अधिक नफा, निर्यातीला प्राधान्य आणि अधिक परकीय चलन यांमुळे हस्तशिल्प क्षेत्रात शिल्पकारांना रोजगार मिळाला. ग्रामीण व शहरी क्षेत्रांतील कारागिरांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी 'दिल्ली हाट' यासारखी मार्केट यंत्रणा अनेक शहरांत सुरू केलेली आहे. त्यांतील मुंबई हे एक शहर आहे.

**वाहन उद्योग :** वाहन उत्पादनात भारत प्रमुख देश आहे. भारतातून चाळीस देशांना वाहने निर्यात केली जातात.

भारतातील वाहन उद्योगाला 'सनराईज क्षेत्र' असे म्हटले जाते. उदा. भारतातील ट्रॅक्टर उद्योग जगात सर्वांत मोठा असून जगाच्या १/३ ट्रॅक्टर उत्पादन भारतात होते. भारताचे ट्रॅक्टर तुर्कस्तान, मलेशिया आणि आफ्रिका खंडातील देशांना निर्यात केले जातात.

**सिमेंट उद्योग :** गृहनिर्माण आणि पायाभूत संरचनेच्या विकासात सिमेंट उद्योगाची भूमिका महत्त्वाची आहे. तंत्रज्ञानाबाबत सर्वाधिक प्रगत उद्योगांपैकी हा एक उद्योग आहे. सध्या भारत हा जगात सिमेंट निर्मितीत महत्त्वाचा देश आहे.

**चर्मोद्योग :** भारतातील मोठा उद्योग असून हा निर्याताभिमुख उद्योग आहे.

**मीठ उद्योग :** भारत हा सध्या मीठ उद्योगातील प्रमुख देश आहे. भारतात मिठाचे वार्षिक उत्पादन

२०० लाख टन होते. आयोडिनयुक्त मिठाचे उत्पादन ६० लाख टन इतके होते.

**सायकल उद्योग :** सायकल उत्पादनात भारत जगात अग्रेसर आहे. पंजाब आणि तमिळनाडू या राज्यांत सायकलींचे उत्पादन होते. लुधियाना हे शहर देशातील प्रमुख सायकल उत्पादन केंद्र आहे. भारत नायजेरिया, मेक्सिको, केनिया, युगांडा, ब्राझील या देशांना सायकली निर्यात करतो.

**खादी व ग्रामोद्योग :** ग्रामीण भागातील औद्योगिकीकरणास चालना देण्यासाठी खादी व ग्रामोद्योग आयोगाची स्थापना करण्यात आली. ग्रामीण क्षेत्रातील पारंपरिक उद्योग, हस्तोद्योग, कुटीरोद्योग तसेच स्थानिक स्तरावर उपलब्ध असलेली साधनसंपत्ती व मनुष्यबळ उपयोगात आणणाऱ्या लघुउद्योगांचा विकास करावा व रोजगारनिर्मितीच्या माध्यमातून गावांना स्वावलंबी बनवावे ही आयोगाच्या स्थापनेमागील प्रमुख उद्दिष्टे होती.

**शेती उद्योग :** भारतात पारंपरिक पद्धतीने आणि आधुनिक पद्धतीने शेती केली जाते. शेतीची अनेक कामे बैलांच्या मदतीने केली जातात. तसेच यंत्रांचा वापर नांगरणी, पेरणीपासून-कापणी, मळणी इत्यादी कामांत होत आहे.

भारताचा ग्रामीण भागातील प्रमुख व्यवसाय शेती आणि शेतीवर आधारित इतर कामे हा आहे. खेड्यापाड्यांत शेती व पशुपालन व्यवसाय चालतो. शेतीची कामे व शेती उत्पादन यांवर ७०% समाज अवलंबून आहे. शेती उद्योगात पुरुषांच्या बरोबरीने महिलांचाही वाटा मोठा आहे.

भारतात शेती व्यवसाय विविध हंगामांत चालतो. अनेक प्रकारची पिके शेतात घेतली जातात. ज्वारी गहू, तांदूळ, डाळी, तेलबिया यांचे प्रामुख्याने उत्पादन घेतले जाते. त्याबरोबर कापूस, ऊस यांच्यावर प्रक्रिया करून कापड, साखर हेही उद्योग चालतात.

फळे आणि भाजीपाला यांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन शेतीतूनच होत आहे. अलीकडे यावर प्रक्रिया करणारे अनेक उद्योग चालत आहेत. शेतीमधून मानवाच्या मूलभूत गरजा भागवल्या जातात. शेती व्यवसायाला प्रोत्साहन मिळावे म्हणून ग्रामीण क्षेत्रात बँका आणि सहकारी संस्थांमार्फत शेतकऱ्यांना कर्ज दिले जाते. पंचायत समितीमार्फत शेतीविषयक सुधारणांसाठी प्रशिक्षण भेट योजना, शेती सहली आणि शेतकरी मेळावे आयोजित केले जातात. शेती अवजारे, बी-बियाणे, खते यांचा पुरवठाही केला जातो. कृषी विद्यापीठाच्या विस्तार सेवा विभागाकडून शेतकऱ्यांना माती परीक्षण, फळबाग रोपवाटिका, मत्स्यव्यवसाय, कुक्कुटपालन, बंदिस्त शेळीपालन, गाई-म्हशींचे संगोपन, दुग्धव्यवसाय यांचेही प्रशिक्षण दिले जाते. जिल्हा व्यवसाय मार्गदर्शन संस्थेकडून मार्गदर्शन होते. उत्पादित माल साठवणुकीसाठी गोदाम (वेअर हाउस) बांधणीसाठी अर्थसाहाय्य दिले जाते.

भारत अन्नधान्य उत्पादनात आणि पीक पद्धतीत स्वयंपूर्ण होत आहे. ठिबकसिंचन, सेंद्रीय शेती यांसारख्या आधुनिक पद्धतीने शेती करण्यात येत आहे.

**भारत सरकारचे धोरण :** चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या धोरण काळात कागद उद्योग, औषध उद्योग, मोटार-ट्रॅक्टर उद्योग, कातड्याच्या वस्तू, वस्त्रोद्योग, खाद्यपदार्थ प्रक्रिया उद्योग, तेल, रंग, साखर इत्यादी उद्योगांवर लक्ष केंद्रित करण्यात आले.

१९७० च्या औद्योगिक परवाना धोरणानुसार पाच कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक लागणारे सर्व कारखाने अवजड उद्योगक्षेत्रात आणण्याचे ठरवले. सरकारी क्षेत्रासाठी राखून न ठेवलेल्या अवजड उद्योगात गुंतवणूक करण्याची मोकळीक मोठ्या उद्योगसंस्था व परकीय कंपन्यांना देण्याचे ठरले. या धोरणानुसार १९७२ अखेर सरकारी नोंदणी कार्यालयात ३ लाख १८ हजार लघुउद्योग नोंदवले गेले.

**खनिज संपत्ती :** देशाच्या औद्योगिक विकासात लोह व दगडी कोळसा या दोन खनिजांच्या उपलब्धतेचा मोठा वाटा असतो. आपल्या देशात लोह, मँगनीज, कोळसा, खनिज तेल यांचे पुरेसे साठे सापडले आहेत.

**वनसंपत्ती :** वनसंपत्तीवर आधारित उद्योगांसाठी सरकारने काही राखीव जंगले ठेवली आहेत. जंगल जपण्याचे काम राज्य शासन, केंद्र शासन व स्थानिक लोक करतात. बांधकाम, कागद, वृत्तपत्र कागद, रेशीम, काडेपेटी, औषधी वनस्पती, मध, लाख, रंगकामासाठी लागणारा कच्चा माल यांवर आधारित उद्योगांसाठी जंगले आवश्यक आहेत.

**मत्स्योद्योग :** नद्या, कालवे, तळी, सरोवरे या गोड्या पाण्यात मिळणारे मासे व सागरी पाण्यात मिळणारे मासे यांतून मत्स्योत्पादन होते. या व्यवसायाच्या संवर्धनासाठी बंदर उभारणी, जुन्या बंदरांचा विकास, मत्स्यबीज उबवणी केंद्रे, मत्स्य व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे तयार करण्यात आली आहेत.

**पर्यटन उद्योग :** भारताला समृद्ध असा सांस्कृतिक वारसा लाभला आहे. आपल्या देशाच्या कानाकोपऱ्यांमध्ये विविध धर्मीयांची प्रार्थनास्थळे, तीर्थक्षेत्रे, नद्यांचा संगम, किल्ले, लेणी आहेत. यांमुळे देशा-परदेशांतील लोक भारतात पर्यटनासाठी वर्षभर येत असतात. पर्यटन विकास महामंडळाद्वारे पर्यटकांना राहण्याच्या, प्रवासाच्या सोई-सुविधा केल्या जातात. या ठिकाणी विविध वस्तू विक्री आणि हॉटेल व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो.

पर्यटकांना त्या भागाची माहिती देण्यासाठी काही ठिकाणी मार्गदर्शक असतात. काही दुर्गम ठिकाणी वाहने पोहचू शकत नाहीत, त्या ठिकाणी तेथील स्थानिक लोक मोबदला घेऊन पर्यटकांना मदत करतात. यातूनही रोजगार उपलब्ध होतो.

**व्यापार आयात-निर्यात :** १९५१ मध्ये नियोजनाची सुरुवात झाल्यानंतर औद्योगिक वस्तू व त्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची आयात मोठ्या प्रमाणावर वाढली. भारताच्या आयातीत यंत्रसामग्री, लोखंड, खनिज तेल, खते, औषधे इत्यादी वस्तूंचा समावेश होतो.

भारताने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर परकीय चलन मिळवण्याच्या उद्देशाने निर्यातीला चालना दिली. भारताच्या निर्यातीत चहा, कॉफी, मसाल्याचे पदार्थ, सुती कापड, चामडे, पादत्राणे, मोती, मौल्यवान हिरे इत्यादी वस्तूंचा समावेश होतो.

**अंतर्गत व्यापार :** भारताचा अंतर्गत व्यापार लोहमार्ग, जलमार्ग, रस्ते, हवाई वाहतूक इत्यादी मार्गांनी चालतो. मुंबई, कोलकता, कोची, चेन्नई, ही बंदरे महत्त्वाची आहेत. अंतर्गत व्यापारात कोळसा, कापूस, सुती कापड, तांदूळ, गहू, कच्चा ताग, लोखंड, पोलाद, तेलबिया, मीठ, साखर इत्यादी वस्तूंचा समावेश होतो.

देशातील उद्योगधंद्यांच्या विकासामुळे राहणीमान व जीवनमानाचा दर्जा उंचावतो. रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतात. एकूणच देशाच्या प्रगतीला हातभार लागतो.

पुढील पाठात आपण भारतीय लोकांचे बदलते जीवन याविषयी माहिती घेणार आहोत.



## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) १९४८ मध्ये......... या हेतूने भारतीय औद्योगिक वित्त महामंडळाची स्थापना करण्यात आली.

(अ) औद्योगिक क्षेत्राचा अधिक विकास व्हावा.

(ब) औद्योगिक प्रकल्पांना दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देणे.

(क) रोजगार निर्मिती व्हावी.

(ड) तयार मालाची गुणवत्ता निश्चिती व्हावी.

(२) भारतातील ........ उद्योगाला 'सनराईज क्षेत्र' म्हटले जाते.
(अ) ताग (ब) वाहन
(क) सिमेंट (ड) खादी व ग्रामोद्योग

(३) वस्त्रोद्योग समितीचे प्रमुख काम ...... हे आहे.
(अ) कापड उत्पादन करणे.
(ब) वस्त्रांची गुणवत्ता निश्चित करणे.
(क) कापड निर्यात करणे.
(ड) लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे.

(४) सायकल उत्पादनात ........ हे भारतातील प्रमुख शहर आहे.
(अ) मुंबई (ब) लुधियाना
(क) कोची (ड) कोलकता

**(ब) पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखून लिहा.**

(१) भारतीय औद्योगिक वित्त महामंडळ – औद्योगिक प्रकल्पांना दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देणे.
(२) औद्योगिक विकास महामंडळ – औद्योगिक क्षेत्राचा विकास करणे.
(३) वस्त्रोद्योग समिती – विणकरांचे कल्याण करणे.
(४) खादी व ग्रामोद्योग आयोग – ग्रामीण भागातील औद्योगिकीकरणास चालना देणे.

**प्र.२ (अ) दिलेल्या सूचनेप्रमाणे कृती पूर्ण करा.**

चौकट पूर्ण करा.

| | |
|---|---|
| **भारतात आयात होणाऱ्या वस्तू** | |
| **भारतातून निर्यात होणाऱ्या वस्तू** | |

**(ब) टीपा लिहा.**

(१) भारताची आयात-निर्यात
(२) भारताचा अंतर्गत व्यापार

**३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) भारतात पर्यटन उद्योग वाढीला लागला आहे.
(२) भारतीय जनतेचा जीवनमान व राहणीमान दर्जा सुधारतो आहे.

**४. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) शेती व्यवसायाला प्रोत्साहन मिळावे म्हणून शासन कोणते प्रयत्न करते ?
(२) पर्यटन क्षेत्रातून लोकांना रोजगार कसा निर्माण होतो ?
(३) भारतात वनसंपत्तीवर आधारित कोणते व्यवसाय चालतात ?

**उपक्रम**

(१) यशस्वी उद्योजकांची छायाचित्रे जमा करा.
(२) आपण वापरत असलेल्या दैनंदिन वस्तूंपैकी कोणत्या वस्तू परिसरात तयार होतात, कोणत्या वस्तू बाहेरून आणल्या जातात त्याचा तक्ता करा.

F3JJ5R

# ९ बदलते जीवन : भाग १

आतापर्यंत आपण इ.स.१९६१ ते इ.स.२००० पर्यंतचा कालखंड अभ्यासला. विसाव्या आणि एकविसाव्या शतकात बदलाचा वेग प्रचंड आहे. मानवी जीवन झपाट्याने बदलत चालले आहे. पूर्वी आपण ज्यांची कल्पनाही करू शकलो नसतो त्या गोष्टी वास्तवात उतरल्या आहेत. प्राचीन व मध्ययुगीन काळात धर्म ही माणसाची एक महत्त्वाची ओळख होती. हिंदू, मुस्लिम, ख्रिस्ती, शीख, जैन, बौद्ध, पारशी आणि ज्यू इत्यादी धर्मांपुढे आधुनिकीकरणाने आव्हाने उभी केली आहेत. आपल्या पारंपरिक विचारसरणीत खूप मोठा बदल डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घडवून आणला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी हा बदल भारतीय संविधानाच्या माध्यमातून केला आहे.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर

आपल्या संविधानाप्रमाणे कायद्यापुढे सगळे भारतीय समान असून धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणांवरून भेदभाव करण्यास मनाई आहे. सर्व नागरिकांस भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचा व संघटित होण्याचा, भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचा, राहण्याचा व स्थायिक होण्याचा, कोणताही व्यवसाय करण्याचा हक्क आहे. भारतातील कोणत्याही भागात राहणाऱ्या नागरिकांस आपली स्वतःची वेगळी भाषा, लिपी व संस्कृती जतन करण्याचा हक्क आहे.

संविधानातील या तरतुदींमुळे जातिव्यवस्थेच्या चौकटीला धक्का बसला. वंशपरंपरागत व्यवसाय ही कल्पना मोडीत निघण्यास मदत झाली. जीवनाच्या सर्वत्र क्षेत्रांत बदल होण्यास सुरुवात झाली. या तरतुदींचा परिणाम यंत्रावरही कसा झाला ते पुढील चौकटीतून समजून येईल.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

ब्रिटिशांच्या काळात रेल्वेत डब्यांचे चार प्रकार होते. फर्स्ट, सेकंड, इंटर आणि थर्ड क्लास असे वर्ग होते. तिसऱ्या वर्गातील प्रवाशांसाठी नाममात्र सुविधा आणि प्रवाशांकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टिकोन यांमुळे हे वर्ग जणू भारतीय समाजव्यवस्थेचे प्रतीकच झाले होते. १९७८ च्या रेल्वे अर्थसंकल्पात मधू दंडवते यांनी तृतीय श्रेणीची व्यवस्था संपुष्टात आणली. पुढे पुणे-मुंबई दरम्यान 'सिंहगड एक्सप्रेस', मुंबई-कोलकता दरम्यान 'गीतांजली एक्सप्रेस' या वर्गविरहित गाड्या सुरू झाल्या.

वरील तरतुदींमुळे समाजात छोटे-मोठे बदल हळुवारपणे घडून येऊ लागले आहेत. आता हॉटेलमध्ये सर्वांना मुक्त प्रवेश आहे. धर्म, वंश, जात, लिंग या कारणांवरून प्रवेश नाकारला जाणार नाही अशा पाट्या आपण बघतो.

पूर्वी राजसत्तेविरुद्ध मत व्यक्त करण्यास मर्यादा होत्या. आता भारतीय नागरिक वृत्तपत्र किंवा भाषण आणि अन्य माध्यमांद्वारा सरकारविरुद्ध मतप्रदर्शन करू शकतात. आपणांस न पटणाऱ्या गोष्टी आपण बोलून दाखवू शकतो. हा फार मोठा बदल स्वातंत्र्योत्तर कालखंडात झाला आहे.

**कुटुंबसंस्था :** स्वातंत्र्यपूर्व कालखंडात कुटुंबसंस्था ही भारतीय समाजाची एक प्रमुख ओळख होती. भारत हा 'एकत्र कुटुंब पद्धतीचा देश' म्हणून

जगभर ओळखला जायचा. जागतिकीकरणाच्या लाटेत विभक्त कुटुंबद्धतीला चालना मिळाली आहे.

**समाजकल्याण :** कल्याणकारी राज्य स्थापन करण्याचे उद्दिष्ट भारताच्या संविधानातच नमूद करण्यात आलेले आहे. असे नमूद करणारा भारत हा जगातील पहिला देश आहे. भारतीय नागरिकांना पूर्ण रोजगार, आरोग्यसुविधा, शिक्षण व विकासाची संधी उपलब्ध करून देणे हे समाजकल्याण कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. भारतीय समाजात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विषमता मोठ्या प्रमाणावर आहे. स्त्रिया, मुले, दिव्यांग, अनुसूचित जाती व जमाती, अल्पसंख्याक यांच्यापर्यंत विकासाच्या संधी पोहचणे आवश्यक आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात सरकारसमोरील ते सगळ्यांत मोठे आव्हान होते. यासाठी भारत सरकारने समाजकल्याण खाते १४ जून १९६४ साली स्थापन केले. या मंत्रालयाअंतर्गत पोषण आणि बालविकास, सामाजिक सुरक्षा व सामाजिक संरक्षण, स्त्री कल्याण व विकास हे कार्यक्रम राबवले जातात. अशाच प्रकारची व्यवस्था घटकराज्य पातळीवर करण्यात आली आहे.

**अनुसूचित जाती व जमाती :** १९७१ च्या जनगणनेनुसार देशात २२% लोक अनुसूचित जाती-जमातींचे होते. या सर्वांसाठी कायदे करून शैक्षणिक शिष्यवृत्ती व प्रतिनिधित्व देऊन संसदेत व राज्य विधिमंडळात आणि शासकीय सेवेत काही राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत.

**सार्वजनिक आरोग्य :** भारतीय संविधानात शासनाचे प्राथमिक कर्तव्य म्हणून भारतीय जनतेचे राहणीमान वाढवावे, सुपोषण साधावे व सार्वजनिक आरोग्यही सुधारावे असे नमूद केले आहे. केंद्रशासनाचे आरोग्य व समाजकल्याण मंत्रालय या संदर्भात राज्यशासनास मदत करते. सहाव्या पंचवार्षिक योजनेत प्राथमिक स्वरूपाची आरोग्यसेवा तसेच वैद्यकीय सेवा ग्रामीण भागातील लोक, आदिवासी व गरीब लोकांना उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट होते. आरोग्याच्या संदर्भात भारतात ॲलोपॅथी, युनानी, होमिओपॅथी, आयुर्वेद आणि निसर्गोपचार पद्धतींना मान्यता देऊन लोकांचे आरोग्य चांगले ठेवण्याचा प्रयत्न सुरू झाला.

आरोग्याच्या क्षेत्रातील बदलांमुळे भारतीयांचे जीवन अधिकाधिक चिंतारहित होण्यास मदत झाली. १९६२ मध्ये तमिळनाडूमधील वेल्लूर येथील ख्रिश्चन मेडिकल कॉलेजच्या इस्पितळात डॉ.एन.गोपीनाथ यांच्या नेतृत्वाखाली भारतात 'ओपन हार्ट शस्त्रक्रिया' यशस्वी करण्यात आली. त्यामुळे अशा उपचारांसाठी परदेशी जाण्याची गरज राहिली नाही.

'जयपूर फूट'च्या शोधाने भारतातील दिव्यांगांचे आयुष्य बदलून गेले. १९६८ पूर्वी एखाद्या व्यक्तीला अपघात झाला आणि त्यात पाय जायबंदी झाला तर उर्वरित आयुष्य अडचणीत काढावे लागे. यावर उपाय म्हणून डॉ.प्रमोद सेठी यांनी कुशल कारागीर रामचंद्र शर्मा यांच्या मदतीने कृत्रिम हात, पाय, नाक, कान तयार केले.

जयपूर फूट तंत्रज्ञान वापरून तयार केलेल्या कृत्रिम अवयवांमुळे दिव्यांग रुग्ण अनवाणी व खडबडीत जमिनीवरून चालणे, पळणे, सायकल चालवणे, शेतातील कामे करणे, झाडावर चढणे व गिर्यारोहण करणे अशी कामे सहजपणे करू शकतात. या कृत्रिम पायांवर बूट घालण्याची गरज नसल्याने बुटांचा खर्च वाचतो. पाय दुमडणे, मांडी घालणे हे या कृत्रिम पायांमुळे शक्य झाले. पाण्यात वा ओल्या स्थितीत काम करण्यासाठी हे पाय सोईचे आहेत.

**मूत्रपिंड प्रत्यारोपण (किडनी ट्रान्सप्लांट) :** ही शस्त्रक्रिया भारतात साध्य झाल्याने रुग्णांचे प्राण वाचवण्यात डॉक्टरांना यश आले. १९७१ पूर्वी अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया भारतात फारशा होत नव्हत्या. तमिळनाडूमधील वेल्लूर येथील ख्रिश्चन मेडिकल कॉलेजच्या इस्पितळात ही शस्त्रक्रिया १९७१ मध्ये यशस्वी झाली. डॉ.जॉनी व डॉ.मोहन राव यांनी जीवित व्यक्तीने दान केलेल्या मूत्रपिंडाचे रुग्णाच्या शरीरात यशस्वी प्रत्यारोपण केले. आता अविकसित देशातील रुग्ण भारतात या शस्त्रक्रिया करवून

घेण्यासाठी येतात.

**टेस्ट ट्यूब बेबी :** भारतीय कुटुंबव्यवस्थेत पूर्वीपासून अपत्य होणे ही महत्त्वाची गोष्ट मानली जायची. अपत्य पाहिजे असणाऱ्या पती-पत्नी यांना या समस्येवर मात करण्यासाठी 'टेस्ट ट्यूब बेबी' या तंत्रज्ञानाचा आधार १९७८ पासून उपलब्ध झाला. कोलकता येथे डॉ.सुभाष मुखोपाध्याय यांच्या देखरेखीखाली टेस्ट ट्यूब बेबीचा प्रयोग यशस्वी झाला. हा पहिला कृत्रिम गर्भधारणतंत्राचा यशस्वी प्रयोग ठरला. या तंत्रज्ञानाद्वारे 'दुर्गा' या मुलीचा जन्म झाला. यामुळे अपत्य हवे असलेल्या पालकांचे प्रश्न सुटण्यास मदत झाली.

**लसीकरण :** १९७८ पूर्वी भारतात दरवर्षी जन्माला आलेल्या दहा मुलांपैकी सहा मुले जन्मानंतरच्या पहिल्या वर्षातच प्राणघातक संकटांना सामोरी जात होती. पोलिओ, गोवर, धनुर्वात, क्षय, घटसर्प, डांग्या खोकला यांवर मात करण्यासाठी लसीकरणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. १९९५ मध्ये 'पल्स पोलिओ' लसीकरणाची मोहीम हाती घेण्यात आली. यामुळे पोलिओ आटोक्यात आला.

## शहरीकरण

शहरात किंवा नागरी क्षेत्रात लोकवस्ती केंद्रीत होण्याच्या प्रक्रियेस शहरीकरण म्हणतात. नागरीकरण घडून येण्यास वाढीव लोकसंख्या हे एक महत्त्वाचे कारण आहे. हवा, पाणी, समूहजीवनासाठी आवश्यक असणाऱ्या आर्थिक व सामाजिक संस्था हे घटक नागरीकरणावर परिणाम घडवून आणतात.

स्वातंत्र्योत्तर भारताच्या संदर्भात नागरी लोकसंख्या वाढीची काही प्रमुख कारणे म्हणजे मृत्युदरातील घट, औद्योगिकीकरण, ग्रामीण भागातील रोजगाराची अनुपलब्धता, शहरातील रोजगार संधी व व्यापार, स्थलांतर ही होत.

शहरांवर येणारा हा ताण थांबवायचा असल्यास छोट्या-छोट्या गावांमध्ये रोजगार उपलब्ध करून देणे, आर्थिक विकासाचा समतोल साधणे, आर्थिक विकासाला चालना देणे, महानगरांची वाढ नियंत्रित करणे, ग्रामीण व नागरी भागांत आवश्यक सेवा व सुविधा पुरवणे हे उपाय आहेत.

## ग्रामीण भाग

स्वतंत्रीत्या किंवा सामूहिक रीतीने स्वतः कसत असलेल्या जमिनीजवळ राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या कायम वस्तीला गाव असे म्हणतात. शेतीचा शोध लागला तेव्हापासून गाव अस्तित्वात आले. भारतातील खेडेपद्धती विरळ लोकवस्ती असलेली पद्धती आहे. भोवताली पसरलेल्या शेतजमिनी आणि मधे दाटीवाटीने वसलेली घरे हे भारतीय खेडेगावचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. ग्रामीण समुदाय हा मोठा असला तरी तो नागरी समुदायाच्या तुलनेत कितीतरी लहान असतो. गावापेक्षा छोटा गट म्हणजे वस्ती होय.

संपूर्ण भारतातील ग्रामरचना एकसारखी नाही. प्रादेशिक स्वरूपाप्रमाणे आणि स्थल वैशिष्ट्यांनुसार यात फरक पडतो.

**स्वातंत्र्योत्तर कालखंड :** ग्रामविकासाच्या दृष्टीने सामूहिक विकास योजना सुरू करण्यात आली. तिच्याद्वारे शेतीतंत्र बदलणे, जलसिंचन वाढवणे, शिक्षणाचा प्रसार करणे, भूसुधारणा कायदे संमत करणे अशा योजना आखण्यात आल्या. या योजनेनुसार शेतीचे उत्पन्न वाढवणे, ग्रामीण भागात दळणवळण, आरोग्य आणि शिक्षणाचा प्रसार करणे हे एक उद्दिष्ट होते. गावांमधील आर्थिक विकासास प्राधान्य देण्याचे ठरले. यासाठी सरकारने ग्रामपंचायतींच्या माध्यमातून हे कार्य सुरू केले. ग्रामपंचायतीच्या रचनेत सर्वच जाती-जमातींमधील लोकांना सामावून घेण्यास सुरुवात झाली. यासाठी ग्रामपंचायती, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांचे अधिकार वाढवण्यात आले.

**बदलते आर्थिक जीवन :** पूर्वी गावांचे जीवन आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होते. गावातील बहुसंख्य लोक शेतीवर अवलंबून असत. शेतीतील उत्पादन कारागीरांना त्यांच्या कामाचा मोबदला म्हणून वाटण्यात येत असे. आता ही परिस्थिती बदलली आहे. ग्रामीण भाग शेती व शेतीनिगडित जोडधंद्यांशी

जोडला गेला आहे, तर नागरी समाज बिगरशेती उत्पादन व सेवा व्यवसायांशी जोडला आहे.

**ग्रामीण विकास :** भारतात १९६१ मध्ये ८२% लोक ग्रामीण भागात राहत होते तर १९७१ मध्ये हे प्रमाण ८०.१% होते. अन्नधान्य व अन्य कच्चा माल यांचे उत्पादन करून शहरांची गरज भागवणे, शहरातील औद्योगिक विभागांना श्रमिक पुरवणे, नैसर्गिक साधनसंपत्तीची देखभाल करणे या गोष्टी ग्रामीण भाग आजवर करत आला आहे. यामुळे आर्थिक व्यवसायांचा विकास करणे, सामाजिक गरजा व सुविधांचा विकास करणे, सांस्कृतिक, सामाजिक व वैचारिक दृष्टिकोनात बदल घडवून आणणे ही तीन महत्त्वाची आव्हाने ग्रामीण विकासासंदर्भात आहेत. जमीन सुधारणा व जलसिंचन प्रकल्पास गती देणे आवश्यक आहे.

**सामाजिक गरजा व सुविधा :** सार्वजनिक स्वच्छता व आरोग्याच्या सोईंकडे प्राधान्यक्रमाने लक्ष देणे गरजेचे आहे. पिण्याच्या पाण्याची बारमाही सोय, स्वच्छतागृह, झाकलेली गटारे, अरुंद रस्ते, अपुरे विद्युतीकरण, औषधोपचारांची गैरसोय या प्रश्नांनी ग्रामीण भागाला आजही वेढले आहे. प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंतच्या दर्जेदार सोईंची अनुपलब्धता, मनोरंजन केंद्रे व वाचनालयांची कमतरता यांमुळे ग्रामीण भागाकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

भारत सरकारच्या पहिल्या चारही पंचवार्षिक योजनांमध्ये समूह विकास योजनेला महत्त्वाचे स्थान होते. महाराष्ट्र राज्याने या योजनेअंतर्गत प्रभावी कामगिरी केली. महाराष्ट्रात १९६२ मध्ये जिल्हा परिषदा स्थापन करण्यात आल्या. १९७०-७१ मध्ये महाराष्ट्रात सकस आहार योजना सुरू करण्यात आली. विहिरी खणणे व नळांवाटे पाणीपुरवठा करणे यासाठी 'ग्रामीण पाणीपुरवठा योजना' सुरू करण्यात आली. १९७१ अखेर १६७७ छोट्या पाटबंधाऱ्यांची कामे पूर्ण करण्यात आली.

**ग्रामीण विद्युतीकरण :** ग्रामीण भागात विकासासाठी विजेची नितांत गरज असते. शेतीला पाण्याचा पुरवठा करण्यासाठी स्वयंचलित पंप लागतात, दूध व अंडी यांसारखे नाशवंत पदार्थ टिकवणे, फळे व भाजीपाला टिकवणे, खत प्रकल्प चालवणे, विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी रात्री प्रकाश असणे, पंखा, दूरदर्शन या यंत्रांसाठी वीज लागते. भारतात पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात तीन हजार खेड्यांचे विद्युतीकरण झाले होते. १९७३ मध्ये हा आकडा १,३८,६४६ खेड्यांपर्यंत पोहचला. १९६६ पासून पंप व कूपनलिकांना अधिक वीज देण्याची योजना आखण्यात आली. १९६९ मध्ये

**जागतिकीकरणपूर्व कालखंडातील ग्रामीण व नागरी समाज**

| ग्रामीण समुदाय | नागरी समुदाय |
|---|---|
| शेती व जोडधंद्यांना प्राधान्य. | बिगरशेती उत्पादन व सेवा व्यवसाय प्राधान्य. |
| आकाराने लहान, भाषा संस्कृती व परंपरा एकजिनसी. | आकाराने मोठा, भाषा, संस्कृती व परंपरा बहुजिनसी. |
| प्राथमिक स्वरूपाचे व्यवसाय, बाहेरील लोकांना ग्रामीण व्यवसायात सामावून घेण्यापेक्षा गावातून त्यांना शहरात पाठवणारा. | मोठमोठे व्यवसाय व उत्पादन जागतिक पातळीसाठी. अन्य भागातून येणाऱ्यांना सामावून घेणारा. |
| आनुवंशिक व्यावसायिक प्रमाण जास्त. | आनुवंशिक व्यावसायिक प्रमाण दुय्यम. |
| कुटुंबप्रमुख व कुटुंबव्यवस्था प्राधान्य एकत्र कुटुंबपद्धती. | कुटुंब दुय्यम प्राधान्य. व्यक्तीला प्राधान्य. एकत्र कुटुंबपद्धतीचे विघटन. |

'ग्रामीण विद्युतीकरण निगम' स्थापण्यात आले. यातूनच आंध्र प्रदेश, गुजरात, कर्नाटक, महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश या राज्यांत ग्रामीण विद्युतीकरण सहकारी संस्था अस्तित्वात आल्या.

**औद्योगिक विकास :** ग्रामीण औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी 'ग्रामोद्योग नियोजन समिती' स्थापन करण्यात आली. १९७२ अखेरपर्यंत या योजनेत एक लाख सहा हजार लोकांना रोजगार मिळाला.

ग्रामीण भागात प्रतिकूल परिस्थितीत राहणाऱ्या विशेष बुद्धिमान विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सातारा, औरंगाबाद, नाशिक व चिखलदरा येथे विद्या निकेतन या वसतिगृहयुक्त माध्यमिक शाळा काढल्या. कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार महाराष्ट्रात राहुरी, अकोला, परभणी व दापोली येथे कृषी विद्यापीठे सुरू करण्यात आली. महाराष्ट्राने शिक्षण क्षेत्रात केलेल्या कार्याची नोंद घेऊन युनेस्कोने १९७२ मध्ये साक्षरता प्रसार गौरवाचे आंतरराष्ट्रीय पारितोषिक महाराष्ट्राला दिले.

अशा रीतीने स्वातंत्र्योत्तर काळात सुरुवातीला आलेल्या अडथळ्यांवर मात करून भारताने विकास साधण्यास सुरुवात केली. पुढील पाठात आपण अन्य क्षेत्रातील प्रगतीचा अभ्यास करणार आहोत.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) डॉ.एन.गोपीनाथ यांच्या नेतृत्वाखाली भारतात ......... या शहरात पहिली ओपन हार्ट शस्त्रक्रिया यशस्वी झाली.

(अ) चेन्नई (ब) वेल्लूर (क) हैदराबाद (ड) मुंबई

(२) 'जयपूर फूट'चे जनक म्हणून ......... यांना ओळखले जाते.

(अ) डॉ. एन.गोपीनाथ (ब) डॉ. प्रमोद सेठी (क) डॉ. मोहन राव (ड) यांपैकी नाही

**२. पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखून लिहा.**

(१) डॉ.एन.गोपीनाथ - ओपन हार्ट शस्त्रक्रिया
(२) रामचंद्र शर्मा - कुशल कारागीर
(३) डॉ. सुभाष मुखोपाध्याय - टेस्ट ट्यूब बेबी
(४) डॉ. मोहन राव - पोलिओ

**३. टीपा लिहा**

(१) कुटुंबसंस्था (२) जयपूर फूट तंत्रज्ञान
(३) शहरीकरण (४) बदलते आर्थिक जीवन

**४. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) पल्स पोलिओ लसीकरणाची मोहीम हाती घेण्यात आली.
(२) ग्रामीण पाणीपुरवठा योजना सुरू करण्यात आली.

**५. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) संविधानाप्रमाणे कोणत्या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई आहे ?
(२) समाजकल्याण कार्यक्रमाचे कोणते उद्दिष्ट आहे?
(३) ग्रामीण विकासासंदर्भात कोणती आव्हाने आहेत?

**६. सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रात भारतात झालेल्या ठळक घडामोडींचा थोडक्यात आढावा घ्या.**

**उपक्रम**

तुमच्या परिसरातील एखाद्या ज्येष्ठ व्यक्तीची खालील मुद्द्यांच्या आधारे मुलाखत घ्या.

- घरांच्या रचनेत झालेला बदल
- शेतीच्या संदर्भातील बदल
- वाहनांची उपलब्धता

F3TF7E

# १० बदलते जीवन : भाग २

या पाठात आपण भाषा, क्रीडा, नाटक आणि चित्रपट, वृत्तपत्रे आणि दूरदर्शन या क्षेत्रांत झालेल्या बदलांविषयी माहिती घेणार आहोत.

**भाषा :** भारतात हिंदी, आसामी, बंगाली, गुजराथी, कन्नड, काश्मिरी, मल्याळम, मराठी, उडिया, पंजाबी, संस्कृत, तमिळ, तेलुगु, उर्दू, कोंकणी, मणिपुरी, नेपाळी आणि सिंधी या भाषा महत्त्वाच्या आहेत. त्या भारतीय भाषांच्या बोलीभाषा सुद्धा आहेत. त्यांची संख्या आता कमी होत आहे. त्या वेळीच जपायला हव्यात. अन्यथा एक चांगला ठेवा नष्ट होईल. असे असले तरी हिंदी चित्रपटांमधून सर्वत्र पोहचलेल्या हिंदी भाषेने भाषिकदृष्ट्या देश जोडण्याचे काम केले आहे.

### माहीत आहे का तुम्हांला?

१९६१ मध्ये नागालँडचे भाषिक विवरण पुढीलप्रमाणे आहे.

भाषा व लोकसंख्या यांचे प्रमाण

| | |
|---|---|
| अंगामी-३३७६६ | सेमा-४७४३९ |
| लोथा-२६५६५ | अेओ-५५९०४ |
| रेंगमा-५७८६ | चारवेसंग-३३९ |
| खेझा-७२९५ | संगतम पोचुरी-२७३६ |
| संगतम-१५५०८ | कौनियाक-४६६५३ |
| चांग-११३२९ | फोम-१३३८५ |
| यीमचुंग्रे-१०१८७ | खीमनुंगम-१२४३४ |
| झेलियंग सेमी-६४७२ | लियांगमे-२९६९ |
| कुकी-चीरू-११७५ | मकवरे-७६९ |
| तिखिर-२४६८ | |

या विविधतेचा परिणाम कोहिमा आकाशवाणी केंद्रावर झाला. या केंद्राला २५ भाषांमधून प्रसारण करावे लागायचे. यात इंग्रजी, हिंदी, नागा बोली आणि इतर १६ नागा भाषा यांचा समावेश आहे.

१९९० नंतर सुरू झालेल्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे भारतात 'इंग्रजी' भाषेचे प्राबल्य वाढत चालले आहे. इंग्रजी ही भाकरीची भाषा होऊ लागली आहे. नोकरीच्या अनेक संधी इंग्रजी भाषेमुळे उपलब्ध होऊ लागल्या आहेत. इंग्रजी शिकण्यात भारतीय लोक आघाडीवर आहेत. तथापि या प्रक्रियेने प्रादेशिक भाषांचे अस्तित्व धोक्यात येऊ नये याची काळजी घ्यायला हवी.

### शोध घेऊया.

महाराष्ट्रातील बोलीभाषांची माहिती विविध साधनांच्या आधारे (कोश, गुगल, विकीपिडीया, संशोधकांचे लेख) शोधूया.

**क्रीडा :** स्वातंत्र्यपूर्वकाळात क्रीडा क्षेत्रात मोजक्या खेळांची नावे घेतली जायची. यात बदल करण्याचे काम काही खेळाडूंनी केले. त्यामुळे खेळ आणि खेळाडू दोघेही मोठे झाले. यांतील एक उदाहरण म्हणजे गीत सेठी होय. बिलियर्ड्स या खेळाच्या स्नूकर या प्रकारात सेठी यांनी जागतिक प्रावीण्य मिळवले. वयाच्या १५व्या वर्षी बिलियर्ड्सची कुमार राष्ट्रीय स्पर्धा त्यांनी जिंकली. पुढे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांत त्यांनी अजिंक्यपदे मिळवली. जागतिक व्यावसायिक स्पर्धेत पाच वेळा, जागतिक हौशी बिलियर्ड्स स्पर्धेत तीन वेळा त्यांनी विजेतेपद मिळवले. या खेळाला त्यांनी लोकप्रियता मिळवून दिली. वृत्तपत्रांमध्ये या खेळाच्या बातम्या छापून येण्यास सेठी यांचे कर्तृत्व कारणीभूत आहे. भारतातील उदयोन्मुख खेळाडूंस त्यांनी नवे क्षेत्र उपलब्ध करून दिले.

१९८३ मध्ये कपिल देव यांच्या नेतृत्वाखाली भारताने क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत ऐतिहासिक विजय मिळवला आणि या खेळाला देशभरात मोठी लोकप्रियता मिळाली. याच वर्षी सुनील गावसकर

यांनी कसोटींमध्ये सर्वाधिक शतकांचा विक्रम केला. १९८५ मध्ये भारताने 'बेन्सन अँड हेजेस' क्रिकेट स्पर्धेत अजिंक्यपद मिळवले. याचा परिणाम भारतातल्या सर्वच राज्यांमध्ये कमी-अधिक प्रमाणात क्रिकेट हा खेळ खेळला जाऊ लागला. देशी खेळ मागे पडून क्रिकेटचा खेळ आघाडीवर आला. क्रिकेट या खेळाला केंद्रस्थानी ठेवून काही चित्रपटांची निर्मिती करण्यात आली. दूरदर्शनवर पूर्ण पाच दिवस, एक दिवस असे खेळाचे प्रसारण सुरू झाले.


सुनील गावसकर

एशियाड आणि ऑलिंपिक स्पर्धांमध्ये भारत सहभागी होता. इ.स.२००० च्या ऑलिंपिकमध्ये करनाम मल्लेश्वरी हिने भारत्तोलन (वेटलिफ्टिंग) पदक मिळवले. ऑलिंपिकमध्ये पदक मिळवणारी ती पहिली भारतीय महिला होय. हॉकी, पोहणे, तिरंदाजी, वजन उचलणे, टेनिस, बॅडमिंटन या स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व वाढू लागले.


करनाम मल्लेश्वरी

**नाटक आणि चित्रपट :** नाटक आणि चित्रपट हा भारतीयांच्या जीवनातील महत्त्वाचा घटक आहे. पूर्वी नाटके खूप वेळ कधी-कधी रात्रभर चालायची. आताच्या काळात नाटकांचे स्वरूप, तंत्र, वेळ बदलून गेले. वेगवेगळ्या क्षेत्रांतील लोक नाटकांमध्ये सामील होऊ लागले. संगीत रंगभूमीचे महत्त्व पूर्वीपेक्षा कमी होऊ लागले. पौराणिक व ऐतिहासिक विषयांऐवजी राजकारण, समाजकारण या विषयांना प्राधान्य मिळू लागले.

चित्रपटाच्या क्षेत्रात कृष्णधवल चित्रपटांच्या नंतर रंगीत चित्रपटांचे युग आले. मनोरंजन क्षेत्रातील हिंदी चित्रपटांचे स्थान अतुलनीय आहे. समकालीन परिस्थितीचे चित्रण चित्रपटांमध्ये उमटू लागले. चित्रिकरणाची स्थळे देशाबाहेर जाऊ लागली. देश-परदेशांतील वैविध्यपूर्ण जागा लोकांना दिसू लागल्या. परकीय भाषांमधील चित्रपट अनुवादित होऊ लागले. इंग्रजी चित्रपटांच्या प्रदर्शनावेळी हिंदी अनुवाद पडद्यावर दिसू लागले. हिंदी चित्रपट जागतिक चित्रपटांशी स्पर्धा करू लागले. हिंदी चित्रपट जगभर पोहचले. राजकारण, समाजकारण, उद्योग, तंत्रज्ञान यांचे प्रतिबिंब चित्रपटांमध्ये उमटू लागले. पूर्वी ३-४ तास चालणारा सिनेमा दीड तासांवर येऊ लागला. एकच पडदा आणि एकच चित्रपटगृह ही संकल्पना बदलली. यामुळे एकच सिनेमा १०० आठवडे चालण्याचे प्रमाण संपून एक चित्रपट एकाच वेळी देशा-परदेशांत हजारो चित्रपटगृहांमध्ये दिसू लागला. यामुळे चित्रपटांचे अर्थकारण बदलून गेले. चित्रपट निर्मितीस उद्योगाचा दर्जा प्राप्त झाला. हा उद्योग कोट्यवधी लोकांना सामावून घेऊ लागला. प्रादेशिक भाषांमधील चित्रपट उद्योग बहरून आला.

**वृत्तपत्रे :** बदलत्या जीवनशैलीचा प्रभाव वृत्तपत्रांवर आणि प्रसारमाध्यमांवर पडला. या माध्यमांचा प्रभाव व्यक्तिगत आणि सामूहिक जीवनावर सुद्धा पडला. स्वातंत्र्योत्तर कालखंडात दैनंदिन घडामोडींच्या ताज्या बातम्या देणे, जाहिराती छापून उद्योग-व्यवसायाला चालना देणे, लोकमत घडवणे, लोकमत विधायक कामासाठी प्रभावित करून प्रसंगी नेतृत्व करणे, प्रबोधन करणे, शासन व्यवस्थेवर अंकुश ठेवणे अशा विविध उद्दिष्टांनी वृत्तपत्रे कार्यरत होती. या काळात वृत्तपत्रे कृष्णधवल रंगांत छापली जात होती.

पुढे काळ बदलला आणि वृत्तपत्रे रंगीत झाली. पूर्वी तालुका किंवा जिल्ह्याचे मुखपत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वृत्तपत्रांना खूप मोठ्या प्रमाणात राज्यस्तरीय साखळी स्वरूपाच्या पत्रांशी स्पर्धा करावी लागत आहे. वृत्तपत्रे आता अधिकच सक्रीय होऊ

लागली आहेत. दुष्काळग्रस्तांसाठी निधी उभारणे, पूरग्रस्तांसाठी निधी उभारणे, हुशार परंतु आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मदत करणे, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे वा पुरस्कृत करणे अशा विविध मार्गांनी वृत्तपत्रे आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झाली आहेत.

**दूरदर्शन :** भारतात स्वातंत्र्योत्तर कालखंडात दूरदर्शनचे आगमन झाले. सुरुवातीला कृष्णधवल असणारे दूरदर्शन पुढे रंगीत झाले. सुरुवातीला मोजकेच कार्यक्रम आणि ठरावीक वेळ मनोरंजन असे दूरदर्शनचे स्वरूप होते. पुढे शैक्षणिक उपक्रम, वार्तापत्रे, राष्ट्रपती-प्रधानमंत्र्यांच्या दौऱ्यांचे सविस्तर वार्तांकन, बातम्या असे एक-एक उपक्रम वाढत गेले. रामायण आणि महाभारत या मालिकांच्या काळात बहुसंख्य लोक दूरदर्शनसमोर बसून असायचे. या माध्यमाच्या लोकप्रियतेची चुणूक या मालिकांनी दाखवून दिली. १९९१ च्या इराक युद्धाचे जिवंत दृश्य वार्तांकन सीएनएन वाहिनीने जगभर दाखवले. या टप्प्यावर भारतातील वृत्तवाहिन्यांचे विश्वच बदलून गेले. १९९८ मध्ये स्टार (सॅटेलाइट टेलिव्हिजन एशिया रिजन) हा खासगी उद्योगसमूह भारतात आला. यामुळे भारतातील सुरुवातीच्या काळातील नीरस, एकसुरी, प्रचारकी स्वरूपाच्या बातम्यांचे विश्वच बदलून गेले.

भाषा, सादरीकरणाचे तंत्र, तंत्रसज्ज स्टुडिओ आणि ओबी (आउटडोअर ब्रॉडकास्टिंग) व्हॅन्सचा वापर यांमुळे या वाहिन्यांनी विस्तार घडवून आणला. यामुळे वार्तांकनात खुलेपणा, बहुविधता आली. देशाचा कानाकोपरा जोडला गेला. याचा परिणाम राजकारणावर सुद्धा झाला. सारा देश बदलू लागला.

आतापर्यंत आपण आधुनिक भारताचा इतिहास अभ्यासला. पुढील वर्षी 'इतिहास' या विषयाचे व्यवहारिक जगतात उपयोजन कसे करायचे हे आपण शिकणार आहोत. इतिहास हा दैनंदिन जगण्याचा भाग कसा होऊ शकतो हे आपण बघणार आहोत.

F43B92



## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) भारताने ......... च्या नेतृत्वाखाली विश्वचषक क्रिकेट स्पर्धा जिंकली.
(अ) सुनील गावसकर (ब) कपिल देव
(क) सय्यद किरमाणी (ड) संदीप पाटील

(२) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे भारतात......... भाषेचे प्राबल्य वाढत चालले आहे.
(अ) पंजाबी (ब) फ्रेंच (क) इंग्रजी (ड) हिंदी

**२. दिलेल्या सूचनेप्रमाणे कृती करा.**

पुढील तक्ता पूर्ण करा.

| | | |
|---|---|---|
| १. | भारतातील महत्त्वाच्या भाषा | ................. ................. |
| २. | ऑलिंपिक स्पर्धांमध्ये पदकप्राप्त खेळाडू | ................. ................. |
| ३. | तुम्ही पाहिलेले बालचित्रपट | ................. ................. |
| ४. | विविध बातम्यांचे प्रसारण करणाऱ्या वृत्तवाहिन्यांची नावे | ................. ................. |

**३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) भारतात सर्वत्र कमी-अधिक प्रमाणात क्रिकेट खेळले जाऊ लागले.
(२) चित्रपटांचे अर्थकारण बदलत आहे.

**४. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) भारतीय भाषांच्या बोलीभाषा जपणे का आवश्यक आहे ?
(२) वृत्तपत्रांचे बदलते स्वरूप स्पष्ट करा.
(३) दूरदर्शन या माध्यमात कोणते बदलत झाले आहेत ?

**उपक्रम**

(१) दादासाहेब फाळके यांच्याविषयी माहिती आंतरजालाच्या साहाय्याने मिळवा. दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित व्यक्तींची यादी तयार करा.
(२) लोकशाहीचा चौथा स्तंभ 'वृत्तपत्र' याविषयी शाळेत निबंधस्पर्धा आयोजित करा.

# राज्यशास्त्र

## भारत आणि जग

### अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| १. | महायुद्धोत्तर राजकीय घडामोडी | ५७ |
| २. | भारताच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल | ६५ |
| ३. | भारताची सुरक्षा व्यवस्था | ७२ |
| ४. | संयुक्त राष्ट्रे | ७७ |
| ५. | भारत व अन्य देश | ८४ |
| ६. | आंतरराष्ट्रीय समस्या | ९१ |


इयत्ता आठवीपर्यंत नागरिकशास्त्र म्हणून शिकवला जाणारा विषय इयत्ता नववीपासून राज्यशास्त्र या नावाने आपण शिकणार आहोत. नागरिकशास्त्राप्रमाणेच राज्यशास्त्रातही आपण आपल्या राजकीय जीवनाचा अभ्यास करणार आहोत. हा अभ्यास आता अधिक व्यापक आणि सखोल होणार आहे. राजकीय जीवनात ज्याप्रमाणे स्थानिक शासन, संविधान, संविधानातील मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे इत्यादींचा समावेश असतो, त्याचप्रमाणे देशाची शासनव्यवस्था, राज्यकारभार, धोरणनिर्मिती, लोकशाही, विविध चळवळी यांचाही समावेश असतो. शासनाचे निर्णय, शासनाची धोरणे, शासनाकडून केला जाणारा सत्तेचा वापर यांचा सामान्य माणसाच्या जीवनावर परिणाम होतो. राज्यशास्त्र या सर्व बाबींचा शास्त्रशुद्ध व चिकित्सक रीतीने अभ्यास करते. राज्यशास्त्राच्या अभ्यासातून तुम्हांला राजकीय घडामोडी, राजकीय प्रवाह आणि प्रक्रिया यांचे अधिक चांगले आकलन होईल. कोणत्याही क्षेत्रात काम करण्यास आणि प्रावीण्य मिळवण्यात या आकलनाचा फायदा होईल.

# क्षमता विधाने

| अ.क्र. | घटक | क्षमता |
|---|---|---|
| १. | १९४५ पासूनचे जग – महत्त्वाचे प्रवाह | □ शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे आंतरराष्ट्रीय शांततेला धोका निर्माण होतो याची जाणीव होणे.<br>□ शीतयुद्धोत्तर काळातील जागतिक घडामोडींचे विश्लेषण करता येणे.<br>□ जागतिकीकरणाला भारताने दिलेल्या प्रतिसादाची माहिती करून घेणे.<br>□ जागतिकीकरणाच्या संदर्भात विविध देशांचे परस्परावलंबित्व जाणून घेऊन त्याबाबत चर्चा करणे. |
| २. | भारताच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल | □ परराष्ट्र धोरणाचा अर्थ सांगता येणे.<br>□ परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टांबाबत आदर बाळगणे.<br>□ स्वतंत्र भारताचे परराष्ट्र धोरण विविध घटनांच्या साहाय्याने स्पष्ट करता येणे.<br>□ भारत आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेस नेहमीच प्राधान्य देतो, ही जाणीव विकसित करणे. |
| ३. | भारताची सुरक्षाव्यवस्था | □ भारतातील संरक्षण यंत्रणेचे स्वरूप समजून घेणे.<br>□ लष्करी व निमलष्करी दलांच्या कार्याचे वर्गीकरण करता येणे.<br>□ मानवी सुरक्षा ही संकल्पना स्पष्ट करता येणे.<br>□ अंतर्गत सुरक्षिततेविषयी असणाऱ्या आव्हानांची जाणीव असणे.<br>□ एखाद्या आव्हानाचा अभ्यास करून त्याची संशोधनपत्रिका तयार करता येणे. |
| ४. | संयुक्त राष्ट्रे | □ संयुक्त राष्ट्रे ही एक महत्त्वाची जागतिक संघटना असल्याचे सांगता येणे.<br>□ संयुक्त राष्ट्रे शांतता रक्षण करतात हे विशद करणे.<br>□ सर्व राष्ट्रांच्या विकासासाठी शांतता आवश्यक असते, याची जाणीव विकसित होणे.<br>□ संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत बदल होण्याविषयीची गरज स्पष्ट करता येणे. |
| ५. | भारत आणि अन्य देश | □ भारताचे भौगोलिक स्थान व त्याचा भारताच्या अंतर्गत व परराष्ट्र धोरणावर होणारा परिणाम स्पष्ट करता येणे.<br>□ शेजारी देशांशी मैत्रीपूर्ण संबंध असावेत हा विचार दृढ होणे.<br>□ प्रादेशिक सहकार्यासाठी असलेल्या संघटनांविषयी कारणमीमांसा करणे.<br>□ भारत व अन्य देश यांच्यातील आर्थिक व व्यापारी संबंधांत होत असलेल्या बदलांचा आढावा घेता येणे. |
| ६. | आंतरराष्ट्रीय समस्या | □ मानवी हक्क जगातील प्रत्येक माणसाला प्राप्त होतात हा विचार विकसित होणे.<br>□ भारतीय संविधान व कायदे यांद्वारे मानवी हक्कांचे संरक्षण कसे होते हे जाणून घेणे.<br>□ पर्यावरण ऱ्हास ही एक जागतिक समस्या आहे ही जाणीव विकसित होणे.<br>□ निर्वासित म्हणजे कोण हे स्पष्ट करता येणे. |

# १ महायुद्धोत्तर राजकीय घडामोडी

**चला, थोडी उजळणी करूया!**

यामागील इयत्तांच्या नागरिकशास्त्राच्या पाठ्यपुस्तकांमधून आपण स्थानिक शासनसंस्था, भारताचे संविधान आणि आपल्या देशातील राज्यपद्धती किंवा शासनाची रचना यांचा अभ्यास केला. या इयत्तेत आपण आता भारताचे जगाशी असणारे संबंध पाहणार आहोत. भूगोलाच्या अभ्यासातून तुम्हांला जगाची भौगोलिक रचना समजली असेल. इतिहासाच्या अभ्यासातून ऐतिहासिक काळातील जागतिक घडामोडी समजल्या असतील. राज्यशास्त्राच्या अभ्यासातून आपण आता भारताचे जगाशी असणारे संबंध व महत्त्वाच्या जागतिक समस्या समजून घेणार आहोत.

आपण सर्वजण वेगवेगळ्या कारणांसाठी, सोई-सुविधांसाठी समाजातील व्यक्ती, संस्था व संघटनांवर अवलंबून असतो. आपले सामाजिक जीवन परस्परावलंबी असते व त्यात परस्पर सहकार्य खूप महत्त्वाचे असते, हे आपण पाहिले. हे जसे व्यक्ती आणि समाजाबाबत आहे, तसेच ते विविध राष्ट्रांबाबतही आहे. भारताप्रमाणे जगात अनेक स्वतंत्र देश आहेत. त्यांच्यात सातत्याने काही देवाण-घेवाण चाललेली असते, व्यवहार होत असतात. ही स्वतंत्र राज्ये परस्परांशी करारही करत असतात. या सर्व स्वतंत्र व सार्वभौम देशांची मिळून एक व्यवस्था तयार होते. तिला आपण आंतरराष्ट्रीय व्यवस्था म्हणतो. या आंतरराष्ट्रीय व्यवस्थेची काही वैशिष्ट्ये आपण जाणून घेऊ.

**परस्परावलंबन :** जगातले सर्व देश कोणत्या ना कोणत्या कारणांसाठी परस्परांवर अवलंबून असतात. राष्ट्र कितीही मोठे, समृद्ध आणि विकसित असो, ते कधीच सर्व बाबतींत स्वयंपूर्ण असू शकत नाही. मोठ्या राष्ट्रांनाही अन्य त्यांच्यासारख्याच मोठ्या आणि छोट्या राष्ट्रांवर अवलंबून राहावे लागते. म्हणून परस्परावलंबन हे आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचे म्हणजेच आजच्या जागतिक व्यवस्थेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

**मला पडलेले प्रश्न...**

* व्यक्ती आणि राष्ट्रांच्या परस्परावलंबनात काय फरक असतो बरे ?
* श्रीमंत देश आणि गरीब देश अशी काही विभागणी असते का ?
* देशाचा कारभार जसा संविधानाच्या आधारे चालतो, तसे जागतिक पातळीवर एखादे संविधान असते का ?
* आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत सर्वोच्च स्थान कोणाला असते ?

**परराष्ट्र धोरणांच्याद्‌वारे आंतरराष्ट्रीय संबंध :** प्रत्येक राष्ट्र आपल्या अंतर्गत व्यवहारांसाठी त्याचप्रमाणे अन्य राष्ट्रांशी कसे व्यवहार करावेत, याविषयी निश्चित धोरण ठरवते. अशा धोरणाला परराष्ट्र धोरण असे म्हणतात. भारताच्या परराष्ट्र धोरणाचा आपण अधिक विस्ताराने पुढील प्रकरणात अभ्यास करणार आहोत.



**करून पहा.**

एका महिन्याची वृत्तपत्रे संकलित करून त्यातील परराष्ट्रासंबंधीच्या बातम्यांचे संकलन करा. खालील मुद्द्यांच्या आधारे त्या बातम्यांचे वर्गीकरण करा व त्याचे प्रदर्शन भरवा.

(अ) परराष्ट्रांतील महत्त्वाच्या पदांवरील व्यक्तींनी आपल्या देशाला दिलेल्या भेटी.

(ब) आपला देश व अन्य देश यांमध्ये झालेले करार.

(क) आपल्या देशात भरवलेली एखादी आंतरराष्ट्रीय परिषद.

(ड) शेजारील देशांच्या संदर्भातील घडामोडी.

**पार्श्वभूमी :** आपण आज ज्या जगात राहात आहोत ते अनेक घटना, घडामोडींमधून आकारास आले आहे. म्हणूनच आपले आजचे जग समजून घेण्यासाठी आपल्याला थोडे इतिहासात जावे लागेल. मागच्या शतकात दोन महायुद्धे झाल्याचे आपणांस माहीत आहे. ही दोन महायुद्धे मागच्या शतकातील सर्वांत महत्वाच्या घटना होत्या. त्यांच्यामुळे जग बदलले. जगात नवीन प्रवाह आले, विचार आला. या महायुद्धांमुळे आणखी काय झाले हे समजून घेऊ.

**पहिले महायुद्ध :** १९१४ ते १९१८ या कालावधीत पहिले महायुद्ध झाले. युरोप खंडातील महत्त्वाचे देश यात सामील होते. एकूणच आंतरराष्ट्रीय किंवा जागतिक व्यवस्थेत युरोपला या काळात फार महत्त्व होते. पहिल्या महायुद्धामुळे खूप मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी झाली. युद्धात सहभागी झालेल्या राष्ट्रांना खूप आर्थिक नुकसान सोसावे लागले. युद्धात सहभागी नसलेल्यांनाही युद्धाची झळ लागली. जिंकलेल्या व हरलेल्या राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था कोसळल्या.

**पहिल्या महायुद्धातील सहभागी राष्ट्रे**

| मित्र राष्ट्रे | मध्यगत राष्ट्रे |
|---|---|
| ब्रिटन, फ्रान्स, रशिया, इटली, अमेरिका | जर्मनी, ऑस्ट्रिया-हंगेरी, तुर्कस्तान, बल्गेरिया |

अशा प्रकारचे युद्ध पुन्हा होऊ नये, त्यासाठी काहीतरी उपाययोजना करायला हवी असे सर्व राष्ट्रांना वाटू लागले व त्यातून राष्ट्रसंघ या आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना झाली. आंतरराष्ट्रीय समस्या सोडवण्यासाठी चर्चा व वाटाघाटी करण्याचे ते एक महत्वाचे व्यासपीठ बनले. युद्ध टाळणे ही राष्ट्रसंघाची मुख्य जबाबदारी मानण्यात आली.

पहिले महायुद्ध संपल्यानंतर युरोपमध्ये व युरोपबाहेरही अनेक महत्त्वाचे बदल घडून आले. उदा., युरोपमधील पूर्वीची साम्राज्ये कोसळली व त्यातून नवीन राष्ट्रे अस्तित्वात आली.

युरोपमधील अनेक देशांच्या आफ्रिका आणि आशिया खंडात वसाहती होत्या. या वसाहतींमध्ये स्वातंत्र्यासाठी चळवळी सुरू झाल्या. युरोपीय राष्ट्रांच्या वर्चस्वाला या चळवळींनी मोठ्या प्रमाणावर आव्हान दिले.

पहिल्या महायुद्धानंतर शांतता प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्रसंघ निर्माण झाला. परंतु राष्ट्रसंघाला युद्ध थोपवण्यात यश आले नाही. जर्मनी, इटली, स्पेन इत्यादी देशांमध्ये तर हुकूमशाही राजवटी अस्तित्वात आल्या. या सर्व घडामोडींची परिणिती दुसऱ्या महायुद्धात झाली.



पहिल्या महायुद्धात सहभागी झालेले भारतीय सैनिक

**विचार करा आणि लिहा.**


जर्मनीमध्ये हिटलरच्या हुकूमशाहीचा उदय झाला. जर्मनीतील लोकशाही परंपरा बळकट असत्या तर काय झाले असते ? हुकूमशाही राजवटी अस्तित्वात येऊ नयेत म्हणून आपण कोणती काळजी घेतली पाहिजे ?

**तुम्हांला काय वाटते ?**

युद्धास प्रतिबंध करण्यासाठी राष्ट्रसंघ निर्माण केला. परंतु युद्ध थोपवण्यात राष्ट्रसंघ अपयशी ठरले. राष्ट्रसंघाने युद्ध टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना करायला हव्या होत्या ?

**दुसरे महायुद्ध :** १९३९ ते १९४५ या कालावधीत दुसरे महायुद्ध झाले. पहिल्या महायुद्धापेक्षा दुसरे महायुद्ध अधिक संहारक ठरले. पहिल्या महायुद्धाच्या तुलनेत ते अधिक व्यापक तर होतेच; परंतु या युद्धात अधिक प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात आला. युद्धात सहभागी असलेल्या

# जग – राजकीय (प्रमुख देश)



राष्ट्रांवर पुन्हा एकदा आर्थिक संकट कोसळले.

**लिहिते व्हा...**

१९३९ ते १९४५ या कालावधीत दुसरे महायुद्ध चालू होते. याच काळात भारतात कोणत्या घडामोडी होत होत्या ?

महायुद्धाचा भारतावर कोणता परिणाम झाला ?

### दुसऱ्या महायुद्धातील सहभागी राष्ट्रे

| | |
|---|---|
| मित्र राष्ट्रे | ब्रिटन, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, न्यूझीलंड, भारत, सोव्हिएत रशिया, चीन, अमेरिका |
| अक्ष राष्ट्रे | जर्मनी, जपान, इटली |

दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेचा महत्त्वाचा सहभाग होता. अमेरिकेने अणुबॉम्बची निर्मिती केली होती. युद्ध संपवण्यासाठी जपानमधील हिरोशिमा व नागासाकी या दोन शहरांवर अनुक्रमे ६ ऑगस्ट व ९ ऑगस्ट १९४५ रोजी अमेरिकेने अणुबॉम्ब टाकले. युरोपमध्ये जर्मनीच्या पराभवानंतर व आशियामध्ये जपानच्या पराभवानंतर दुसरे महायुद्ध संपले. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात जागतिक पातळीवर ज्या अनेक घडामोडी झाल्या त्यांतील एक महत्त्वाची घटना म्हणजे शीतयुद्धाची सुरुवात होय. १९४५ ते १९९१ हा प्रदीर्घ काळ शीतयुद्धाने व्यापला होता. या काळातील काही बदलांचा आता आपण आढावा घेऊ.

**शीतयुद्ध :** दुसऱ्या महायुद्धात मित्र असणारे अमेरिका व सोव्हिएत रशिया युद्ध संपताच परस्परांचे स्पर्धक बनले. त्यांच्यातील सहकार्याची जागा स्पर्धेने घेतली. या स्पर्धेने जागतिक राजकारणाचा ४०-४५ वर्षांचा कालखंड व्यापला. या दोन्ही देशांमध्ये उघड युद्ध झाले नाही; परंतु युद्धाचा भडका कधीही उडू शकेल असा तणाव त्यांच्या संबंधांमध्ये होता. प्रत्यक्ष युद्ध नाही पण युद्धाला पूरक अशा तणावपूर्ण परिस्थितीचे वर्णन शीतयुद्ध या संज्ञेद्वारे केले जाते.

या काळात अमेरिका तर महासत्ता होतीच पण सोव्हिएत रशियानेही अण्वस्त्रांची निर्मिती करून व आपले लष्करी सामर्थ्य वाढवून महासत्ता बनण्याचा प्रयत्न केला. अमेरिका व सोव्हिएत रशिया या दोन महासत्तांमधील संघर्ष, सत्ता स्पर्धा, शस्त्रस्पर्धा, विचारप्रणालीतील भेद, परस्परांना शह-काटशह देण्याची वृत्ती या सर्व बाबींमुळेच शीतयुद्ध सुरू झाले होते.

### शीतयुद्धाचे परिणाम

- **लष्करी संघटनांची निर्मिती :** शीतयुद्ध काळात दोन्ही महासत्तांनी लष्करी संघटना निर्माण केल्या. त्यात सामील होणाऱ्या राष्ट्रांच्या संरक्षणाची जबाबदारी त्या त्या महासत्तांनी घेतली. नाटो (NATO : North Atlantic Treaty Organization) ही अमेरिकेच्या प्रभुत्वाखालील लष्करी संघटना होती, तर वॉर्सा करार ही सोव्हिएत रशियाच्या प्रभुत्वाखालील लष्करी संघटना होती.

**तुम्हांला काय वाटते ?**

✻ तंत्रज्ञानातील प्रगती आणि आंतरराष्ट्रीय शांतता यांच्यात काही संबंध असतो का ?

✻ मानवी कल्याणासाठी तंत्रज्ञानाचा वापर कसा करता येईल ?

- **जगाचे द्विध्रुवीकरण :** शीतयुद्धकाळात जगातील बहुतेक देश दोन महासत्तांच्या गटात सामील झाले होते. राष्ट्रांची अशी दोन गटांत विभागणी होणे म्हणजे द्विध्रुवीकरण होय. शीतयुद्धाचा आवाका त्यामुळे वाढला. तणावाचे क्षेत्र व्यापक झाले.

**हे करून पहा.**

क्यूबाचा संघर्ष (१९६२) ही शीतयुद्ध काळातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण घटना होती. या संघर्षाविषयी अधिक माहिती मिळवा.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

१९१७ मध्ये रशियात साम्यवादी क्रांती झाली व त्यातून सोव्हिएत रशिया अस्तित्वात आले. अल्पावधीतच सोव्हिएत रशिया आंतरराष्ट्रीय राजकारणात महासत्ता म्हणून आकारास आली; परंतु अमेरिका आणि सोव्हिएत रशिया यांच्यात टोकाचे मतभेद होते. उदा.,

- अमेरिका हे भांडवलशाहीचा पुरस्कार करणारे लोकशाही राज्य होते, तर सोव्हिएत रशिया समाजवादाचा व एकपक्षीय हुकूमशाहीचा पुरस्कार करणारे राज्य होते. दोन्ही महासत्तांना जगात आपले वर्चस्व वाढवायचे होते. अमेरिकेला भांडवलशाहीचा प्रसार करायचा होता तर सोव्हिएत रशियाला समाजवादाचा.
- आपले प्रभुत्व वाढावे म्हणून दोन्ही महासत्तांनी लहान राष्ट्रांना आपापल्या गटात खेचण्याच्या प्रयत्नांना सुरुवात केली. परिणामी युरोपचे वैचारिक पातळीवर विभाजन झाले. पश्चिम युरोप व तेथील देश अमेरिकेच्या गटात सामील झाले तर पूर्व युरोपमधील देश सोव्हिएत रशियाच्या गटात सामील झाले. आपापल्या गटातल्या राष्ट्रांना लष्करी व आर्थिक मदत देण्याचे धोरण या महासत्तांनी स्वीकारले.

- **शस्त्रास्त्र स्पर्धा :** महासत्ता एकमेकांना शह-काटशह देण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर शस्त्रांची निर्मिती करू लागल्या. अधिकाधिक संहारक अस्त्रे बनवण्याच्या संदर्भात व त्यास लागणारे तंत्रज्ञान अवगत करण्यासाठी स्पर्धा सुरू झाली. परंतु शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे जागतिक शांतता धोक्यात येईल याची जाणीव दोन्ही महासत्तांना झाल्यामुळे शस्त्रास्त्र नियंत्रणाचे आणि निःशस्त्रीकरणाचे प्रयत्नही याच काळात झाले.
- **प्रादेशिक संघटनांची निर्मिती :** महासत्तांच्या स्पर्धेत विकसनशील राष्ट्रांनी परस्परांना मदत करण्यासाठी आपापल्या प्रादेशिक पातळ्यांवर संघटना निर्माण केल्या. त्यांना आर्थिक विकास महत्त्वाचा वाटत होता. युरोपमधील देशांनी युरोपीय आर्थिक संघ निर्माण केला तर आग्नेय आशियाई देशांनी (सिंगापूर, थायलंड, मलेशिया, इंडोनेशिया, फिलिपिन्स, इत्यादी) असियान (ASEAN) संघटना निर्माण केली.
- **अलिप्ततावाद :** शीतयुद्ध सुरू झाल्यानंतरच्या काळात एकीकडे जगाचे द्विध्रुवीकरण होत होते पण त्याचबरोबर काही देशांना महासत्तांच्या स्पर्धेत सामील व्हायचे नव्हते. अशा राष्ट्रांनी महासत्तांच्या स्पर्धेपासून अलिप्त राहण्याचे जे धोरण स्वीकारले, त्याला अलिप्ततावाद असे म्हणतात. अलिप्ततावाद ही शीतयुद्धकाळातील एक महत्त्वाची चळवळ होती.

**अलिप्ततावादी चळवळ :** दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया व आफ्रिका खंडांतील नव्याने स्वतंत्र झालेल्या देशांनी अलिप्ततेच्या विचाराला पाठिंबा दिला व ती एक महत्त्वपूर्ण चळवळ झाली. भारताचे प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू, युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष मार्शल टिटो, इजिप्तचे अध्यक्ष गमाल अब्दूल नासेर, इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष डॉ.अहमद सुकार्नो आणि घानाचे राष्ट्राध्यक्ष क्वामे नक्रुमा यांच्या नेतृत्वाखाली या चळवळीची सुरुवात सन १९६१ पासून झाली.

**अलिप्ततावादी चळवळीचे मूल्यमापन :** अलिप्ततावादी चळवळीने वसाहतवाद, साम्राज्यवाद आणि वंशवाद याला विरोध केला आहे. आंतरराष्ट्रीय प्रश्न शांततामय मार्गाने सोडवण्यास या चळवळीने प्रोत्साहन दिले आहे. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या मार्गदर्शनाखाली भारताने या चळवळीचे नेतृत्व केले. नंतरच्या काळातही या चळवळीला भारताने सक्रीय

पाठिंबा दिला आहे. शीतयुद्ध संपुष्टात आले तरीही या चळवळीचे महत्त्व कमी झाले नाही.

मानवतावाद, जागतिक शांतता व समानता या शाश्वत मूल्यांवर अलिप्ततावादी चळवळ आधारलेली आहे. या चळवळीने अल्पविकसित राष्ट्रांना एकत्र येण्यास प्रेरित केले आहे.

आंतरराष्ट्रीय प्रश्न शांततामय मार्गाने सोडवण्यास या चळवळीने प्रोत्साहन दिले. निःशस्त्रीकरण, मानवी हक्कांचे संवर्धन, यांबाबत आग्रही भूमिका घेतानाच अलिप्ततावादी चळवळीने गरीब व अविकसित राष्ट्रांच्या समस्या ठामपणे मांडल्या. एका नव्या आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची **(NIEO)** मागणी या चळवळीने केली.

थोडक्यात सांगायचे झाल्यास, शीतयुद्ध संपले असले तरीही अलिप्ततावादी चळवळीचे महत्त्व कमी झाले नाही. या चळवळीने अल्पविकसित राष्ट्रांना एकत्र येण्यास प्रेरित केले. या चळवळीने आर्थिक आणि सामाजिक बदलांचे अनेक प्रवाह आंतरराष्ट्रीय राजकारणात आणले. या राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय राजकारणात सन्मानाने उभे राहण्याचा एक नवा विश्वास दिला.

**शीतयुद्धाची अखेर :** १९४५ पासून जागतिक राजकारणात प्रभावी असलेले शीतयुद्ध नंतर संपुष्टात आले. शीतयुद्धाची अखेर ही एक मागील शतकाच्या शेवटी झालेली अत्यंत महत्त्वाची घटना होती. शीतयुद्धाची अखेर होण्यास अनेक बाबी कारणीभूत होत्या. उदा.,

(१) सोव्हिएत रशियाने आर्थिक खुलेपणाचे धोरण स्वीकारले. राज्याचे अर्थव्यवस्थेवरील नियंत्रण शिथिल केले.

(२) सोव्हिएत रशियाचे तत्कालीन अध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी 'पेरेस्त्रोईका' (पुनर्रचना) आणि ग्लासनोस्त (खुलेपणा) ही धोरणे अमलात आणली. या धोरणांमुळे माध्यमांवरील नियंत्रण कमी झाले. राजकीय व आर्थिक क्षेत्रांत महत्त्वपूर्ण बदल झाले. म्हणजेच या क्षेत्रात पुनर्रचना करण्यात आली. त्यामुळे लोकशाहीकरणाला चालना मिळाली.

(३) पूर्व युरोपमधील सोव्हिएत रशियाच्या प्रभावाखालील देशांनी भांडवलशाही व लोकशाही मार्गांचा स्वीकार केल्यामुळे तेथील राजवटी बदलल्या.

(४) सोव्हिएत रशियाचे विघटन झाले व त्यातून अनेक नवी स्वतंत्र राष्ट्रे निर्माण झाली. रशिया हा सोव्हिएत रशियामधील सर्वांत मोठा देश होता.



**असे का ?**

- नाटो ही संघटना आजही अस्तित्वात आहे, परंतु तिचे स्वरूप आता लष्करी नाही. या संघटनेत किती देश आहेत ते शोधा.

**शब्द सुचवा.**

एकच महासत्ता असते व तिच्यावर जेव्हा अनेक देश अवलंबून असतात तेव्हा त्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थेला आपण एकध्रुवीय व्यवस्था म्हणतो. दोन महासत्तांमध्ये झालेल्या राष्ट्रांच्या विभागणीला द्विध्रुवीकरण म्हणतात.

जेव्हा अनेक देश महासत्ता म्हणून आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत आकारास येतात तेव्हा त्या व्यवस्थेला काय म्हणता येईल ?

'युद्धाचा फोलपणा' या विषयावर निबंध लिहा. त्यासाठी काही मुद्दे येथे दिले आहेत. यावर चर्चा करा.

* कोणत्याही समस्या चर्चा व वाटाघाटीने सोडवता येतात.
* युद्धामुळे समस्या सुटत नाहीत.
* युद्धामुळे विकासाला खीळ बसते.

## शीतयुद्धानंतरचे जग

सोव्हिएत रशियाच्या विघटनाबरोबर शीतयुद्ध संपले. एकेकाळच्या या महासत्तेचे विघटन झाल्याने जागतिक राजकारणात महत्त्वाचे बदल घडून आले. उदा.,

- जागतिक राजकारणात अमेरिका ही एकमेव महासत्ता उरली.
- राष्ट्राराष्ट्रांमधील व्यापार व आर्थिक संबंध वाढण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाले. भांडवल, श्रम, बाजारपेठ, माहिती यांचा जगभर प्रसार झाला. लोकांमधील विचार-कल्पनांचाही मुक्त संचार होऊ लागला.
- सर्वच राष्ट्रांनी व्यापारी संबंधांना प्राधान्य देण्याचे ठरवल्याने अन्य राष्ट्रांना 'मदत' करण्याची कल्पना मागे पडली. त्याऐवजी आर्थिक संबंध प्रस्थापित करण्याचे प्रयत्न होऊ लागले. म्हणजेच पूर्वी आपल्या विरोधातील एखाद्या देशाला 'शत्रुराष्ट्र' म्हणून संबोधण्याऐवजी 'स्पर्धक राष्ट्र' ही संकल्पना पुढे आली.
- संयुक्त राष्ट्रे या संघटनेच्या जबाबदारीत वाढ झाली. जागतिक शांतता व सुरक्षितता टिकवण्यासाठी संयुक्त राष्ट्रांना अधिक ठोस प्रयत्न करावे लागत आहेत.
- पर्यावरण रक्षण, मानवी हक्कांची जोपासना, स्त्री-पुरुष समानता, नैसर्गिक आपत्तींचा सामना या बाबींना जागतिक स्वरूप प्राप्त झाले.

**जागतिकीकरण म्हणजे काय ? :** शीतयुद्धानंतर व्यापार व आर्थिक संबंधांमध्ये खुलेपणा आला. यापूर्वीच म्हटल्याप्रमाणे भांडवल, श्रम, बाजारपेठा आणि माहितीचे जगभर संचरण होऊ लागले. जगभरच्या लोकांमध्ये विचार, कल्पनांची देवाणघेवाण वाढली. माहिती तंत्रज्ञानातील क्रांतीने जगातल्या घटना व घडामोडी सर्वत्र कळू लागल्या. देशांच्या सीमारेषांना पूर्वीइतके महत्त्व राहिले नाही. या सर्व प्रक्रियांना जागतिकीकरण असे म्हणतात. जागतिकीकरणाचे जसे काही फायदे झाले तसेच काही तोटेही झाले आहेत. उदा., विविध राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था परस्परांशी जोडल्या गेल्याने व्यापार वाढला, आर्थिक एकत्रीकरण वाढले, बाजारपेठांमध्ये मुबलकता आली; परंतु त्याचबरोबर गरीब व श्रीमंत राष्ट्रांमधील दरी कमी झाली नाही.

या प्रकरणात आपण १९४५ पासूनच्या जागतिक घडामोडींचा अभ्यास केला. शीतयुद्धकालीन जग, त्यातील शस्त्रस्पर्धा व नि:शस्त्रीकरणाचे प्रयत्न समजून घेतले. जागतिकीकरणाचा अर्थही अभ्यासला. पुढील प्रकरणात आपण भारताच्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करणार आहोत.

**शोधा आणि सहभागी व्हा !**

पर्यावरण रक्षणासाठीच्या कोणत्याही दोन जागतिक संघटनांविषयी माहिती मिळवा. त्यांची उद्‌दिष्टे तुम्हांला मान्य असल्यास त्यांच्यातील सहभागाच्या संधी कोणत्या आहेत ते शोधा.



## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) स्वतंत्र व सार्वभौम देशांची मिळून निर्माण होणारी व्यवस्था -
(अ) राजकीय व्यवस्था
(ब) आंतरराष्ट्रीय व्यवस्था
(क) सामाजिक व्यवस्था
(ड) यांपैकी नाही

(२) राष्ट्रसंघाची मुख्य जबाबदारी -
(अ) युद्ध टाळणे
(ब) वसाहतींचे स्वातंत्र्य
(क) राष्ट्रांची अर्थव्यवस्था सावरणे
(ड) नि:शस्त्रीकरण करणे

(३) शीतयुद्ध ........... या घटनेमुळे संपले.
(अ) संयुक्त राष्ट्रांची स्थापना
(ब) सोव्हिएत रशियाचे विघटन
(क) लष्करी संघटनांची निर्मिती
(ड) क्यूबाचा संघर्ष

**२. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.**

(१) पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाची निर्मिती झाली.
(२) शीतयुद्धामुळे जगाचे एकध्रुवीकरण झाले.
(३) मिखाईल गोर्बाचेव्ह यांच्या धोरणांमुळे लोकशाहीकरणाला चालना मिळाली.

**३. पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

(१) शीतयुद्ध
(२) अलिप्ततावाद
(३) परस्परावलंबन
(४) द्विध्रुवीकरण
(५) जागतिकीकरण

**४. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) पहिले महायुद्ध व दुसरे महायुद्ध यांच्यात पुढील मुद्द्यांच्या आधारे तुलना करा.

| मुद्दे | पहिले महायुद्ध | दुसरे महायुद्ध |
|---|---|---|
| १. कालखंड | | |
| २. सहभागी राष्ट्रे | | |
| ३. परिणाम – (राजकीय व आर्थिक) | | |
| ४. युद्धोत्तर स्थापना झालेल्या आंतरराष्ट्रीय संघटना | | |

(२) शीतयुद्धाची अखेर होण्यास कोणत्या गोष्टी कारणीभूत ठरल्या?
(३) शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर जागतिक राजकारणात कोणते महत्त्वाचे बदल घडून आले?

**उपक्रम**

१. जगातील विविध राष्ट्रे परस्परांवर अवलंबून असतात हे उदाहरणासह स्पष्ट करा.
२. ‘वसुधैव कुटुंबकम्’ या मूल्याची समाजात रुजवणूक होण्यासाठी तुम्ही काय करणार आहात याची वर्गात चर्चा करा.

F4C7AP

# २ भारताच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल

या प्रकरणात आपण नवीन काय शिकणार आहोत ?

आंतरराष्ट्रीय व्यवस्था, तिचे स्वरूप आणि मागील शतकातील शीतयुद्‌ध व त्याचे परिणाम इत्यादी समजून घेतल्यानंतर आता आपण त्यांच्याशी संबंधित अन्य विषयांची ओळख करून घेणार आहोत. त्यानुसार परराष्ट्र धोरणाचा अर्थ, त्यावर परिणाम करणारे घटक तसेच आपण भारताच्या परराष्ट्र धोरणाचे स्वरूप जाणून घेणार आहोत.

## परराष्ट्र धोरण

**अर्थ व महत्त्व :** सर्वच देश हे आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचे घटक असतात. त्यातील कोणतेही राष्ट्र सर्वार्थाने स्वयंपूर्ण नसते, म्हणूनच आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत परस्परावलंबन असते हे आपल्याला समजले आहे. हे परस्परावलंबन मात्र काही मोजक्याच देशांच्या फायद्याचे किंवा हिताचे असता कामा नये. ते प्रत्येक राष्ट्राच्या हिताचे असावे म्हणून प्रयत्न करावे लागतात. कोणत्या राष्ट्रांशी मैत्री करायची, कोणत्या गटात सामील व्हायचे किंवा आतंरराष्ट्रीय राजकारणात कोणती भूमिका घ्यायची इत्यादींविषयी प्रत्येक देशाला निर्णय घ्यावे लागतात. असे निर्णय घेताना ते विचारपूर्वक घ्यावे लागतात. या वैचारिक चौकटीला परराष्ट्र धोरण असे म्हणतात. प्रत्येक स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्र आपापले परराष्ट्र धोरण ठरवते. म्हणूनच राष्ट्रांमधील परस्परसंबंधांचा अभ्यास करणाऱ्या आंतरराष्ट्रीय राजकारणात परराष्ट्र धोरणाला खूप महत्त्व असते.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

आपल्याला जेव्हा एखाद्या देशाचा अभ्यास करायचा असतो तेव्हा त्या देशाचे संविधान आणि परराष्ट्र धोरण समजून घेणे आवश्यक असते.

**राष्ट्रीय हितसंबंध :** परराष्ट्र धोरण म्हणजे काय हे आपण थोडक्यात समजून घेतले. राष्ट्रीय हितसंबंध आणि परराष्ट्र धोरण यांचा अतिशय निकटचा संबंध असतो. राष्ट्रीय हितसंबंधांची जोपासना परराष्ट्र धोरणाद्‌वारे केली जाते. म्हणूनच परराष्ट्र धोरणाचा विस्तृत अभ्यास करण्यापूर्वी आपल्याला राष्ट्रीय हितसंबंधांचा अर्थ व त्याचे महत्त्व समजले पाहिजे.

राष्ट्रीय हितसंबंध म्हणजे आपल्या देशाचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व सुरक्षित ठेवण्यासाठी करायच्या उपाययोजना. आपला आर्थिक विकास साधून आपले सामर्थ्य वाढवण्यासाठीच्या प्रयत्नाचाही राष्ट्रीय हितसंबंधांत समावेश होतो. आपल्या राष्ट्रासाठी फायद्याचे आणि योग्य काय आहे याचा विचार करून जेव्हा निर्णय घेतले जातात तेव्हा त्यास आपण राष्ट्रीय हितसंबंधांची जोपासना असे म्हणतो. या अर्थाने कोणत्याही राष्ट्राच्या राष्ट्रीय हितसंबंधांमध्ये पुढील घटकांचा समावेश होतो.

- आपल्या देशाच्या स्वातंत्र्य, सार्वभौमत्व व अखंडतेचे रक्षण करणे म्हणजेच संरक्षण हे सर्वोच्च राष्ट्रीय हित असते.
- आर्थिक विकास हेही एक महत्वाचे राष्ट्रीय हित आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या राष्ट्राला आपल्या स्वातंत्र्याचे जतन करणे अवघड जाते म्हणून संरक्षणाखालोखाल आर्थिक विकास हे राष्ट्रीय हित महत्वाचे मानले जाते.

**राष्ट्रीय हितसंबंध आणि परराष्ट्र धोरण :** संरक्षण आणि आर्थिक विकास या राष्ट्रीय हितसंबंधाची जोपासना होईल यादृष्टीने परराष्ट्र धोरण आखले जाते. म्हणूनच राष्ट्रीय हितसंबंध ही उद्‌दिष्टे मानली जातात, तर परराष्ट्र धोरण हे ती प्राप्त करण्याचे साधन ठरते. परिस्थिती आणि काळानुसार राष्ट्राच्या उद्‌दिष्टांमध्ये बदल होत असतात. त्यानुसार राष्ट्रीय हितसंबंधांमध्येही बदल होतात. त्या बदलांचे

प्रतिबिंब परराष्ट्र धोरणात दिसून येते. म्हणूनच परराष्ट्र धोरण प्रवाही असते.

**चला, चर्चा करूया.**

परिस्थिती आणि काळानुसार परराष्ट्र धोरणात बदल होत असले तरी काही देशांचे परराष्ट्र धोरण काही शाश्वत मूल्यांवर आधारलेले असते. उदा., भारताचे परराष्ट्र धोरण आंतरराष्ट्रीय शांतता, मानवी हक्क, सुरक्षितता या मूल्यांवर आधारलेले आहे. ती साध्य करण्यासाठी परराष्ट्र धोरणात कोणत्या तरतुदी असल्या पाहिजेत असे तुम्हांला वाटते ?

**परराष्ट्र धोरण निश्चित करणारे घटक :** आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत कोणत्या राष्ट्राशी कशा प्रकारचे संबंध ठेवायचे हे परराष्ट्र धोरणाच्या आधारे ठरते; परंतु परराष्ट्र धोरण ठरवताना अनेक घटकांचा त्यावर परिणाम होत असतो.

**१. देशाचे भौगोलिक स्थान :** तुम्ही पृथ्वीगोल पाहिला असेल किंवा जगाचा राजकीय नकाशा पाहिला असेल. त्यावरून कोणत्याही राष्ट्राचे भौगोलिक स्थान तुम्हांला दिसते. काही देश अन्य देशांपासून दूर अंतरावर आहेत, तर काही राष्ट्रांच्या आजूबाजूला अनेक शेजारी देश आहेत. काही राष्ट्रांना मोठा समुद्रकिनारा लाभला आहे, तर काही राष्ट्रांकडे भरपूर खनिजसंपत्ती आहे. थोडक्यात, देशाचा आकार, लोकसंख्या, जमिनीचा पोत, देशाला लाभलेला समुद्रकिनारा, नैसर्गिक साधनसंपत्तीची उपलब्धता या सर्वच बाबी परराष्ट्र धोरण ठरवताना विचारात घ्याव्या लागतात.

**२. राजकीय व्यवस्था :** लोकशाही स्वरूपाच्या राजकीय व्यवस्थेत संसदेला परराष्ट्र धोरणाच्या निर्मितीत महत्त्वाचे स्थान असते. कारण परराष्ट्र धोरणासंबंधीच्या विषयांवर संसदेत चर्चा होते, विरोधी पक्ष प्रश्न विचारून परराष्ट्र धोरणावर नियंत्रण ठेवू पाहतात.

संघराज्य व्यवस्था असणाऱ्या देशांना परराष्ट्र धोरणाची आखणी करताना घटकराज्यांचाही विचार करावा लागतो. कारण शेजारी राष्ट्रांमधील घडामोडींचा घटकराज्यांवर परिणाम होतो. उदा., श्रीलंकेतील घडामोडींचा तमिळनाडूवर आणि बांगलादेशात काही घडल्यास पश्चिम बंगाल आणि ईशान्येकडील राज्यांवर त्याचा परिणाम होतो.



**असे का करावे लागते ?**

आपल्या देशातील शांतता व स्थैर्य जितके महत्त्वाचे तितकेच ते शेजारी देशांमध्ये सुद्धा असणे महत्त्वाचे असते. म्हणूनच शेजारी राष्ट्रात लोकशाही निर्माण व्हावी म्हणून भारताला प्रयत्न करावे लागतात.

**३. अर्थव्यवस्था :** आधुनिक काळात कोणत्याही देशाच्या आर्थिक स्थितीला परराष्ट्र धोरण ठरवण्यात फार महत्त्व प्राप्त झाले आहे. आर्थिक विकास हे सर्वच राष्ट्रांचे सर्वांत महत्त्वाचे उद्दिष्ट बनले आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेचा परराष्ट्र धोरणावर दोन प्रकारे परिणाम होतो.

(१) देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी अन्य राष्ट्रांशी प्रस्थापित करायचे आर्थिक संबंध, आयात-निर्यात, जागतिक व्यापारात सहभाग इत्यादी बाबी परराष्ट्र धोरणाला आकार देतात.

(२) सध्याच्या जागतिक व्यवस्थेत आर्थिक सुरक्षिततेचे मुद्दे राष्ट्रीय सुरक्षिततेइतकेच महत्त्वाचे मानले जातात. आर्थिक सुरक्षितता जितकी भक्कम तितके सामर्थ्यशाली राष्ट्र म्हणून मान्यता मिळते. अर्थव्यवस्था मजबूत असणारे देश कमी परावलंबी असतात व त्यांना स्वतंत्रपणे परराष्ट्र धोरण आखता येऊ शकते.

**४. राजकीय नेतृत्व :** परराष्ट्र धोरण ठरवण्यात राष्ट्रपती, प्रधानमंत्री, परराष्ट्रमंत्री, संरक्षणमंत्री,

**तुम्हांला पटते का? पटल्यास का व न पटल्यास का नाही हे विस्ताराने लिहा.**

राष्ट्राचे आर्थिक सामर्थ्य वाढवण्यासाठी केवळ गरिबी दूर करण्यावर भर न देता संपत्ती व क्रयशक्ती वाढवण्याचे प्रयत्न केले पाहिजेत.

अर्थमंत्री, गृहमंत्री यांचा वाटा असतो. परराष्ट्र धोरणातील सातत्य टिकवून ते सुधारण्याचा प्रयत्न या पदांवरील व्यक्ती करतात. उदा., पंडित जवाहरलाल नेहरूंनी भारताच्या परराष्ट्र धोरणात अलिप्ततावादाची भर घातली. अटलबिहारी वाजपेयी यांनी भारत-चीन संबंध सुधारण्यात मोठे योगदान दिले आहे.

**यादी पूर्ण करा.**

खाली काही नेत्यांची नावे व त्यांनी केलेले योगदान याबाबत माहिती दिली आहे. उदा., लालबहादूर शास्त्री : ताश्कंद करार. याप्रमाणे पुढील यादी पूर्ण करा.

(अ) इंदिरा गांधी : ..................

(ब) राजीव गांधी : ..................

(क) अटलबिहारी वाजपेयी : ..................

खालील धोरणांचा पाठपुरावा करणारे प्रधानमंत्री कोण आहेत ?

(अ) .................. : पूर्वेकडे पहा.

(ब) .................. : आंतरराष्ट्रीय पातळीवरून भारतात गुंतवणूक वाढवण्याचे प्रयत्न

**५. प्रशासकीय घटक :** परराष्ट्र धोरणाच्या निर्मितीत परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, परराष्ट्र सचिव, परदेशातील दूतावास, राजनैतिक अधिकारी इत्यादी प्रशासकीय घटकांचा समावेश असतो. परराष्ट्र धोरणासंबंधीचा अंतिम निर्णय जरी प्रधानमंत्री व त्यांचे मंत्रिमंडळ घेत असले तरी त्या निर्णयापर्यंत पोहचण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा मदत करते. परराष्ट्र धोरणास आवश्यक अशी माहिती गोळा करणे, तिचे विश्लेषण करणे, त्यावर आधारित योग्य सल्ला देणे इत्यादी कामे प्रशासकीय अधिकारी पार पाडतात. याचबरोबर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार ही महत्त्वाची भूमिका निभावतात.

**तुम्ही काय कराल ?**

परराष्ट्र सचिव या पदावर तुम्ही काम करत आहात. प्रधानमंत्री चीनला भेट देणार आहेत. परराष्ट्र सचिव म्हणून परराष्ट्र व्यवहार मंत्रालयातर्फे तुम्ही प्रधानमंत्र्यांना चर्चेसाठी कोणते विषय सुचवाल ?

## भारताचे परराष्ट्र धोरण

परराष्ट्र धोरणाविषयी प्राथमिक माहिती घेतल्यानंतर आता आपण भारताच्या परराष्ट्र धोरणाविषयी जाणून घेणार आहोत.

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि तेव्हापासून भारताने आपले परराष्ट्र धोरण स्वतंत्रपणे आखण्यास सुरुवात केली. भारताच्या संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये राज्याने परराष्ट्र धोरण कसे आखावे याविषयी तरतूद केली आहे. मार्गदर्शक तत्त्वांमधील कलम ५१ नुसार परराष्ट्र धोरणाची एक व्यापक चौकट स्पष्ट करण्यात आली आहे. त्यानुसार भारताने आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेच्या जतनाला प्राधान्य द्यावे, आपल्या आंतरराष्ट्रीय समस्या किंवा वाद शांततेच्या मार्गाने सोडवावेत असे स्पष्ट केले आहे. अन्य राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे व आंतरराष्ट्रीय कायद्याचा आदर करणे हेही आपल्या परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट मानले आहे. भारताचे आतापर्यंतचे परराष्ट्र धोरण या चौकटीत विकसित झाले आहे.

**भारतीय संविधानाचे कलम ५१**

- आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता स्थापन करणे.
- राष्ट्राराष्ट्रांत न्याय्य व सन्माननीय संबंध प्रस्थापित करणे.
- आंतरराष्ट्रीय व्यवहारात आंतरराष्ट्रीय कायदा आणि करार याबद्दल आदर वृद्धिंगत करणे.
- लवादाच्या साहाय्याने आंतरराष्ट्रीय वादाची शांततामय सोडवणूक करणे.

**भारताच्या परराष्ट्र धोरणाची आणखी काही उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :**

* शेजारी देशांशी व अन्य देशांशी मैत्रीपूर्ण संबंध जोपासताना आपल्या देशाच्या संरक्षणास बाधा येणार नाही याची काळजी घेणे. राष्ट्राच्या भौगोलिक सीमारेषा सुरक्षित राहतील याबाबत तडजोड न करणे.
* भारताच्या एकतेचे व एकात्मतेचे संरक्षण करणे.
* दुसऱ्या देशात वास्तव्य करणाऱ्या आपल्या नागरिकांच्या हिताचे रक्षण करणे. ही जबाबदारी त्या त्या देशातील भारतीय दूतावास पार पाडतात.
* भारताच्या आर्थिक विकासासाठी परराष्ट्रांबरोबर आर्थिक व व्यापारी संबंध प्रस्थापित करणे.

**भारताच्या परराष्ट्र धोरणाचा आढावा :** भारताच्या परराष्ट्र धोरणाचा आढावा आपण दोन टप्प्यांमध्ये घेऊ. पहिला टप्पा हा स्वातंत्र्यापासून ते १९९० पर्यंतचा मानता येईल. दुसरा टप्पा १९९० नंतर ते आजपर्यंतचा असेल.

## भारताचे परराष्ट्र धोरण : सुरुवातीचा टप्पा

पं.नेहरूंनी भारताच्या परराष्ट्र धोरणाची आखणी सुरुवातीच्या काळात केली. भारताच्या परराष्ट्र धोरणाद्वारे त्यांनी वसाहतवादास विरोध केला. आंतरराष्ट्रवादी भूमिका घेऊन जागतिक शांतता व सुरक्षिततेला प्राधान्य दिले. या काळातील भारताच्या परराष्ट्र धोरणावर तीन बाबींचा प्रभाव होता. (१) सर्व आंतरराष्ट्रीय घडामोडींचे आकलन कोणत्याही सत्तेच्या दबावाशिवाय, स्वतंत्रपणे करण्याचा प्रयत्न केला. शांतता हे नेहमीच भारताच्या परराष्ट्र धोरणाचे वैशिष्ट्य राहिले आहे. (२) पाकिस्तान आणि चीन या देशांकडून असणारे धोकेही विचारात घेण्यात आले. (३) स्वावलंबनाचा आग्रह व त्यावर असणारा परराष्ट्र धोरणाचा भर हेही तत्कालीन परराष्ट्र धोरणाचे वैशिष्ट्य होते.

अगदी सुरुवातीच्या काळात भारताने आपल्या परराष्ट्र धोरणाद्वारे आशिया खंडातील देशांबरोबर संबंध सुधारण्याचे प्रयत्न केले. आशियाई राष्ट्रांशी सहकार्य करून विकास साधण्याचा आणि आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याचा प्रयत्न या काळात झाला. ही प्रादेशिक किंवा क्षेत्रीय विकासाची कल्पना पुढे आफ्रिकेपर्यंत विस्तारीत झाली; परंतु काही आफ्रो–आशियाई देश अमेरिका व सोव्हिएत रशिया यांच्या शीतयुद्धकालीन लष्करी संघटनांचे सदस्य झाले. त्यामुळे प्रादेशिक विकासाची प्रक्रिया थांबली. त्यानंतर यशावकाश जे देश शीतयुद्धातील लष्करी संघटनांमध्ये समाविष्ट झाले नाहीत त्यांनी अलिप्ततावाद संकल्पनेला पाठिंबा दिला. शांतता आणि स्वातंत्र्य ही दोन तत्त्वे अलिप्ततावादी धोरणाची मूलभूत तत्त्वे झाली.

या काळात भारताला शेजारी राष्ट्रांबरोबर झालेल्या संघर्षाला तोंड द्यावे लागले. भारत आणि पाकिस्तानमध्ये १९४७–४८ आणि १९६५ मध्ये काश्मीर प्रश्नावरून युद्ध झाले. १९७१ मध्ये झालेल्या तिसऱ्या युद्धाने पाकिस्तानमधून वेगळे होऊन स्वतंत्र बांगलादेशाची निर्मिती झाली.

१९७० च्या दशकात भारताच्या परराष्ट्र धोरणात एक प्रकारचे स्थैर्य होते. दक्षिण आशियामध्ये एक प्रबळ प्रादेशिक सत्ता म्हणून भारताचा उदय झाला होता. १९७४ मध्ये भारताने अणुचाचणी करून अणुसंशोधनाच्या क्षेत्रातील आपली क्षमता सिद्ध केली. १९८० पासून मात्र काही बदलांना सुरुवात

झाली. दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये सहकार्य वाढीस लागावे म्हणून सार्क ही संघटना स्थापन करण्यात आली. चीनबरोबर असणारे संबंध सुधारण्यासाठी भारताने संवाद सुरू केला. सुरक्षिततेच्या क्षेत्रातील सहकार्यासाठी अमेरिकेबरोबर भारताने देवाण-घेवाणीस सुरुवात केली.

### पहिला टप्पा : १९४७ ते १९९०

* शीतयुद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताने अलिप्ततावादाचा स्वीकार केला. त्यामुळे सर्वच राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे, विकासासाठी योग्य ती मदत विविध राष्ट्रांकडून घेणे याला या काळात प्राधान्य होते. अलिप्ततावादी धोरणामुळे भारताला आपल्या विकासासाठी दोन्ही महासत्तांकडून मदत मिळवणे शक्य झाले.
* संरक्षण व्यवस्था बळकट करण्यावर या काळात भर होता. त्यासाठीचे तंत्रज्ञान आयात करण्यात आले. सोव्हिएत रशिया, फ्रान्स आणि जर्मनी इत्यादी देशांनी यासाठी भारताला साहाय्य केले.

या कालखंडात भारताला काही आव्हानांना सामारे जावे लागले. त्यामध्ये पाकिस्तानशी संघर्ष आणि बांगलादेशाची निर्मिती तसेच चीनशी संघर्ष यांचा समावेश होतो.

**भारताच्या परराष्ट्र धोरणात पंडित नेहरूंचे योगदान :**

- जागतिक किंवा आंतरराष्ट्रीय घडामोडींचे आपण स्वतंत्रपणे आकलन करावे ही त्यांची भूमिका होती.
- शांततेच्या धोरणाचा त्यांनी पाठपुरावा केला.

### दुसरा टप्पा : १९९१ ते आजपर्यंत

* भारताचे दुसऱ्या टप्प्यातील परराष्ट्र धोरण अधिक व्यापक आणि गतिशील बनले. शीतयुद्धोत्तर काळात राजकीय व लष्करी संबंधांनाच प्राधान्य राहिले नाही. परराष्ट्र धोरणात अर्थकारण, व्यापार, शिक्षण आणि तंत्रज्ञान अशा अनेक पैलूंचा समावेश झाला. १९९१ नंतर भारताने आर्थिक व्यवस्थेवरील सरकारी नियंत्रण कमी करून मुक्त आर्थिक धोरण स्वीकारले. त्यामुळे साहजिकच शेजारी देशांबरोबरील व्यापारात वाढ झाली. जागतिक व्यापारात आपला सहभाग वाढला. आर्थिक विकास दर वाढवण्याचे प्रयत्न होऊ लागले.

**तुम्हांला शोधता येईल का ?**

* आर्थिक विकास दर म्हणजे काय ?
* भारत, नेपाळ, भूटान यांच्या आर्थिक विकास दराचा तक्ता तयार करा.

* १९९० नंतरच्या दशकात आग्नेय आशियाई राष्ट्रांशी म्हणजेच सिंगापूर, थायलंड, व्हिएतनाम, इत्यादी राष्ट्रांशी असणारे आपले आर्थिक संबंध अधिक बळकट झाले. इझ्राएल, जपान, चीन, युरोपीय संघ यांच्याशी असणारी आपली देवाण-घेवाण अधिक वाढली.
* आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक पातळीवरील अनेक आर्थिक संघटनांमध्ये भारताचा सहभाग वाढला. उदा., जी-20 आणि BRICS (Brazil, Russia, India, China, South Africa).

BRICS INDIA 2016

ब्रिक्स – बोधचिन्ह

**करून पहा.**

भारत आणि अमेरिका या दोन्ही देशांत अनेक बाबतींत सारखेपणा आहे. उदा., दोन्ही देशांत लोकशाही आहे. असे साधर्म्य दाखवणाऱ्या आणखी काही बाबी शोधा व त्यावर एक प्रकल्प तयार करा.

* अमेरिकेबरोबरचे आपले संबंध अधिक दृढ झाले आहेत. परस्परांवरील विश्वास वाढला. आंतरराष्ट्रीय समूहात भारताचे स्थान उंचावले.
* भारताचे आण्विक धोरण भारताच्या परराष्ट्र धोरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. अणुशक्तीचा अर्थ आणि तिचे उपयोग यांचा अभ्यास तुम्ही इतिहास, भूगोल किंवा रसायनशास्त्र या विषयांमध्ये केला असेल. अणुशक्तीचे महत्त्व लक्षात घेऊन भारताने स्वातंत्र्यानंतर लगेच अणुऊर्जा कार्यक्रमाचा पाया घातला. त्यासाठी अणुऊर्जा विभाग आणि अणुऊर्जा आयोग स्थापन केला. अणुऊर्जा आयोगाचे पहिले अध्यक्ष डॉ. होमी भाभा होते. ऊर्जेची निर्मिती हा त्यामागील मुख्य उद्देश असला तरी लष्करी क्षमता निर्माण करणे हेही त्याचे एक उद्दिष्ट होते. त्यानुसार १९७४ साली भारताने पोखरण येथे पहिली अणुचाचणी केली. १९९८ साली दुसरी अणुचाचणी करून भारताने अण्वस्त्रे निर्माण केली आहेत. अण्वस्त्रे वाहून नेणारी क्षेपणास्त्रेही आपण तयार केली असून त्यासाठी वायुदल आणि नौदलही सक्षम करण्यात आले आहेत.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

अण्वस्त्रे अत्यंत विनाशकारी असतात. म्हणून त्यांचा कधीही वापर होणार नाही, यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक असते. अण्वस्त्रांचा प्रसार रोखण्यासाठी प्रामुख्याने दोन करार करण्यात आले आहेत. (१) अण्वस्त्र प्रसारबंदी करार (NPT) (२) सर्वंकष अणुचाचणी बंदी करार (CTBT). या दोन्ही करारांतील अटी केवळ बड्या देशांच्याच फायद्याच्या असल्याने व विकसनशील देशांवर जाचक निर्बंध घालणाऱ्या असल्याने या करारांवर भारताने स्वाक्षरी केली नाही.

**करून पहा.**

अण्वस्त्रे निर्माण करणाऱ्या देशांची संख्या अधिकाधिक होत आहे. अण्वस्त्रांचा प्रसार रोखण्यासाठी तुमच्या वर्गातर्फे एक निवेदन तयार करा. वृत्तपत्रात ते प्रसिद्ध करण्यासाठी प्रयत्न करा.

भारत आता एक अण्वस्त्रधारी राष्ट्र आहे; परंतु एक जबाबदार अण्वस्त्रधारी राष्ट्र अशी भूमिका आपण स्वीकारली आहे. निःशस्त्रीकरणाच्या प्रयत्नांना भारत सातत्याने पाठिंबा देत आहे. कारण जगात शांतता व सुरक्षितता असावी हीच भारताची भूमिका आहे.

परराष्ट्र धोरणाचा अशा प्रकारे आढावा घेतल्यानंतर पुढील प्रकरणात आपण भारताच्या सुरक्षा व्यवस्थेचा अभ्यास करणार आहोत.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) अणुऊर्जा आयोग स्थापन करण्याचा मुख्य उद्देश........... हा होता.

(अ) लष्करी क्षमता निर्माण करणे

(ब) अणुचाचणी करणे

(क) अण्वस्त्रांचा प्रसार रोखणे
(ड) ऊर्जेची निर्मिती

(२) जगातील सर्व राष्ट्रांचे सर्वांत महत्त्वाचे उद्‌दिष्ट ........ बनले आहे.
(अ) आण्विक विकास (ब) आर्थिक विकास
(क) अणुचाचणी (ड) सुरक्षा व्यवस्था

(३) भारताच्या परराष्ट्र धोरणात प्रामुख्याने खालील बाब महत्त्वाची आहे.
(अ) मुक्त आर्थिक धोरण (ब) परस्परावलंबन
(क) अलिप्ततावाद (ड) आण्विक विकास

(४) इ.स.१९७४ साली भारताने........... या ठिकाणी अणुचाचणी केली.
(अ) श्रीहरीकोटा (ब) थुंबा
(क) पोखरण (ड) जैतापूर

**२. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.**

(१) पं. नेहरूंनी भारत-चीन संबंध सुधारण्यास मोठे योगदान दिले.

(२) अटलबिहारी वाजपेयी यांनी पाकिस्तानसोबत संबंध सुधारण्यास पुढाकार घेतला.

**३. पुढील संकल्पना स्पष्ट करा.**


(१) भारताचे परराष्ट्र धोरण
(२) राष्ट्रीय हितसंबंध
(३) जागतिक शांतता

**४. अण्वस्त्र सज्जतेमुळे जागतिक शांततेस धोका निर्माण झाला आहे, याविषयी तुम्हांला काय वाटते?**

**५. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) भारताचे परराष्ट्र धोरण कोणत्या मूल्यांवर आधारित आहे ?
(२) भारत-चीन संबंध सुधारण्यास कोणी कोणी योगदान दिले ?
(३) भारताच्या परराष्ट्र धोरणाची उद्‌दिष्टे लिहा.

**६. पुढील संकल्पनाचित्र तयार करा.**




**उपक्रम**

प्राचीन काळात भारताचे कोणकोणत्या देशांशी व्यापारी संबंध होते, त्याची माहिती मिळवा.

# ३ भारताची सुरक्षा व्यवस्था

**चला, थोडी उजळणी करूया !**

मागील प्रकरणात आपण भारताच्या परराष्ट्र धोरणासंबंधी अभ्यास केला. परकीय आक्रमण आणि अंतर्गत अव्यवस्थेपासून संरक्षण करणे, सीमारेषा सुरक्षित ठेवणे हे राष्ट्राचे प्राथमिक हितसंबंध असतात हेही आपल्याला समजले. त्यासाठी प्रत्येक राष्ट्र, राष्ट्रीय पातळीवर एक भक्कम सुरक्षा व्यवस्था निर्माण करते. भारतानेही अशी राष्ट्रीय सुरक्षा व्यवस्था निर्माण केली असून या प्रकरणात आपण तिचे स्वरूप आणि सुरक्षा व्यवस्थेसमोरील आव्हाने विचारात घेणार आहोत.

## राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे काय ?

आंतरराष्ट्रीय व्यवस्था सार्वभौम राष्ट्रांची बनलेली आहे. ही सार्वभौम राष्ट्रे जरी एकमेकांना सहकार्य करत असली तरी त्यांच्यात काही वेळेस संघर्षही होतात. राष्ट्राराष्ट्रांमध्ये सीमारेषेसंबंधी वाद असतात, तर काही वेळेस पाणीवाटपावरून त्यांच्यात संघर्ष निर्माण होतात. आंतरराष्ट्रीय करारांचे पालन न करणे, परस्परांशी सतत स्पर्धा करणे, शेजारी देशांतून निर्वासितांचे लोंढे येणे ही संघर्षाची काही अन्य कारणे असू शकतात. राष्ट्रांमध्ये अशा प्रकारे परस्परविरोधी हितसंबंध निर्माण झाल्यास त्यांचे निराकारण तडजोडी, चर्चा यांच्या आधारे केले जाते; परंतु असे प्रयत्न जेव्हा अपुरे ठरतात तेव्हा एखादे राष्ट्र युद्धाचाही विचार करते. एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करणे, राष्ट्राच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणे यांमुळे राष्ट्राच्या सुरक्षेला धोका निर्माण होतो. आक्रमक राष्ट्रांच्या लष्करी सामर्थ्यामुळे अशा प्रकारचे आव्हान निर्माण होते. कोणत्याही परिस्थितीत राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचे आणि अस्तित्वाचे रक्षण करणे हे राज्याचे पहिले कर्तव्य आणि जबाबदारी असल्याने राज्याला आपली सुरक्षा व्यवस्था कायम सज्ज आणि अद्ययावत ठेवावी लागते. याला राष्ट्रीय सुरक्षा असे म्हणतात.

**सांगा पाहू ?**

परस्परपूरक आणि परस्परविरोधी हितसंबंधांची काही उदाहरणे भारत आणि शेजारी देशांच्या संदर्भात तुम्हांला सांगता येतील का ?

## राष्ट्रीय सुरक्षेचे जतन करण्याचे मार्ग

- राष्ट्राच्या सुरक्षेचा संबंध भौगोलिकतेशी जोडलेला आहे. कारण भौगोलिकदृष्ट्या अधिक निकट असणाऱ्या राष्ट्रांकडून राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण होण्याची शक्यता असते. आपल्या भौगोलिक सीमारेषांना असलेला धोका कोणता आहे व तो कोणाकडून आहे हे ओळखणे महत्वाचे असते.
- हा धोका दूर ठेवायचा असेल तर त्यासाठी राष्ट्राला आपली लष्करी ताकद वाढवावी लागते. आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून धोक्याविषयी अंदाज बांधणे, शस्त्रास्त्रनिर्मिती, संरक्षण दलांचे आधुनिकीकरण व ती अद्ययावत करणे इत्यादी मार्ग अवलंबले जातात.
- युद्धाच्या मार्गाने संघर्ष निराकरण करणे व राष्ट्रीय सुरक्षेची जपणूक करणे अधिक तणावाचे आणि आंतरराष्ट्रीय शांतता धोक्यात आणणारे असते म्हणून काही राष्ट्रे अन्य राष्ट्रांचा पाठिंबा मिळवून राष्ट्रीय सुरक्षेला असणारा धोका कमी करण्याचा प्रयत्न करतात.

**विचार करा आणि सुचवा.**

शस्त्रसामर्थ्याबाबत सर्व देश समान पातळीवर नाहीत. अशा परिस्थितीत जर आपल्याला शस्त्रकपातीचे धोरण जागतिक पातळीवर राबवायचे असेल तर काय करावे लागेल ?

**हे तुम्हांला पटते का ?**

लष्करी ताकद वाढवण्याच्या प्रयत्नात राष्ट्रे परस्परांशी शस्त्रस्पर्धा सुरू करतात. शस्त्रस्पर्धेमुळे असुरक्षिततेची भावना अधिकच वाढते. असुरक्षिततेची भावना राष्ट्रीय सुरक्षेला असणारे धोकेही वाढवते. हे धोके टाळण्यासाठी शस्त्रस्पर्धेची नव्हे तर शस्त्रकपातीची गरज आहे.

**परिच्छेद वाचा आणि त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

आंतरराष्ट्रीय संघर्ष शांततेच्या आणि वाटाघाटींच्या माध्यमातून सोडवण्याचा प्रयत्न प्रत्येक राष्ट्राने केला पाहिजे. त्यासाठी राष्ट्राराष्ट्रांमधील संवाद आणि देवाणघेवाण वाढली पाहिजे. राष्ट्राराष्ट्रांमध्ये जितके जास्त परस्परावलंबन, तितकी अधिक शांतता व सुरक्षितता वाढेल. त्यामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढण्यास चर्चा व वाटाघाटीसाठी वेगवेगळी माध्यमे आणि व्यासपीठे उपलब्ध होतील. आर्थिक नुकसानीच्या भीतीमुळे राष्ट्र युद्धे टाळण्याचा प्रयत्न करतील.

१. वरील परिच्छेदातून कोणता संदेश मिळतो ?

२. राष्ट्राराष्ट्रांमधील संवाद कसा वाढेल ?

३. आर्थिक नुकसान आणि युद्ध यांच्यात कोणता संबंध आहे ?

**भारताची सुरक्षा यंत्रणा :** भूदल, नौदल आणि वायुदल या संरक्षण करणाऱ्या तीन दलांचा भारताच्या सुरक्षा यंत्रणेत समावेश आहे. भारताच्या भौगोलिक सीमांचे रक्षण करण्याची जबाबदारी भूदलावर असते, तर नौदल भारताच्या सागरी सीमांचे रक्षण करते. भारताच्या हवाई सीमा व अवकाशाचे रक्षण करण्याची जबाबदारी वायुदलाची असते. या तीनही दलांवर संरक्षण मंत्रालयाचे नियंत्रण असते. भारतातील भूदल खूप मोठे असून ते जगातील सातव्या क्रमांकाचे मानले जाते. भूदलाच्या प्रमुखाला 'जनरल' असे म्हणतात. नौदलाचे प्रमुख 'ॲडमिरल' असतात, तर वायुदलाच्या प्रमुखाला 'एअर चीफ मार्शल' असे म्हणतात. तीनही दलांमध्ये समन्वय राखण्यासाठी २०१९ मध्ये संरक्षण प्रमुख (Chief of Defence Staff) हे पद निर्माण केले आहे. या प्रमुखांची नेमणूक भारताचे राष्ट्रपती करतात.



भूदल



नौदल



वायुदल

**शोधा म्हणजे आणखी समजेल...**

लष्करी राजवट म्हणजे काय ?

अशा राजवटींमध्ये लोकशाही असते का ?

भारताचे राष्ट्रपती सर्व संरक्षण दलांचे सरसेनापती (Supreme Commander of the Defence Forces) असतात. राष्ट्रपतींच्या संमतीशिवाय संरक्षण दलांना युद्ध अथवा शांततेसंबंधी निर्णय घेता येत नाहीत. कारण राष्ट्रपती नागरी सत्तेचे प्रतिनिधित्व करतात. लोकशाहीत नागरी नेतृत्व लष्करी नेतृत्वापेक्षा श्रेष्ठ मानले जाते.

भारताच्या सुरक्षा यंत्रणेतील तीनही संरक्षण दले अद्ययावत असावीत, यासाठी अनेक उपाययोजना केल्या जातात. त्यासाठी काही संशोधन संस्थाही

स्थापन केल्या आहेत. संरक्षण दलातील सर्व श्रेणींच्या व्यक्तींना आपले काम उत्तम प्रकारे पार पाडता यावे यासाठी आपल्या देशात अनेक प्रशिक्षण संस्थाही आहेत. उदा., पुणे येथील नॅशनल डिफेन्स ॲकॅडमी, दिल्ली येथील नॅशनल डिफेन्स कॉलेज इत्यादी.

**निमलष्करी दले :** भारतातील संरक्षण दलांना मदत करण्यासाठी निमलष्करी दले असतात. ती पूर्णतः लष्करीही नसतात व नागरीही नसतात. म्हणून त्यांना 'निमलष्करी दले' असे म्हटले जाते. संरक्षण दलांना साहाय्य करणे हे त्यांचे प्रमुख काम असते. सीमा सुरक्षा दल (Border Security Force), तटरक्षक दल (Coast Guard), केंद्रीय राखीव पोलीस दल (Central Reserve Police Force), जलद कृतिदल (Rapid Action Force) यांचा निमलष्करी दलात समावेश होतो.

रेल्वेस्थानके, तेलसाठे, पाणीसाठे इत्यादी महत्त्वाच्या ठिकाणांचे संरक्षण करण्याची जबाबदारी निमलष्करी दलांची असते. तसेच नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तींचे व्यवस्थापन करण्यात त्यांचा सहभाग असतो. शांततेच्या काळात देशाच्या आंतरराष्ट्रीय सीमांचे रक्षण करण्याची जबाबदारी निमलष्करी दलांवर असते.

सीमेजवळच्या भागात राहणाऱ्या नागरिकांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करणे, तस्करी रोखणे, सीमेवर गस्त घालणे ही कामे सीमा सुरक्षा दल करते.

भारताच्या सागरी किनाऱ्यांचे रक्षण करण्यासाठी तटरक्षक दलाची निर्मिती करण्यात आली आहे. भारताच्या सागरी हद्दीतील मच्छीमारी व्यवसायास संरक्षण देणे, सागरी मार्गावरील चोरटा व्यापार थांबवणे इत्यादी कामे तटरक्षक दल पार पाडते.

कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कामी विविध राज्यांतील प्रशासनास मदत करण्याचे काम केंद्रीय राखीव पोलीस दल करते.

बॉंबस्फोट, दंगे यांमुळे देशाच्या सुरक्षेस धोका निर्माण झाल्यास वेगवान हालचाली करून जनजीवन सुरळीत करण्याचे काम जलद कृती दल करते.

विद्यार्थ्यांमध्ये शिस्त व लष्करी शिक्षणाची आवड निर्माण व्हावी या हेतूने राष्ट्रीय छात्रसेना म्हणजे एन.सी.सी.ची स्थापना करण्यात आली आहे. यात शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींना सहभागी होता येते.

**गृहरक्षक दल :** स्वातंत्र्यपूर्व काळात गृहरक्षक दल (होमगार्ड) ही संघटना स्थापन करण्यात आली. गृहरक्षक दलात सहभागी होऊन नागरिक देशाच्या संरक्षणास साहाय्यभूत ठरू शकतात. वीस ते पस्तीस वर्षे वयोगटातील कोणत्याही स्त्री-पुरुष नागरिकांस या दलात भरती होता येते.

पोलिसांच्या बरोबरीने सार्वजनिक सुरक्षितता राखणे, दंगल व बंद या काळात दूध, पाणी, इत्यादी जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे, वाहतुकीची व्यवस्था करणे, भूकंप, पूर अशा नैसर्गिक आपत्तींच्या वेळी लोकांना मदत करणे इत्यादी कामे या दलास पार पाडावी लागतात.

## भारताच्या सुरक्षिततेपुढील आव्हाने

- स्वातंत्र्यापासून आजपर्यंत भारताच्या सुरक्षिततेला पाकिस्तान आणि चीन या राष्ट्रांनी धोका निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात अनेक वादग्रस्त प्रश्न आहेत. उदा., काश्मीरची समस्या, पाणीवाटपाविषयीचे तंटे, घुसखोरीची समस्या, सीमावाद, इत्यादी. हे प्रश्न चर्चा आणि वाटाघाटीच्या माध्यमातून सोडवण्याचा प्रयत्न भारत सातत्याने करत आहे. (भारत-पाकिस्तान संबंधांविषयी तुम्हांला प्रकरण ६ मध्ये अधिक अभ्यासायला मिळणार आहे.)
- आशिया खंडात भारत आणि चीन हे महत्त्वाचे देश आहेत. १९६२ मध्ये चीनबरोबर आपले युद्धही झाले आहे. भारताच्या शेजारी असणाऱ्या

राष्ट्रांवर आपले प्रभुत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न चीन करत असल्यामुळे भारत-चीन संबंधांत तणाव आहे. सीमारेषेबाबत भारत-चीन यांमध्ये वाद आहे.

- भारताच्या सुरक्षिततेला केवळ बाहेरच्या राष्ट्रांकडूनच धोका आहे असे नाही तर अंतर्गत क्षेत्रातूनही सुरक्षितता धोक्यात आणण्याचा प्रयत्न होत आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या संदर्भात आता बाह्य सुरक्षितता व अंतर्गत सुरक्षितता असा फरक महत्त्वाचा राहिला नाही. धर्म, प्रादेशिकता, वैचारिक, वांशिक, आर्थिक यांवर आधारित अनेक बंडखोर चळवळी, अंतर्गत क्षेत्रात अस्थिरता निर्माण करत आहेत. उदा., नक्षलवादी चळवळ.

- दहशतवाद हे भारताच्या अंतर्गत सुरक्षेच्या संदर्भातील सर्वांत मोठे आव्हान आहे. दहशतवाद ही एक जागतिक समस्या असून दहशतवाद नष्ट व्हावा म्हणून भारत प्रयत्नशील आहे.

## मानवी सुरक्षा

राष्ट्रीय सुरक्षेच्या कल्पनेत शीतयुद्धानंतरच्या काळात बदल झाला असून ती अधिक व्यापक झाली आहे. राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे केवळ देशाची सुरक्षा नाही तर त्यात राहणाऱ्या माणसांचीही सुरक्षा असा नवा विचार त्यात आला आहे. कारण देशाची सुरक्षा ही अंतिमतः माणसांसाठीच असते. म्हणूनच माणूस केंद्रस्थानी ठेवून नव्याने केलेला सुरक्षेचा विचार म्हणजे मानवी सुरक्षा होय. मानवी सुरक्षेत माणसांचे सर्व प्रकारच्या धोक्यांपासून संरक्षण करून त्यांना शिक्षण, आरोग्य व विकासाच्या संधी प्राप्त करून देणे अपेक्षित आहे.

निरक्षरता, दारिद्र्य, अंधश्रद्धा, मागासलेपणा दूर करून सर्वांना सन्मानाने जगण्यासाठी पोषक परिस्थिती निर्माण करणे याचाही समावेश मानवी सुरक्षेत होतो. अल्पसंख्य व दुर्बल गटांच्या हक्कांचे संरक्षणही मानवी सुरक्षेसाठी आवश्यक आहे.

## मानवी सुरक्षेला असणारी आव्हाने

(१) मानवी सुरक्षेला असणारे सर्वांत मोठे आव्हान म्हणजे दहशतवाद. दहशतवादाचे लक्ष्यच सामान्य, निरपराध माणसे असतात. त्यांच्या मनात दहशत किंवा भीती निर्माण करून त्यांच्यामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण करणे हा दहशतवादाचा हेतू असतो. त्यामुळे मानवी सुरक्षेसाठी दहशतवाद नष्ट करणे आवश्यक आहे.

### चर्चा करा.

- मानवी सुरक्षेसाठी लोकशाही शासन व्यवस्थाच उपयुक्त आहे असे तुम्हांला वाटते का ? चर्चेत तुम्ही कोणते मुद्दे मांडाल ?
- मानवी सुरक्षेसाठी कौटुंबिक पातळीवर कोणते प्रयत्न करता येतील ?

(२) पर्यावरणातील बदलांमुळे व प्रदूषणामुळेही मानवी जीवनाला धोका निर्माण झाला आहे. एड्स, डेंग्यू, चिकनगुनिया, स्वाईन फ्लू, इबोला, कोरोना यांसारख्या रोगांनी मोठेच आव्हान निर्माण केले आहे. अशा रोगांपासून मानवाचे संरक्षण हाही मानवी सुरक्षेचा घटक मानला जातो.

### तुम्हांला काय वाटते ?

समाजातला वाढता हिंसाचार मानवी सुरक्षेला धोका निर्माण करत आहे. हिंसाचार वाढू नये म्हणून सर्व पातळ्यांवर कशाप्रकारे शांतता प्रक्रिया निर्माण करता येतील ?

भारताच्या सुरक्षा व्यवस्थेचे स्वरूप आपण या प्रकरणात अभ्यासले. राष्ट्रीय सुरक्षा ते मानवी सुरक्षा असा सुरक्षेसंबंधीच्या कल्पनेत झालेला बदलही आपण या प्रकरणात समजून घेतला. पुढील प्रकरणात आपण संयुक्त राष्ट्रे या आंतरराष्ट्रीय संघटनेचा अभ्यास करणार आहोत. मानवी सुरक्षेसाठी ती कोणत्या उपाययोजना करते, ते समजून घेऊ.

## स्वाध्याय

### १. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

(१) भारताचे ........ हे सर्व संरक्षक दलांचे सरसेनापती असतात.
(अ) प्रधानमंत्री (ब) राष्ट्रपती
(क) संरक्षण मंत्री (ड) राज्यपाल

(२) भारताच्या सागरी किनाऱ्याच्या रक्षणाची जबाबदारी असणारे दल –
(अ) भूदल (ब) तटरक्षक दल
(क) सीमा सुरक्षा दल (ड) जलद कृतिदल

(३) विद्यार्थ्यांमध्ये शिस्त व लष्करी शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी ........ ची स्थापना करण्यात आली.
(अ) बी.एस.एफ. (ब) सी.आर.पी.एफ.
(क) एन.सी.सी. (ड) आर.ए.एफ.

### २. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.

(१) मानवी सुरक्षिततेसाठी दहशतवाद नष्ट करणे आवश्यक आहे.
(२) प्रत्येक राष्ट्र स्वत:साठी भक्कम सुरक्षा व्यवस्था निर्माण करते.
(३) भारत आणि पाकिस्तान यांच्यात कोणतेच वादग्रस्त प्रश्न नाहीत.

### ३. पुढील संकल्पना स्पष्ट करा.

(१) जलद कृतिदलाचे कार्य (२) मानवी सुरक्षा
(३) गृहरक्षक दल

### ४. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.


(१) राष्ट्राच्या सुरक्षेला कोणत्या बाबींपासून धोका निर्माण होतो ?
(२) सीमा सुरक्षा दलाची कार्ये लिहा.
(३) मानवी सुरक्षा म्हणजे काय ?

### ५. दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

१. सुरक्षा दलाविषयीचा पुढील तक्ता पूर्ण करा.

| सुरक्षा दलाचे ०नाव | कार्ये | प्रमुख | सध्या कार्यरत प्रमुखाचे नाव |
|---|---|---|---|
| भूदल | ------- | ---- | ------- |
| ----- | ------- | ॲडमिरल | ------- |
| ---- | भारताच्या हवाई सीमा व अवकाशाचे रक्षण करणे. | ---- | ------- |

२. भारताच्या सुरक्षेपुढील आव्हाने पुढील संकल्पना चित्राच्या साहाय्याने दाखवा.




#### उपक्रम

'भारताच्या सुरक्षिततेपुढील आव्हाने' या विषयावर शाळेत चर्चासत्र आयोजित करा.

# ४ संयुक्त राष्ट्रे

या प्रकरणात नवीन काय शिकणार आहोत ? आंतरराष्ट्रीय पातळीवर शांतता व सुरक्षितता असावी म्हणून संयुक्त राष्ट्रे ही आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्यात आली. या संघटनेची उद्‌दिष्टे, तत्त्वे, रचना आणि शांतता रक्षणातील तिची भूमिका यांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करायचा आहे.

## संयुक्त राष्ट्रे : पार्श्वभूमी

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला दोन महायुद्‌धे झाली. या महायुद्‌धांमुळे मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी झाली. यामुळे जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी एक यंत्रणा निर्माण केली पाहिजे या जाणिवेतून पहिल्या महायुद्‌धानंतर राष्ट्रसंघ आणि दुसऱ्या महायुद्‌धानंतर संयुक्त राष्ट्रे या आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना करण्यात आली. पहिल्या महायुद्‌धानंतर स्थापन झालेल्या राष्ट्रसंघाला फारसे यश मिळाले नाही. पण दुसऱ्या महायुद्‌धामध्ये अणुबॉम्बचा वापर झाल्यानंतर अशा प्रकारची विनाशकारी युद्‌धे थांबली पाहिजेत आणि ही सर्वच राष्ट्रांची सामूहिक जबाबदारी आहे, हा विचार पुढे आला. अशी जाणीव सर्व राष्ट्रांमध्ये निर्माण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रे या संघटनेची स्थापना दुसरे महायुद्‌ध संपल्यानंतर करण्यात आली.

## संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेचा कालानुक्रम

दुसऱ्या महायुद्‌धाच्या दरम्यान १४ ऑगस्ट १९४१ रोजी इंग्लंडचे प्रधानमंत्री विन्स्टन चर्चिल आणि अमेरिकेचे अध्यक्ष फ्रँकलीन डी. रुझवेल्ट यांच्यामध्ये अटलांटिक करार झाला. या करारानुसार युद्‌ध संपल्यानंतर आंतरराष्ट्रीय सुरक्षा निर्माण करण्यासाठी एक कायमस्वरूपी व्यवस्था निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयावर १९४४ आणि १९४५ मध्ये झालेल्या दोस्त राष्ट्रांच्या परिषदेत विस्तृत चर्चा करण्यात आली व त्यानुसार आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्याच्या कराराचा मसुदा तयार केला गेला. अमेरिकेतील सॅनफ्रान्सिस्को येथे १९४५ मध्ये पन्नास राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी सविस्तर चर्चा करून संयुक्त राष्ट्रांची सनद तयार केली. या सनदेवर स्वाक्षऱ्या होऊन युद्‌ध संपताच २४ ऑक्टोबर १९४५ रोजी 'संयुक्त राष्ट्रे' या संघटनेची स्थापना करण्यात आली. संयुक्त राष्ट्रे ही सार्वभौम राष्ट्रांची संघटना आहे.



**सांगा पाहू ?**

- युद्‌धकाळात झालेल्या परिषदांमध्ये भारत सहभागी झाला होता का ?
- संयुक्त राष्ट्रे दिन म्हणून कोणता दिवस साजरा केला जातो ?

## संयुक्त राष्ट्रे या संघटनेची उद्‌दिष्टे

संयुक्त राष्ट्रे ही जगातील सर्वांत मोठी आंतरराष्ट्रीय संघटना आहे. सुरुवातीस केवळ ५० देश या संघटनेचे सदस्य होते. आज ही संख्या १९३ वर गेली आहे. ही सर्व सदस्य राष्ट्रे संयुक्त राष्ट्रांच्या व्यासपीठावर एकत्र येतात. संयुक्त राष्ट्रांची काही निश्चित उद्‌दिष्टे आहेत. थोडक्यात सांगायचे झाल्यास, संयुक्त राष्ट्रे जागतिक शांतता निर्माण करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करते.

- राष्ट्रांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करणे.
- आंतरराष्ट्रीय प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडवून आंतरराष्ट्रीय सुरक्षा वृद्‌धिंगत करणे.
- मानवी हक्कांचे व स्वातंत्र्याचे जतन व संवर्धन करणे.

याचबरोबर आंतरराष्ट्रीय स्तरावर आर्थिक सहकार्य वाढवणे हाही संयुक्त राष्ट्रांचा हेतू आहे.

सार्वभौम राष्ट्रांच्या राजनयिक विशेषाधिकारांचा

आदर करणे, दुसऱ्या देशावर आक्रमण न करणे, आंतरराष्ट्रीय कायद्याचे व करारांचे पालन करणे हे सर्व सभासद राष्ट्रांचे कर्तव्य आहे.

संयुक्त राष्ट्रे ही सार्वभौम राष्ट्रांनी एकत्र येऊन निर्माण केलेली संघटना आहे. त्यामुळे साहजिकच ती काही तत्त्वांवर किंवा नियमांवर आधारलेली आहे. ती तत्त्वे थोडक्यात पुढीलप्रमाणे आहेत.

### संयुक्त राष्ट्रांची तत्त्वे

१. सर्व सभासद राष्ट्रांचा दर्जा समान असेल. भौगोलिक आकार, आर्थिक व लष्करी ताकद यांवर आधारित राष्ट्राराष्ट्रांमध्ये भेदभाव केला जात नाही.

२. संयुक्त राष्ट्रांच्या सभासद राष्ट्रांनी परस्परांच्या स्वातंत्र्य आणि भौगोलिक एकात्मतेचा आदर करावा.

३. सर्व सभासद राष्ट्रांनी आपले आंतरराष्ट्रीय वाद, आपापसातील विवाद शांततेच्या मार्गाने सोडवावेत.

खालील प्रश्नांची उत्तरे देता येतील का ?

- आंतरराष्ट्रीय सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाल्यास संयुक्त राष्ट्रे सशस्त्र हस्तक्षेप करू शकते का ?
- मानवी हक्कांचे व स्वातंत्र्याचे संवर्धन व्हावे यासाठी संयुक्त राष्ट्रांनी काय पावले उचलली आहेत ?

**संयुक्त राष्ट्रांची रचना :** संयुक्त राष्ट्रांच्या सनदेमध्ये या संघटनेची रचना व कार्यपद्धती यांविषयी माहिती दिलेली आहे.

संयुक्त राष्ट्रांची सहा प्रमुख अंगे किंवा शाखा आहेत.

(१) आमसभा (२) सुरक्षा परिषद (३) आर्थिक आणि सामाजिक परिषद (४) आंतरराष्ट्रीय न्यायालय (५) विश्वस्त मंडळ (६) सचिवालय.



**संयुक्त राष्ट्रे – आमसभा**

या सहा शाखांव्यतिरिक्त संयुक्त राष्ट्रांच्या कार्यात मदत करणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या अनेक संलग्न संस्था आहेत. त्यांना विशेष कार्यात्मक संस्था असे म्हणतात. विशिष्ट कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या या संस्था जगातील राष्ट्रांना त्या कार्यामध्ये मदत करतात. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO), अन्न व शेती संघटना (FAO), जागतिक आरोग्य संघटना (WHO), जागतिक बँक (WB), आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF), संयुक्त राष्ट्रांचा बालक निधी (UNICEF), संयुक्त राष्ट्रांची शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना (UNESCO) अशा काही महत्त्वपूर्ण संलग्न संस्था आहेत.

**आमसभा :** संयुक्त राष्ट्रांचे सर्व सभासद देश आमसभेचे सदस्य असतात. देश श्रीमंत असो वा गरीब, मोठा असो वा छोटा, सर्व सदस्य राष्ट्रांचे स्थान आणि दर्जा समान असतो. म्हणजेच प्रत्येक राष्ट्राला एक मत असते. प्रत्येक वर्षी सप्टेंबर ते डिसेंबर या कालावधीत आमसभेचे अधिवेशन असते. या अधिवेशनात पर्यावरण, निःशस्त्रीकरण अशा महत्वपूर्ण जागतिक विषयांवर चर्चा होते. आमसभेतील निर्णय बहुमताने घेतले जातात. हे निर्णय ठरावांच्या स्वरूपात असतात. म्हणजेच आमसभा फक्त ठराव करते. कायदे करत नाही. सदस्य राष्ट्रांच्या प्रतिनिधींना एकत्र येऊन चर्चा करण्यासाठी, महत्त्वाच्या जागतिक प्रश्नांवर धोरण ठरवण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून आमसभेचे महत्त्व आहे.

### आमसभेची कार्ये

(१) सुरक्षा समितीवरील अस्थायी सदस्यांची निवड करणे.

(२) सुरक्षा परिषदेच्या बरोबरीने संयुक्त राष्ट्रांचे महासचिव आणि आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधीशांची निवड करणे.

(३) संयुक्त राष्ट्रांच्या वार्षिक अंदाजपत्रकास मान्यता देणे.

संयुक्त राष्ट्रांचे मुख्यालय न्यूयॉर्क येथे आहे. इंग्रजी, फ्रेंच, रशियन, स्पॅनिश, चिनी आणि अरबी या संयुक्त राष्ट्रांच्या अधिकृत भाषा आहेत.

**सुरक्षा परिषद :** सुरक्षा परिषदेत एकूण १५ सदस्य असतात. त्यांपैकी ५ सदस्य कायम तर १० सदस्य अस्थायी स्वरूपाचे असतात. अस्थायी सदस्यांची निवडणूक दर २ वर्षांनी आमसभा करते. अमेरिका, रशिया, इंग्लंड, फ्रान्स आणि चीन हे सुरक्षा समितीचे कायम सदस्य आहेत. त्यांना नकाराधिकाराचा अधिकार आहे. कोणत्याही महत्त्वाच्या प्रश्नांवर निर्णय घेण्यासाठी ५ कायम सदस्य आणि किमान ४ अस्थायी सदस्य यांचा होकार असणे आवश्यक असते. कायम सदस्यांपैकी कोणत्याही एका सदस्याने जरी नकाराधिकाराचा वापर केला, म्हणजे जर विरोधी मत दिले तरी निर्णय घेता येत नाही.

### सुरक्षा परिषदेची कार्ये

(१) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखणे ही सुरक्षा परिषदेची प्रमुख जबाबदारी आहे. आंतरराष्ट्रीय संघर्षाच्या परिस्थितीत संघर्ष मिटवून शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणे, आर्थिक निर्बंध लादणे किंवा आक्रमक राष्ट्राविरोधात लष्करी कारवाई करण्याचा निर्णय घेणे यांपैकी एक पर्याय सुरक्षा परिषद सुचवते.

(२) शस्त्रास्त्र नियंत्रणासाठी योजना तयार करण्याचे काम सुरक्षा परिषद करते.

(३) आमसभेच्या बरोबरीने आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे न्यायाधीश आणि संयुक्त राष्ट्रांचा महासचिव निवडण्यात सुरक्षा परिषदेचा सहभाग असतो.

सुरक्षा परिषदेच्या रचनेत बदल व्हावा आणि तिचे स्वरूप अधिक लोकशाहीपूर्ण व्हावे या दृष्टीने सध्या सुधारणा सुचवल्या जात आहेत. सुरक्षा परिषदेत भारताला कायम सदस्यत्व मिळावे म्हणून भारत प्रयत्नशील आहे.

**आर्थिक व सामाजिक परिषद :** संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक धोरणांमध्ये समन्वय साधणे हे या परिषदेचे मुख्य उद्‌दिष्ट आहे. या परिषदेत एकूण ५४ सदस्य असतात. त्यांची निवड आमसभा करते. प्रत्येक सभासदाचा कार्यकाल ३ वर्षांचा असतो व दरवर्षी एक तृतीयांश सभासद नव्याने निवडले जातात. परिषदेचे निर्णय बहुमताने घेतले जातात.

**कार्ये**

(१) दारिद्र्य, बेरोजगारी, आर्थिक व सामाजिक विषमता अशा प्रश्नांची जागतिक पातळीवर चर्चा करणे व उपाययोजना सुचवणे.

(२) स्त्रियांचे प्रश्न, स्त्री सक्षमीकरण, मानवी हक्क, मूलभूत स्वातंत्र्य, जागतिक व्यापार, आरोग्यविषयक समस्या अशा प्रश्नांवर चर्चा करून निर्णय घेणे.

(३) आंतरराष्ट्रीय स्तरावर सांस्कृतिक व शैक्षणिक सहकार्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणे.

(४) संयुक्त राष्ट्रांशी संलग्न असलेल्या विविध संघटनांच्या कामात सुसूत्रता व समन्वय राखणे.

**सचिवालय :** संयुक्त राष्ट्रांचे प्रशासकीय कामकाज सांभाळण्याची जबाबदारी सचिवालयावर आहे. सचिवालयाच्या प्रमुखास महासचिव म्हणतात. त्यांची निवड आमसभा व सुरक्षा परिषद करते. त्यांचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो.

**लिहिते व्हा.**

* आतापर्यंतच्या महासचिवांची नावे लिहा.
* महासचिव हे महासत्तांचे नागरिक असावेत असे बंधन आहे का ?
* कोणत्या राष्ट्रांच्या नागरिकांना महासचिव पदासाठी प्राधान्य दिले जाते ?
* सध्याचे महासचिव कोण आहेत व ते कोणत्या देशाचे आहेत ?

**कार्ये**

(१) हवामान बदल, मानवी हक्क, निःशस्त्रीकरण अशा जागतिक प्रश्नांवर आंतरराष्ट्रीय परिषदा भरवणे.

(२) आमसभेच्या व सुरक्षा परिषदेच्या बैठका आयोजित करणे.

(३) माहितीचे संकलन करणे.

(४) प्रसिद्धी माध्यमांना माहिती पुरवणे.

**आंतरराष्ट्रीय न्यायालय :** आंतरराष्ट्रीय न्यायालय म्हणजे संयुक्त राष्ट्रांची न्यायालयीन शाखा होय. आंतरराष्ट्रीय न्यायालय नेदरलँड या देशात 'द हेग' येथे आहे. न्यायालयात एकूण १५ न्यायाधीश असतात. त्यांची निवड आमसभा आणि सुरक्षा परिषद करते. प्रत्येक न्यायाधीशाचा कार्यकाल ९ वर्षे असतो.

**कार्ये**

(१) संयुक्त राष्ट्रांचा सदस्य देश असलेल्या दोन किंवा अधिक राष्ट्रांमधील तंटे सोडवणे.

(२) आंतरराष्ट्रीय कायद्यांचा योग्य अर्थ लावणे.

(३) संयुक्त राष्ट्रे संघटनेच्या विविध शाखा किंवा संलग्न संस्थांना कायद्याशी संबंधित प्रश्नांवर सल्ला देणे.

**आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालय :** आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालय ही आंतरशासकीय संघटना आणि एक आंतरराष्ट्रीय न्यायाधिकरण असून त्याचे मुख्यालय नेदरलँड या देशात द हेग येथे आहे. वंशसंहार, युद्‌धकालीन गुन्हे आणि मानवतावादाविरुद्‌ध गुन्हे या प्रकारच्या आंतरराष्ट्रीय समुदायासाठी चिंतेची बाब ठरणाऱ्या गंभीर गुन्ह्यात समाविष्ट असलेल्या व्यक्तींवरील आरोपांचा तपास करणे आणि त्यांच्यावरील खटला चालवण्याचे काम हे न्यायालय करते.

**विश्वस्त मंडळ :** दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात जे प्रदेश किंवा वसाहती अविकसित होत्या, त्यांच्या विकासाची जबाबदारी काही विकसित राष्ट्रांवर सोपवण्यात आली होती. त्या विकसित राष्ट्रांनी अशा प्रदेशांच्या विकासात मदत करणे व त्यांना स्वातंत्र्य मिळवण्यास व तेथे लोकशाहीची स्थापना करण्यास मदत करणे अपेक्षित होते आणि त्याचे उत्तरदायित्व विश्वस्त मंडळावर सोपवण्यात आले होते. या विश्वस्त मंडळाचे कार्य आता संपुष्टात आले आहे.

विश्वस्त मंडळाचे कार्य १ नोव्हेंबर १९९४ रोजी पलाऊ या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संपुष्टात आले. पलाऊ हे फिलिपिन्स या राष्ट्राच्या ५०० मीटर पूर्वेला असलेले प्रशांत महासागरातील एक बेट आहे.

## सहस्रकाची विकास उद्‌दिष्टे

संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य राष्ट्रांनी २००० साली एकत्र येऊन नव्या सहस्रकाची विकास उद्‌दिष्टे निश्चित केली. त्यांतील काही महत्त्वाची उद्‌दिष्टे खालीलप्रमाणे–

- गरिबी व भूक यांचे निर्मूलन करणे.
- प्राथमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे.
- स्त्री सक्षमीकरण करणे, बालमृत्यूचे प्रमाण कमी करणे.
- गरोदर स्त्रियांच्या आरोग्याची विशेष काळजी घेणे.
- एड्स, मलेरिया इत्यादी रोगांशी लढा देणे.
- पर्यावरणाचे रक्षण आणि विकसित आणि विकसनशील देशांमधील सहकार्य वाढवणे.

ही उद्‌दिष्टे साध्य करण्याचा निश्चित कालावधीही ठरवण्यात आला आहे.

युनिसेफ आणि युनेस्को यांच्या मदतीने भारताने सहस्रकाची विकास उद्‌दिष्टे गाठण्यात उल्लेखनीय प्रगती केली आहे.

संयुक्त राष्ट्रांचा बालक निधी म्हणजे युनिसेफ (UNICEF) ही संयुक्त राष्ट्रांची संलग्न संस्था आहे. लहान मुलांना सकस आहार व आरोग्य सेवा पुरवण्यासाठी युनिसेफ कार्य करते. युनिसेफच्या मदतीने भारतामध्ये बाल कुपोषणाच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी विविध कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत.

UNESCO या संयुक्त राष्ट्रांच्या संलग्न संस्थेच्या मदतीने शिक्षण, विज्ञान, संस्कृती यांमधील सहकार्य वाढवून जगात शांतता व सुरक्षा कायम करण्याचा प्रयत्न केला आहे.

## संयुक्त राष्ट्रे आणि शांतता रक्षण

आंतरराष्ट्रीय संघर्षाची शांततापूर्ण मार्गाने सोडवणूक करणे हे संयुक्त राष्ट्रांचे उद्‌दिष्ट आहे. हे उद्‌दिष्ट साध्य करण्यासाठी कोणते मार्ग वापरले जावेत हे संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत सांगितले आहे. ज्या राष्ट्रांमध्ये संघर्ष आहे त्या राष्ट्रांना मान्य होईल असा मध्यस्थ नेमणे, न्यायिक प्रक्रियेचा वापर करणे, संघर्ष सोडवण्यासाठी लवाद स्थापन करणे, गरज पडल्यास सैन्यबळाचा वापर करणे व परत संघर्ष होणार नाही याची काळजी घेणे इत्यादी मार्गांचा यामध्ये समावेश आहे. आधुनिक काळात दहशतवाद, वांशिक व धार्मिक संघर्ष यांमुळे मानवी सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे संयुक्त राष्ट्रांच्या शांतता रक्षणाच्या कार्याला महत्त्व प्राप्त झाले आहे. संघर्षग्रस्त प्रदेशात परत हिंसेचा उद्रेक होऊ नये व लवकरात लवकर सामान्य स्थिती निर्माण व्हावी यासाठी संयुक्त राष्ट्रे ही संघटना प्रयत्न करते. उदा., शाळा चालू करणे, जनतेमध्ये मानवी हक्कांविषयी जागरूकता निर्माण करणे, सामाजिक, आर्थिक, राजकीय सुविधा निर्माण करणे, निवडणुका घेणे इत्यादी.

* शिक्षकांच्या मदतीने युगोस्लाव्हिया, नामिबिया, कंबोडिया, सोमालिया, हैती, थायलंड इत्यादी राष्ट्रांमध्ये संयुक्त राष्ट्रांनी चालवलेल्या शांतता रक्षण मोहिमांची माहिती मिळवा.
* संयुक्त राष्ट्रांच्या शांतिसेनांसाठी सैन्य पाठवण्यामध्ये कोणती राष्ट्रे आघाडीवर आहेत, याची सूची तयार करा.



भारतीय शांती सैनिक

**संयुक्त राष्ट्रांचे शांतता रक्षण :** संघर्षग्रस्त प्रदेशांमध्ये कायमस्वरूपी शांतता निर्माण व्हावी म्हणून पोषक परिस्थिती निर्माण करण्याचे काम या उपक्रमाद्‌वारे केले जाते. संयुक्त राष्ट्रांचे शांततारक्षक संघर्षग्रस्त प्रदेशांना शांततेकडे वाटचाल करण्यासाठी मदत करतात. संघर्षग्रस्त प्रदेशात सुरक्षेबरोबरच राजकीय आणि शांतता बांधणीसाठी साहाय्य केले जाते. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेचे संपूर्ण जगात जतन आणि संवर्धन करण्यासाठी संयुक्त राष्ट्रे जी अनेकविध कामे करते त्यांपैकी शांतता रक्षण हे एक काम आहे. यास पूरक अन्य कृतींमध्ये पुढील बाबींचा समावेश होतो.

* संघर्ष प्रतिबंध आणि मध्यस्थी.
* शांतता प्रत्यक्ष प्रस्थापित करणे.
* शांतता रक्षणाच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करणे.
* शांतता बांधणी.

## संयुक्त राष्ट्रे आणि भारत

संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेपूर्वी ज्या विविध परिषदा झाल्या होत्या त्यामध्ये भारत सहभागी झाला होता. निर्वसाहतीकरण, निःशस्त्रीकरण, वंशभेद असे अनेक प्रश्न संयुक्त राष्ट्रांच्या व्यासपीठावर मांडण्यात भारताचा सहभाग होता. संयुक्त राष्ट्रांमध्ये १९४६ मध्ये वर्णद्वेषाचा प्रश्न उपस्थित करणारा भारत हा पहिला देश होता. संयुक्त राष्ट्रांसमोर अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांच्या समस्यांवरील चर्चेमध्ये भारताने कायम पुढाकार घेतला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शांतिसेनेमध्ये सहभागी होण्यासाठी भारताने नेहमीच आपले सैन्य पाठवले आहे. इतकेच नाही तर भारताने फक्त स्त्री सैनिकांची शांतिसेना देखील पाठवली आहे. आंतरराष्ट्रीय संघर्ष शांततेच्या मार्गाने सोडवावेत यासाठी भारत प्रयत्नशील आहे, हेच यातून दिसून येते.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) पुढीलपैकी कोणते राष्ट्र संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचे कायमस्वरूपी सभासद नाही?

(अ) अमेरिका (ब) रशिया
(क) जर्मनी (ड) चीन

(२) भारतात बाल-कुपोषण समस्येवर उपाययोजना करण्यासाठी विविध कार्यशाळा आयोजित करणारी आंतरराष्ट्रीय संस्था.

(अ) युनिसेफ (ब) युनेस्को
(क) विश्वस्त मंडळ (ड) रेडक्रॉस

(३) संयुक्त राष्ट्रे संघटनेच्या आज सभासद असणाऱ्या राष्ट्रांची संख्या -

(अ) १९० (ब) १९३

(क) १९८ (ड) १९९

## २. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.

(१) आमसभा जागतिक प्रश्नांवर चर्चा करण्याचे व्यासपीठ आहे.

(२) संयुक्त राष्ट्रांमधील सर्व सदस्य राष्ट्रांचा दर्जा समान नसतो.

(३) चीनने सुरक्षा परिषदेत नकाराधिकाराचा वापर करूनही ठराव संमत होऊ शकतो.

(४) संयुक्त राष्ट्रांच्या कार्यात भारताने महत्वाची कामगिरी बजावली आहे.

## ३. पुढील संकल्पना स्पष्ट करा.

(१) नकाराधिकार

(२) युनिसेफ

## ४. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

(१) संयुक्त राष्ट्रे या संघटनेच्या स्थापनेची कारणे लिहा.

(२) संयुक्त राष्ट्रांची शांतिसेना कोणती भूमिका बजावते?


(३) संयुक्त राष्ट्रांचे उद्दिष्ट लिहा.

## ५. दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.


(१) संयुक्त राष्ट्रांच्या घटकशाखांविषयी माहिती देणारा पुढील तक्ता पूर्ण करा.

| क्र. | शाखा | सदस्य संख्या | कार्ये |
|---|---|---|---|
| १. | आमसभा | | |
| २. | सुरक्षा समिती | | |
| ३. | आंतरराष्ट्रीय न्यायालय | | |
| ४. | आर्थिक व सामाजिक परिषद | | |

(२) संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेचा कालक्रम पुढील कालरेषेवर दाखवा.




(३) संयुक्त राष्ट्रांच्या संदर्भातील पुढील वृक्षतक्ता पूर्ण करा.




## उपक्रम

(१) संयुक्त राष्ट्रे बालकांच्या आणि महिलांच्या विकासासाठी कोणते उपक्रम राबवते त्याची माहिती संकलित करा.

(२) जागतिक आरोग्य संघटनेबद्दल माहिती संग्रहित करा.

F54UFH

# ५ भारत व अन्य देश

**चला, थोडी उजळणी करूया.**


मागील प्रकरणात आपण संयुक्त राष्ट्रे या आंतरराष्ट्रीय संघटनेविषयी व शांतता रक्षणातील तिच्या भूमिकेविषयी जाणून घेतले. शांतता रक्षणाच्या कामी भारताने संयुक्त राष्ट्रांना नेहमीच साहाय्य केल्याचेही आपल्याला समजले. प्रस्तुत प्रकरणात आपण भारत आणि शेजारी राष्ट्रे यांच्या संबंधांचा चिकित्सक आढावा घेणार आहोत. भारतापासून दूरवर असणाऱ्या काही देशांशी भारताचे कशाप्रकारे संबंध आहेत, हेही आपल्याला समजून घ्यायचे आहे.

**चला शोधूया....**

- दक्षिण आशियाच्या नकाशाच्या आधारे भारताच्या सीमारेषा कोणकोणत्या राष्ट्रांशी जोडलेल्या आहेत ते समजून घ्या.
- भारताव्यतिरिक्त इतर कोणत्या राष्ट्रांच्या सीमा एकमेकांशी जोडल्या आहेत ते शोधा.

**भारत आणि शेजारी राष्ट्रे**

भौगोलिक आणि राजकीयदृष्ट्या भारताचे आशिया खंडात महत्वाचे स्थान आहे. भारताच्या




**भारत व शेजारील देश**

शेजारी राष्ट्रांमध्ये अफगाणिस्तान, पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश, म्यानमार, नेपाळ, भूटान, चीन, मालदीव यांचा समावेश होतो. समानता, परस्पर आदर या मूल्यांना भारताच्या परराष्ट्र धोरणात महत्त्व आहे. या मूल्यांना अनुसरूनच भारताने शेजारी राष्ट्रांशी संबंध प्रस्थापित केले आहेत. भारतीय उपखंडात भारत हा आकाराने सर्वांत मोठा देश आहे. तसेच आर्थिक आणि तंत्रज्ञानाच्या दृष्टीने देखील भारत अधिक विकसित आहे. त्यामुळे दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये भारताचा प्रभाव असणे स्वाभाविक आहे.

### भारत आणि पाकिस्तान

१९४७ मध्ये भारताची फाळणी होऊन भारत आणि पाकिस्तान हे दोन स्वतंत्र देश निर्माण झाले.

**भारत-पाकिस्तान :** भारत-पाकिस्तान या दोन्ही देशांच्या संबंधांवर तीन समस्यांचा प्रभाव आहे. (१) दोन्ही राष्ट्रांच्या जागतिक दृष्टिकोनातील फरक (२) काश्मीर समस्या (३) अण्वस्त्रविषयक संघर्ष.

भारत आणि पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांचे जगाकडे पाहण्याचे दृष्टिकोन वेगळे आहेत. भारतीय जागतिक दृष्टिकोनानुसार भारताने शीतयुद्धकालीन लष्करी संघटनांना विरोध केला आणि भारत-पाकिस्तान संघर्ष द्विपक्षीय म्हणजे आपापसात सोडवण्याचा प्रयत्न केला. १९७२ साली करण्यात आलेला 'सिमला करार' या तत्त्वावर आधारलेला होता. याउलट पाकिस्तानने इस्लामी जगताशी आणि चीनशी संबंध राखण्याचा प्रयत्न करून अमेरिकेच्या लष्करी संघटनेत प्रवेश केला.

पाकिस्तानला भारताशी संबंध प्रस्थापित करण्याबाबत काश्मीर हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न वाटतो. पहिले भारत-पाकिस्तान युद्ध काश्मीर प्रश्नावरून १९६५ मध्ये झाले. दोन्ही देशांतील संघर्ष सोडवण्यासाठी १९६६ मध्ये 'ताश्कंद करार' झाला; परंतु त्यातून काही साध्य झाले नाही. १९७१ चे युद्ध हे जरी बांगलादेशाच्या निर्मितीसंबंधी असले तरी त्यासही काश्मीर प्रश्नांची बाजू होती. १९७२ मधील सिमला कराराने भारत आणि पाकिस्तान यांच्यातील परस्पर देवाण-घेवाणीसाठी एक नवा आराखडा तयार केला. १९९९ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात कारगिल क्षेत्रातील पाकिस्तानने केलेल्या घुसखोरीमुळे पुन्हा संघर्ष निर्माण झाला. आजही काश्मीर हेच दोन्ही देशांतील संघर्षाचे कारण आहे. संघर्षाचे स्वरूप मात्र बदलले आहे आणि संघर्षाच्या या नव्या प्रकाराचे वर्णन दहशतवादाची समस्या असे करता येईल.

भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांनी १९९८ मध्ये अणुचाचण्या केल्या आणि त्यामुळे या क्षेत्रात शांतता व सुरक्षिततेसंबंधी नव्या चिंता निर्माण झाल्या आहेत. या दोन्ही देशांत आण्विक संघर्ष होऊ नये असे अनेक राष्ट्रांना वाटते. भारत-पाकिस्तान संबंधातील आणखी एक समस्या म्हणजे सर क्रीक क्षेत्रातील सीमेविषयीचा वाद होय.

दोन्ही देशांनी परस्परांमध्ये संवाद साधण्याचे प्रयत्न केले आहेत; परंतु पाकिस्तान ज्याप्रकारे भारताच्या विरोधात दहशतवाद्यांना पाठिंबा देत आहे आणि दहशतवादी कारवाया घडवून आणत आहे ते पाहता संवादांचे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरत आहेत.

**भारत-चीन :** भारत आणि चीन यांच्यातील संघर्ष दोन प्रश्नांशी निगडित आहे. (१) सीमाप्रश्न आणि (२) तिबेटचा दर्जा. भारत आणि चीन यांच्यात सीमेवरून जो वाद आहे तो अक्साई चीन आणि मॅकमोहन रेषा या क्षेत्रांशी संबंधित आहे. चीनचा दावा आहे की, अक्साई चीन आणि मॅकमोहन रेषेच्या दक्षिणेकडील प्रदेश (अरुणाचल प्रदेश) हा चीनचा भूप्रदेश आहे. मॅकमोहन रेषा ही आंतरराष्ट्रीय सीमारेषा आहे, हे चीन मान्य करत नाही. हा सीमावाद संवादाच्या मार्गाने सुटावा म्हणून भारताने अनेक वेळा प्रयत्न केले. परंतु त्यास फारसे यश आले नाही. १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले.

तिबेट हे पारंपरिकदृष्ट्या एक स्वायत्त क्षेत्र होते. परंतु चीन त्या प्रदेशात आपले लष्करी नियंत्रण सातत्याने वाढवत असल्याने तिबेटच्या दलाई लामा यांनी भारतात राजाश्रय घेतला. ही बाब दोन्ही देशांतील संघर्षाला कारणीभूत ठरली आहे.

चीन आणि पाकिस्तान यांच्यातील मैत्री, चीन पाकिस्तानला करत असलेला शस्त्रपुरवठा आणि क्षेपणास्त्र आणि अण्वस्त्रांचे तंत्रज्ञान यांमुळे भारताच्या सुरक्षेला असणारा धोका अधिकच वाढत आहे. त्यामुळे पाकिस्तान आणि चीन यांची मैत्री तसेच भारताच्या इतर शेजारी राष्ट्रांमध्ये वाढत असलेला चीनचा प्रभाव ही भारतासाठी काळजीची बाब आहे. असे असूनही भारताने चीनशी संबंध सुधारण्याचा कायमच प्रयत्न केला आहे. या दोन देशांमधील सीमाप्रश्न चर्चेच्या माध्यमातून सोडवण्यासाठी संयुक्त कार्यकारी गटाची स्थापना करण्यात आली आहे. चीन आणि भारत या दोघांचाही आर्थिक विकासाचा वेग वाढल्यानंतर दोघांमधील व्यापारी संबंध बळकट होण्यास सुरुवात झाली. दोघांमधील आर्थिक व व्यापारी संबंध सुधारल्यामुळे रशिया, चीन आणि भारत यांच्यातील चर्चेच्या फेऱ्यांमुळे हळूहळू भारत-चीन संबंधात सुधारणा होते आहे. त्यांच्यातील सीमाप्रश्न जरी सुटलेला नसला तरी तो थोडा मागे पडलेला आहे. आणि इतर क्षेत्रांतील संबंधांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

## भारत आणि अन्य शेजारी राष्ट्रे

**अफगाणिस्तान :** अफगाणिस्तानमध्ये राजकीय अस्थिरता मोठ्या प्रमाणावर आहे. तालिबान या दहशतवादी संघटनेचे तेथील वर्चस्व हे त्याला कारणीभूत आहे. अफगाणिस्तानमध्ये शांतता, सुरक्षितता आणि स्थैर्य आणणे, तेथील हिंसाचाराला आळा घालणे, लोकशाही सरकार स्थापन करण्यास मदत करणे यांसाठी भारताने अफगाणिस्तानला मदत देऊ केली आहे. तसेच युद्धामुळे नष्ट झालेल्या दळणवळणाच्या सुविधा निर्माण करणे, रस्तेबांधणी, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्य, शाळा, आरोग्य सुविधा, सिंचन प्रकल्प यांची उभारणी अशा सर्वच क्षेत्रांत भारत अफगाणिस्तानला मदत करत आहे.

**बांगलादेश :** आजचा बांगलादेश म्हणजे पूर्वीचा पूर्व पाकिस्तान. पाकिस्तानच्या निर्मितीच्या वेळी पाकिस्तानची विभागणी पश्चिम व पूर्व पाकिस्तानमध्ये झाली होती. पश्चिम पाकिस्तान व पूर्व पाकिस्तान यांच्यामध्ये भाषिक फरक होता. तसेच अन्य राजकीय संघर्षही होते. त्यातूनच बांगलादेश मुक्ती चळवळीचा उगम झाला. या चळवळीने बांगलादेश पाकिस्तानच्या वर्चस्वापासून मुक्त करण्यात पुढाकार घेतला. बांगलादेश मुक्ती संग्रामात भारताने बांगलादेशीयांना मदत केली होती. बांगलादेशाची निर्मिती १९७१ मध्ये झाली. भारत आणि बांगलादेश यांच्यातील पाणीवाटपासंबंधी व सीमारेषेसंबंधी काही करार झाल्यामुळे त्यांच्यातील संघर्ष संपून आता त्यांच्यातील व्यापारी संबंध अधिक वाढण्यास सुरुवात झाली आहे.

**श्रीलंका :** श्रीलंका या आपल्या शेजारी राष्ट्राशी भारताचे संबंध मैत्रीपूर्ण आहेत. श्रीलंकेतील तमिळ लोक आणि श्रीलंकेचे सरकार यांच्यातील संघर्षामुळे १९८५ नंतर श्रीलंकेत राजकीय अस्थिरता निर्माण झाली होती. त्या वेळी श्रीलंका सरकारच्या मदतीसाठी भारताने शांतिसेना पाठवली होती. सागरी क्षेत्रात सुरक्षेच्या दृष्टीने श्रीलंकेशी असलेले मैत्रीचे संबंध महत्त्वाचे आहेत.

**नेपाळ :** नेपाळ आणि भूटान हे चारी बाजूंनी डोंगरी भूभागाने वेढलेले देश आहेत. त्यांच्या सीमा भारताशी आणि चीनशी जोडलेल्या आहेत. भारत व नेपाळ यांच्यातील मैत्रीपूर्ण संबंधांचा पाया १९५० साली भारत-नेपाळ मैत्री कराराने घातला गेला. या कराराने नेपाळमधील नागरिकांना भारतामध्ये सहज प्रवेशच नव्हे तर सरकारी नोकरी आणि उद्योग करायचा परवाना मिळाला आहे. नेपाळमध्ये राजेशाही होती. १९९० साली नेपाळची लोकशाहीच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. आर्थिक प्रगती, पायाभूत सुविधा, अन्नविषयक गरजा आणि व्यापार यांसाठी आणि ऊर्जेसाठी नेपाळ भारतावर अवलंबून आहे.

नेपाळमधील २०१५ मध्ये झालेल्या भूकंपाच्या वेळी भारताने नेपाळला मदत केली होती.

**भूटान :** भूटानच्या संरक्षणाची जबाबदारी भारतावर आहे. भूटानमध्ये पाण्याचा प्रचंड स्रोत आहे. या पाण्याचा वापर करून मोठ्या प्रमाणावर वीजनिर्मिती करण्याच्या प्रकल्पात भारताने सहकार्य केले आहे.

**म्यानमार :** म्यानमार हे भारताच्या पूर्वेकडे असलेल्या आग्नेय आशियाई राष्ट्रांना भारताशी जोडणारे प्रवेशद्वार आहे. या भागात विकसित होत असलेल्या लोहमार्ग आणि महामार्गामुळे दक्षिण आशिया, मध्य आशिया आणि आग्नेय आशिया एकमेकांशी जोडले जातील. यामुळे या प्रदेशातील व्यापार व आर्थिक देवाण-घेवाण वाढेल.

**माहीत आहे का तुम्हांला?**

**म्यानमार आणि आंग सी क्यू :** म्यानमारमध्ये लष्करी राजवटीविरुद्ध दीर्घकाळ लढा देऊन लोकशाही प्रस्थापित करण्याचे श्रेय आंग सी क्यू यांना दिले जाते. त्यांना शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार मिळाला आहे.

म्यानमारकडून भारताला नैसर्गिक वायूची आयात करता येईल.

**मालदीव :** भारत आणि मालदीव यांच्यातील संबंध सुरुवातीपासूनच मैत्रीपूर्ण आहेत. भारताच्या दक्षिणेला असणारे हे छोटे राष्ट्र अनेक कारणांसाठी भारतावर अवलंबून आहे. १९८१ पासून या दोन राष्ट्रांनी व्यापारी संबंध प्रस्थापित केले आहेत. पायाभूत क्षेत्राचा विकास, आरोग्य, दळणवळण अशा क्षेत्रांमध्ये भारताने मालदीवला मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत केली आहे. २००६ नंतर त्यांच्यामध्ये संरक्षण क्षेत्रातही सहकार्याला सुरुवात झाली आहे. भारताने मालदीवला सुरक्षा व्यवस्था बळकट करण्यासाठी मदत करण्यास सुरुवात केली आहे. अवकाश सहकार्य, ऐतिहासिक वस्तूंचे जतन, पर्यटन या क्षेत्रांत दोन्ही राष्ट्रांनी करार केले आहेत. तसेच दहशतवादासारख्या समस्येशी लढण्यासाठी सहकार्य करायचे ठरवले आहे.

## भारत आणि अमेरिका

भारत आणि अमेरिका ही लोकशाही व्यवस्था असलेली दोन बलाढ्य राष्ट्रे आहेत. अमेरिका सुरुवातीपासूनच भारताचा सर्वांत महत्त्वाचा व्यापारी भागीदार होता. अनेक भारतीय लोक शिक्षण आणि

### दक्षिण आशियाई सहकार्य संघटना – सार्क

सार्क ही दक्षिण आशियाई राष्ट्रांनी १९८५ मध्ये स्थापन केलेली प्रादेशिक संघटना आहे. दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये आर्थिक सहकार्य निर्माण करणे व त्याद्वारे संपूर्ण दक्षिण आशियाचा विकास साधणे हा या संघटनेचा हेतू आहे. सार्क संघटना म्हणजे सर्व दक्षिण आशियाई देशांनी एकत्र येऊन आपल्या समान प्रश्नांची व समान हितांची चर्चा करण्याचे व्यासपीठ होय. दारिद्र्य निर्मूलन, शेतीचा विकास, तंत्रज्ञानातील क्रांती हे दक्षिण आशियाई देशांचे काही समान हितसंबंध आहेत. दक्षिण आशियाई देशांना परस्परांशी व्यापार करणे अधिक सोपे जावे म्हणून सार्कच्या व्यासपीठावर काही महत्त्वाचे करार करण्यात आले. त्यानुसार संपूर्ण दक्षिण आशियाचे एक मुक्त व्यापारक्षेत्र निर्माण करण्याचे ठरवण्यात आले आहे. दक्षिण आशियाई राष्ट्रांच्या समान विकासासाठी दक्षिण आशियाई विश्वविद्यालय यासारख्या संस्था आणि दक्षिण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्र हा करार करण्यात आला आहे.

* सार्क या संघटनेची स्थापना करण्यामागील हेतू कोणता आहे ?
* सार्कमध्ये आज किती सदस्य देश आहेत ?
* दक्षिण आशियाई देशांचे समान हितसंबंध कोणते आहेत ?

नोकरी या निमित्ताने अमेरिकेत जात होते. तेथील या अनिवासी भारतीयांमुळे अमेरिका आणि भारत यांच्यात सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक संबंध वाढत गेले आहेत. शीतयुद्धानंतर भारत आणि अमेरिका यांच्यातील सुरक्षाविषयक संबंध मोठ्या प्रमाणावर वाढले. भारताने मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण स्वीकारल्यानंतर हळूहळू भारताचा आर्थिक प्रगतीचा वेग वाढू लागला. त्याचा परिणाम भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापारी संबंध अधिक दृढ होण्यात झाला.

१९९८ मध्ये भारताने अणुचाचण्या केल्यानंतर काही काळ भारत आणि अमेरिका संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला होता. त्यानंतर हे संबंध सुधारावेत म्हणून भारत आणि अमेरिका यांच्यामध्ये चर्चेच्या अनेक फेऱ्या घेतल्या गेल्या. चर्चेच्या या अनेक फेऱ्यांमधून भारत अण्वस्त्रांचा जबाबदारीने वापर करेल असा अमेरिकेला विश्वास वाटला. त्यानंतर भारत-अमेरिका संबंधांत आमूलाग्र परिवर्तन घडून आले. २००५ मध्ये झालेला संरक्षणविषयक सहकार्याचा करार आणि २००८ मध्ये झालेला आण्विक सहकार्याचा करार हे भारत-अमेरिका संबंधातील महत्त्वाचे टप्पे आहेत. गेल्या ५ वर्षांत भारत आणि अमेरिका यांच्या दरम्यान सर्वच क्षेत्रांत सहकार्याचे संबंध निर्माण झाले आहेत.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

२००५ मध्ये भारत आणि अमेरिका यांच्यातील नागरी अणुसहकार्य कराराला भारताचे तत्कालीन प्रधानमंत्री डॉ.मनमोहन सिंग आणि अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी मान्यता दिली. २००८ मध्ये आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोगाने या कराराला मान्यता दिली. या करारामुळे भारताला इतर देशांकडून आण्विक तंत्रज्ञान मिळणे शक्य झाले आहे.

## भारत आणि रशिया

भारत आणि सोव्हिएत रशिया आणि आताचा रशिया यांच्यात सुरुवातीपासूनच मैत्रीचे संबंध होते. शीतयुद्धाच्या काळात १९७१ मध्ये त्यांच्यात मैत्रीचा करार झाला व त्यातून संरक्षणविषयक तसेच आर्थिक आणि तंत्रवैज्ञानिक सहकार्याला मोठी चालना मिळाली. सोव्हिएत रशियाने भारताला मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि लष्करी मदतही दिली होती.

सोव्हिएत रशियाचे विघटन झाल्यानंतर भारताने रशियाशी संबंध वाढवण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीला रशियातील राजकीय व आर्थिक समस्यांमुळे संबंधांमध्ये फारशी सुधारणा झाली नाही. १९९६ नंतर भारत आणि रशिया यांच्यातील संबंध हळूहळू सुधारू लागले. लष्करी सामग्रीचे उत्पादन, खनिज तेल उत्पादन अशा क्षेत्रांत भारत आणि रशिया यांनी संयुक्त प्रकल्प उभारले आहेत.

## भारत आणि युरोपीय राष्ट्रे

युरोपीय राष्ट्रे आणि भारत यांच्यामध्ये व्यापारी संबंध आहेत. प्रामुख्याने जर्मनी व फ्रान्स ही राष्ट्रे भारतात तंत्रज्ञान क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करतात. याशिवाय भारताला शस्त्रास्त्र निर्मितीचे तंत्रज्ञानदेखील युरोपीय राष्ट्रांकडून मिळते, तर अभियांत्रिकी आणि माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रांत भारत मोठा निर्यातदार देश आहे. खुल्या व्यापारावर भर हे दोघांचेही प्रमुख उद्दिष्ट आहे. याव्यतिरिक्त भारत आणि युरोपियन राष्ट्रे इतर अनेक बाबतींत सहकार्याची भूमिका घेत आहेत. हवामान बदल, स्वच्छ ऊर्जा, संरक्षण उत्पादन, सायबर सुरक्षा, संशोधन, रेल्वे व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन, हवाईसुरक्षा, दहशतवाद या संदर्भात अनेक करार करण्यात आले आहेत. भारताच्या विकासाच्या दृष्टीने हे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे.

**चला, शोधूया...**

* युरोपीय संघाची स्थापना कधी झाली ?
* युरोपीय बाजारपेठ, युरोपीय चलन यांविषयी माहिती मिळवा.

## भारत आणि आफ्रिका खंड

भारत आणि आफ्रिका खंड यांच्यातील सहकार्यासाठी भारताने जाणीवपूर्वक पावले उचलली आहेत. आफ्रिकेशी जवळचे संबंध असणे दोघांच्याही दृष्टीने फायद्याचे ठरणारे आहे. आफ्रिकेतील अनेक देश वेगाने आर्थिक प्रगती करत आहेत. आफ्रिकेत तरुण वर्गाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी मदत करण्याची तयारी भारताने दाखवली आहे. शिक्षण, कौशल्ये, आरोग्य, विज्ञान व तंत्रज्ञान, शेती, पर्यटन अशा सगळ्याच क्षेत्रांत विकास होण्यासाठी भारताने आर्थिक साहाय्य करण्याची, अनुदान देण्याची तयारी दाखवली आहे; तर भारताची ऊर्जेची गरज आफ्रिकेतील ऊर्जासंपन्न देश – इजिप्त, नायजेरिया, अंगोला, सुदान भागवू शकतात. आफ्रिकेबरोबर व्यापार वाढवण्यासाठी भारत प्रयत्नशील आहे.

२०१५ मध्ये झालेल्या भारत आणि आफ्रिका शिखर परिषदेला आफ्रिकेतील सर्व ५४ राष्ट्रांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेत अनेक जागतिक प्रश्नांवर चर्चा केली. उदा., हवामान बदल, दहशतवाद, सागरी चाचेगिरी, इत्यादी.

## भारत आणि इंडो-पॅसिफिक

इंडो-पॅसिफिक क्षेत्रात प्रामुख्याने जपान, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि आग्नेय आशियाई राष्ट्रे यांचा समावेश होता. या सर्वच राष्ट्रांशी भारताचे घनिष्ठ आर्थिक व व्यापारी संबंध आहेत. तेथील अनेक कंपन्यांनी भारतात गुंतवणूक केली आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सामाजिक सुरक्षा, गुन्हेगारांचे हस्तांतरण, अमली पदार्थ तस्करी विरोधातील मोहीम, पर्यटन, कलासंस्कृती या क्षेत्रांत विविध करार करण्यात आले आहेत; तर पायाभूत सुविधा, आर्थिक सहकार्य, संरक्षण, माहिती तंत्रज्ञान, अणुऊर्जा, रेल्वे अशा अनेक क्षेत्रांतील विकासासाठी जपान भारताला सहकार्य करतो. भारताला सागरी क्षेत्राच्या विकासासाठी आणि सुरक्षेसाठी आर्थिक आणि तांत्रिक मदत देण्याचे जपानने मान्य केले आहे. दोन्ही देशांच्या तटरक्षक दल आणि नौदलांमध्ये संयुक्त सराव होत आहेत.

## भारत आणि आग्नेय आशिया

इंडोनेशिया, मलेशिया, सिंगापूर, फिलीपाईन्स, थायलंड, म्यानमार, व्हिएतनाम, लाओस, कंबोडिया आणि ब्रुनेई या आग्नेय आशियातील राष्ट्रांशी भारताचे सुरुवातीपासूनचे सलोख्याचे संबंध आहेत. १९९१ नंतर भारताने आपल्या आर्थिक धोरणात बदल करून मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारली. त्यानंतर आग्नेय आशियाई राष्ट्रांशी असलेल्या व्यापारी संबंधात अधिक वाढ झाली आहे. आग्नेय आशियाई राष्ट्रांशी व्यापार वाढवण्याचे हे धोरण 'पूर्वेकडे पहा' (Look East)म्हणून ओळखले जाते. २०१४ नंतर हे धोरण अधिक सक्रीय करण्यात आले. 'कृती करा' (Act East) म्हणून हे धोरण सध्या ओळखले जाते.

**भारत आणि पश्चिम आशिया :** पश्चिम आशियातील देश प्रामुख्याने खनिज तेल व नैसर्गिक वायूचा पुरवठा करणारे देश आहेत. भारताचे पश्चिम आशियाई राष्ट्रांशी पारंपरिक संबंध आहेत. भारत हा पश्चिम आशियाई राष्ट्रांकडून मिळणाऱ्या खनिज तेलावर अवलंबून आहे. इराण, इराक, बहारीन, कुवेत, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती या राष्ट्रांकडून भारत खनिज तेलाची आयात करतो; तर शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान आपल्याला इस्राएल या राष्ट्राकडून मिळते. त्याचप्रमाणे संरक्षणविषयक आधुनिक सामग्रीदेखील इस्राएलकडून मिळते. शिवाय नोकरी-व्यवसायानिमित्त अनेक भारतीय तेथे राहत आहेत. त्यांचेही आपल्या आर्थिक व्यवस्थेतील योगदान महत्त्वाचे आहे.

सर्व राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध राखणे आणि स्वतःबरोबरच इतर राष्ट्रांचाही विकास होईल यासाठी एकमेकांना मदत करणे हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा प्रमुख उद्देश आहे.

भारत आणि जगातल्या महत्त्वाच्या देशांमधील संबंधांचा थोडक्यात आढावा आपण इथे घेतला. पुढील प्रकरणात आपण काही महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय किंवा जागतिक समस्यांचा अभ्यास करणार आहोत.



## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) भारताशी आंतरराष्ट्रीय सरहद्द खुली असणारा देश -

(अ) पाकिस्तान (ब) बांगलादेश
(क) नेपाळ (ड) म्यानमार

(२) भारताशी तणावपूर्ण संबंध असणारे देश -

(अ) पाकिस्तान व चीन
(ब) नेपाळ व भूटान
(क) म्यानमार व मालदीव
(ड) अफगाणिस्तान व अमेरिका

(३) भारत आणि पाकिस्तान या देशांच्या संबंधांवर प्रभाव असणाऱ्या बाबी -

(अ) दोन्ही राष्ट्रांच्या जागतिक दृष्टिकोनातील फरक
(ब) काश्मीर समस्या
(क) अण्वस्त्रविषयक संघर्ष
(ड) वरील सर्व समस्या

**२. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.**

(१) दक्षिण आशियायी राष्ट्रांमध्ये भारताचे स्थान महत्त्वाचे आहे.
(२) भारत-चीन संबंध मैत्रीपूर्ण आहेत.
(३) श्रीलंका सरकारच्या मदतीसाठी भारताने शांतिसेना पाठवली.

**३. दिलेल्या सूचनेप्रमाणे कृती करा.**

१. पुढील तक्ता पूर्ण करा.

| क्र. | झालेले करार/देवाणघेवाण | संबंधित देश |
|---|---|---|
| १. | ........................ | भारत-पाकिस्तान |
| २. | मॅकमोहन रेषा | ............. |
| ३. | ........................ | भारत-बांगलादेश |
| ४. | नैसर्गिक वायूची आयात | ............. |
| ५. | ........................ | भारत-अमेरिका |
| ६. | पायाभूत क्षेत्रविकास, दळणवळण, आरोग्य | ............. |
| ७. | ........................ | भारत-आफ्रिका |

**४. पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

(१) सिमला करार (२) भारत-नेपाळ मैत्री करार
(३) मॅकमोहन रेषा (४) भारत-अफगाणिस्तान संबंध

**५. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) भारत अमेरिका यांच्यात सहकार्याचे संबंध निर्माण होण्यामागील पार्श्वभूमी विशद करा.
(२) शेजारच्या राष्ट्रांमध्ये लोकशाही प्रस्थापित होण्यासाठी भारताने केलेल्या प्रयत्नांविषयी उदाहरणासह माहिती लिहा.
(३) दक्षिण आशियायी प्रादेशिक सहकार्य संघटना कोणते कार्य करत आहे?

**उपक्रम**

(१) राष्ट्रपती, प्रधानमंत्री यांच्या परराष्ट्र दौऱ्यांची माहिती मिळवा.
(२) विविध देशांच्या 'युथ एक्सचेंज' कार्यक्रमाची माहिती मिळवा.

FGI3H7

# ६ आंतरराष्ट्रीय समस्या

**चला, थोडी उजळणी करूया.**

मागील प्रकरणापर्यंत आपण आंतरराष्ट्रीय व्यवस्थेतील सार्वभौम राज्ये, भारताचे परराष्ट्र धोरण व भारताची सुरक्षा व्यवस्था यांचा अभ्यास केला. संयुक्त राष्ट्रे या आंतरराष्ट्रीय संघटनेची उद्‌दिष्टे अभ्यासली. या पाठात आपण काही महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय समस्यांचा अभ्यास करणार आहोत. काही समस्या या केवळ एकाच देशाच्या राहत नाहीत. त्यांचा परिणाम अनेक देशांवर व काही दिवसांनी जगातल्या सर्व देशांवर होतो. संपूर्ण जगाला भेडसावणाऱ्या या समस्यांना 'आंतरराष्ट्रीय समस्या' असे म्हणतात. आंतरराष्ट्रीय समस्या सोडवण्यासाठी सर्व राष्ट्रांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज असते. मानवी हक्क, पर्यावरण आणि दहशतवाद यांच्याशी संबंधित समस्यांचा या प्रकरणात आपण अभ्यास करणार आहोत. निर्वासितांचे प्रश्नही आता आंतरराष्ट्रीय स्वरूप धारण करत आहेत. त्यामुळे त्याचाही विचार आपण करणार आहोत.

**मानवी हक्क :** मानवी हक्क संकल्पनेचा उगम नैसर्गिक हक्कांच्या संकल्पनेत असल्याचे दिसून येतो. नैसर्गिक हक्क म्हणजे माणूस म्हणून जन्माला आल्यामुळे जे हक्क प्राप्त होतात ते हक्क. तेव्हा मानवी हक्क म्हणजे माणूस म्हणून आणि समाजाचा एक घटक म्हणून जगण्यासाठी आवश्यक असलेले हक्क. अमेरिकन आणि फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मानवी हक्कांचा पुरस्कार करण्यात आला होता. या हक्कांची पूर्तता करण्यासाठी लोकशाही शासन असणे गरजेचे आहे, या विचाराला बळ मिळाले. त्यानंतरच्या काळात युरोपमध्ये अनेक राष्ट्रांनी लोकशाही शासनपद्‌धतीचा आणि संविधानाचा स्वीकार केला. त्यामुळे शासनाच्या अधिकारावर मर्यादा आल्या. नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणे ही शासनाची महत्त्वाची जबाबदारी मानली गेली.

**आंतरराष्ट्रीय व्यवहारात मानवी हक्क या संकल्पनेचा उदय :** संयुक्त राष्ट्रांची स्थापना झाल्यानंतर मानवी हक्कांचा वैश्विक जाहीरनामा तयार करण्यात आला. १० डिसेंबर १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत हा जाहीरनामा बहुमताने मान्य करण्यात आला. त्यानंतर १९६६ मध्ये नागरी आणि राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करार आणि आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांचा करार या दोन करारांना संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने मान्यता दिली. हे दोन करार आंतरराष्ट्रीय कायद्याचा भाग आहेत. या करारांचे पालन करणे सदस्य राष्ट्रांसाठी बंधनकारक आहे.

> मानवी हक्कांमध्ये जीविताचा हक्क, अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या प्रमुख हक्कांचा समावेश होतो. हे हक्क मूलभूत असतात. हे हक्क सर्वांना प्राप्त होतील हे बघणे ही राज्याची जबाबदारी असते.

शीतयुद्‌धाच्या काळात मानवी हक्कांचा प्रश्न संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत अनेक वेळा मांडला गेला. आफ्रिकेतील वर्णद्‌वेष हा मानवी हक्कांच्या विरोधी आहे आणि म्हणूनच वर्णद्‌वेषी राजवटींवर बहिष्कार घालणे हा निर्णय घेण्यात आला. वसाहतींना स्वातंत्र्य, लोकशाही व्यवस्थेचा आग्रह ही त्याचीच काही उदाहरणे सांगता येतील.

आधुनिक काळात वांशिक संघर्ष, सीमावाद, दहशतवाद अशा समस्यांमुळे मानवी हक्कांना मोठ्या प्रमाणावर बाधा पोचते आहे. याशिवाय अनेक जागतिक स्वरूपाचे प्रश्न जसे- साथीचे रोग, पर्यावरणाला असलेला धोका, नैसर्गिक आपत्ती यांमुळे मानवी हक्कांची संकल्पनाही आता अधिक व्यापक झाली आहे. पर्यावरण संरक्षण, शाश्वत

विकास यांचाही समावेश मानवी हक्कांमध्ये केला जातो.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यामध्ये एकूण ३० कलमे आहेत. या जाहीरनाम्यात नागरी स्वातंत्र्यासंबंधीची कलमे आहेत. त्याचप्रमाणे रोजगाराचा अधिकार, समान कामासाठी समान वेतन अशा आर्थिक हक्कांच्या तरतुदीदेखील आहेत. सर्व सदस्य राष्ट्रांनी आपल्या नागरिकांना मानवी हक्क द्यावेत हे अपेक्षित आहे. मानवी हक्कांच्या जाहीरनाम्याप्रमाणेच बालकांच्या हक्कांचा जाहीरनामा २० नोव्हेंबर १९५९ रोजी प्रसृत करण्यात आला.

**मानवी हक्क आणि भारत :** भारतीय संविधानात मानवी हक्कांना मूलभूत हक्कांचे स्थान देण्यात आले आहे. संविधानातील मूलभूत हक्कांबरोबरच दुर्बल घटक, स्त्रिया, अल्पसंख्य यांच्या संरक्षणाची जबाबदारी शासनावर आहे. १९९३ मध्ये मानवी हक्क संरक्षण कायदा करण्यात आला. या कायद्यांतर्गत 'राष्ट्रीय मानवी हक्क आयोग' व



**करून पहा.**

इथे काही समस्या दिल्या आहेत. त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अशा दोन गटांत वर्गीकरण करा.

दुर्बल घटकांचे सक्षमीकरण

सार्वजनिक अस्वच्छता | दहशतवाद

मानवी हक्कभंग | अर्थव्यवस्थेचे खासगीकरण

गरिबी, निरक्षरता | सार्वजनिक वाहतूक कोंडी

ओझोन थर विरळ होणे | अंतर्गत फुटीरतावाद

'राज्य मानवी हक्क आयोग' स्थापन करण्यात आले आहेत. मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्यास त्यासंबंधात तक्रारींची दखल घेणे आणि त्याबाबत योग्य कारवाई करणे ही मानवी हक्क आयोगाची जबाबदारी आहे.

**सांगा पाहू !**

सध्या भारतीय मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष कोण आहेत ?

**पर्यावरण :** सद्यकाळात मानवी हक्कांची संकल्पना अधिक व्यापक झाली असून सुरक्षित पर्यावरण हा एक महत्त्वाचा मानवी हक्क आहे असे मानले जाते. आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरण संरक्षणाची जाणीव आणि गरज १९७० मध्ये मांडली गेली. मोठ्या प्रमाणावर होत असलेले औद्योगिकीकरण, वाढत चाललेली ऊर्जेची गरज यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण होतो आहे असे पर्यावरणाचा अभ्यास करणाऱ्या विशेषज्ञांचे मत होते. त्या कार्यकर्त्यांनी २२ एप्रिल १९७० मध्ये पहिला वसुंधरा दिवस साजरा केला. शेतीत मोठ्या प्रमाणावर वापरली जाणारी रासायनिक खते आणि कीटकनाशके, वाहनांमुळे होणारे ध्वनीप्रदूषण, अणुऊर्जा भट्ट्यांमधून होणारा किरणोत्सर्ग, तेलगळती किंवा रासायनिक वायूंची गळती या सर्वांमुळे पर्यावरण असुरक्षित बनते आणि विविध समस्या निर्माण होतात. या जाणिवेतून पर्यावरण सुरक्षा हा प्रश्न आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चिला जाऊ लागला.

१९९० नंतर जागतिकीकरणाची लाट आल्यानंतर राष्ट्रांचे परस्परावलंबन वाढले आणि त्यामुळे पर्यावरणीय समस्या सोडवण्यासाठी राष्ट्रांनी परस्परांना सहकार्य करण्याची गरज निर्माण झाली. वातावरण प्रदूषित झाल्यामुळे किंवा तेलाच्या आणि वायुगळतीमुळे पर्यावरणाला निर्माण होणारा धोका हा एका राष्ट्रापुरता मर्यादित राहत नाही. तसेच त्याचे परिणाम दीर्घकालीन असतात. त्यामुळे या परिणामांवर उपाययोजना करण्यासाठी राष्ट्रांना एकत्र येऊन

सहमतीने व सहकार्याने वागणे गरजेचे ठरते.

वनस्पती व प्राणी यांच्या प्रजाती नष्ट होणे, मातीचा कस कमी होणे, पाण्याची टंचाई, पावसाचे प्रमाण कमी-जास्त होणे, तापमान वाढ, नद्या, तलाव आटणे, नद्या व समुद्राचे प्रदूषण, नवीन रोगांची निर्मिती, आम्लपर्जन्य, ओझोन थराचे विरळ होणे हे पर्यावरण ऱ्हासाचे दृश्य परिणाम आहेत. यांपैकी काही परिणाम हे विशिष्ट राष्ट्रापुरते मर्यादित असले तरी त्यांच्या दीर्घकालीन परिणामांमुळे त्या प्रश्नांना जागतिक स्वरूप प्राप्त होते, तर काही प्रश्न मुळातच जागतिक स्वरूपाचे असतात.



**पर्यावरणाचे रक्षण : एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे**

**करून पहा.**

✻ विशिष्ट राष्ट्रापुरत्या मर्यादित असलेल्या पण जागतिक स्वरूपाचे प्रश्न निर्माण करणाऱ्या पर्यावरणीय समस्यांची उदाहरणे द्या.

**करून पहा.**

इंटरनेटच्या साहाय्याने पॅरिस परिषदेविषयी जाणून घ्या व खालील मुद्द्यांच्या आधारे माहिती संकलित करा.

✻ सहभागी देशांची संख्या
✻ चर्चेचे विषय
✻ भारताने उपस्थित केलेले मुद्दे.

## स्टॉकहोम ते पॅरिस परिषद

आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरणविषयक तत्कालीन आणि दीर्घकालीन समस्यांविषयी चर्चा करण्यासाठी व त्यांच्यावर उपाय शोधण्यासाठी स्टॉकहोम येथे ५ ते १६ जून १९७२ या कालावधीत संयुक्त राष्ट्रांची मानवी पर्यावरणविषयक परिषद भरवली गेली.

- या परिषदेमध्ये प्रदूषणावर मात करण्यासाठी सहकार्य करणे ही सर्व राष्ट्रांची जबाबदारी आहे, यावर भर देण्यात आला.
- विकसित देश पर्यावरण ऱ्हासास अधिक प्रमाणात कारणीभूत आहेत आणि तो ऱ्हास थांबवण्याची जबाबदारी त्यांनी घ्यावी अशी भूमिका विकसनशील राष्ट्रांनी घेतली. आजही विकसनशील राष्ट्रे हीच भूमिका मांडतात.
- या परिषदेत पर्यावरणासाठी काम करणाऱ्या बिगर शासकीय संस्था उपस्थित होत्या, हे या परिषदेचे आणखी एक वैशिष्ट्य होय.
- या परिषदेत जागतिक सामाईक संपत्तीच्या रक्षणाचा मुद्दा मांडला गेला. या साधनांच्या जतनाची जबाबदारी सर्व राष्ट्रांची आहे, यावर एकमत झाले.
- या परिषदेनंतरच संयुक्त राष्ट्रे या संघटनेने 'संयुक्त राष्ट्रे पर्यावरण कार्यक्रम' निर्माण केला.
- या परिषदेनंतर अनेक आंतरराष्ट्रीय पर्यावरणविषयक करार झाले. पर्यावरण संरक्षणासंबंधी नियम तयार झाले. आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय स्तरावर पर्यावरणविषयक चळवळी मोठ्या प्रमाणात सुरू झाल्या आणि पर्यावरणविषयक आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये निर्णयप्रक्रियेतील बिगर शासकीय संघटनांचा सहभाग वाढला.
- याचा पुढचा टप्पा म्हणजे १९९२ मध्ये झालेली रिओ येथील पर्यावरण परिषद. या परिषदेत 'शाश्वत विकास' या संकल्पनेवर भर देण्यात आला. जैविक विविधता, हरितगृह वायूंमुळे होणारे वातावरणातील बदल, जंगलांचे रक्षण इत्यादी विषयांवर विविध करार करण्यात आले.

१९९७ मध्ये क्योटो येथे भरलेल्या परिषदेत विकसित देशांना हवामान बदल रोखण्यासाठी मापदंड आखून दिले गेले. ते मापदंड १५ वर्षांसाठी लागू होते.

त्यानंतर नोव्हेंबर २०१५ मध्ये पॅरिस येथे हवामान बदल या विषयावर परिषद भरवली गेली. सर्व राष्ट्रांनी हवामान बदल रोखण्यासाठी व तापमान वाढ रोखण्यासाठी परस्पर सहकार्याने प्रयत्न करावेत व विकसनशील देशांना त्यासाठी लागणारे तंत्रज्ञान मिळवण्यास विकसित देशांनी मदत करावी असे आवाहन या परिषदेत करण्यात आले.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

महासागर, खोल समुद्र तळ, वातावरण, बाह्य अवकाश, जनुकीय साधनसंपत्ती यांचा समावेश जागतिक साधनसंपत्तींमध्ये होतो. ही संपत्ती जगातील सर्व राष्ट्रांची असल्यामुळे सर्व राष्ट्रांनी तिची देखभाल करणे अपेक्षित आहे.

**दहशतवाद :** ही आजच्या काळातील एक मोठी समस्या आहे. जगातील अनेक राष्ट्रांना या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. जगातील कोणतेही राष्ट्र केवळ स्वबळावर दहशतवादाचा सामना करण्यास असमर्थ आहे. म्हणूनच दहशतवाद ही जागतिक समस्या मानली जाते.

### दहशतवाद म्हणजे काय ?

राजकीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सर्वसामान्य आणि निरपराध नागरिक व्यवस्थेच्या विरोधात हिंसेचा वापर करणे किंवा तशी धमकी देणे आणि त्यायोगे समाजामध्ये भीती आणि दहशत पसरवणे याला 'दहशतवाद' असे म्हणता येईल. दहशतवाद ही संघटित आणि नियोजनबद्ध पद्धतीने केलेली हिंसा होय.

दहशतवादाचा आंतरराष्ट्रीय राजकारणावर दूरगामी परिणाम झाला आहे. गेल्या दोन दशकांत विविध राष्ट्रांमध्ये दहशतवादी संघर्ष तीव्र झालेला दिसतो. दहशतवादी संघर्ष हे पारंपरिक युद्धापेक्षा वेगळे असतात. पारंपरिक युद्धे हा दोन किंवा अधिक सार्वभौम राष्ट्रांमधला संघर्ष असतो. अशा युद्धांमध्ये प्रामुख्याने राष्ट्रांच्या भौगोलिक सीमांच्या सुरक्षेला महत्त्व असते, म्हणजेच राष्ट्रीय सुरक्षा भौगोलिक सीमांशी निगडित असते; तर दहशतवादी गट जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातून कुठल्याही ठिकाणी हिंसाचार घडवू शकतात. दहशतवादी हल्ल्याचा उद्देश भौगोलिक सीमांना धोका पोहचवणे हा नसून देशातील राजवटीला आव्हान देणे किंवा शासनाचे अस्तित्व नाकारणे हा असतो. म्हणजेच वाढत्या दहशतवादामुळे देशाच्या बाह्य सुरक्षेबरोबरच अंतर्गत सुरक्षेलादेखील धोका निर्माण होतो.

दहशतवादाला आळा घालण्यासाठी विविध राष्ट्रांच्या सुरक्षा यंत्रणांनी परस्पर सहकार्याने काम करणे आवश्यक झाले आहे.

**शोधा पाहू !**

* सिरिया या राष्ट्रातून अनेक लोक निर्वासित का होत आहेत ?
* जगातील आणखी कोणत्या राष्ट्रांमधून निर्वासितांचे लोंढे येत आहेत ?

**निर्वासितांचे प्रश्न :** ज्या व्यक्तींना अनिच्छेने किंवा जबरदस्तीने आपली मातृभूमी सोडावी लागते व आश्रय मिळवण्यासाठी किंवा सुरक्षिततेसाठी दुसऱ्या राष्ट्रात जाणे भाग पडते, अशा लोकांना 'निर्वासित' असे म्हटले जाते. विशिष्ट वंश, धर्म असलेल्या लोकांचा छळ होणे किंवा त्यांना हाकलून देणे, युद्ध किंवा आपत्तीमुळे आपल्या देशाचा त्याग करण्यास भाग पडणे, इत्यादींमुळे लोक निर्वासित होतात. अशा परिस्थितीत आपला देश सोडून दुसऱ्या राष्ट्राकडे आश्रय मागण्याची वेळ येते.

दुसऱ्या महायुद्धापूर्वी जर्मनीमध्ये ज्यू लोकांचा छळ झाला, त्यांचे नागरिकत्व व संपत्ती हिरावून घेतली गेली. त्यामुळे ज्यू लोक निर्वासित झाले. १९७१ मध्ये पूर्व पाकिस्तानातील जनतेचा राजकीय व धार्मिक छळ झाल्यामुळे तेथील लोक निर्वासित झाले आणि भारतात आश्रयाला आले. गेल्या काही वर्षांत इराक आणि सिरीयामधील युद्धजन्य परिस्थितीमुळे तेथून मोठ्या प्रमाणावर लोक निर्वासित म्हणून बाहेर पडत आहेत. निर्वासितांची अशी अनेक उदाहरणे आपल्याला सांगता येतील.




**निर्वासितांना संयुक्त राष्ट्रांचे साहाय्य**

कोणत्याही राष्ट्रातील लोकांना जेव्हा निर्वासित व्हायची म्हणजे आपला देश सोडायची वेळ येते तेव्हा त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. महत्वाची समस्या असते ती आपला देश सोडून कुठे जायचे ? आणि ते राष्ट्र आपल्याला स्वीकारेल का ? हे प्रश्न त्यांच्यासमोर असतात. दुसरे म्हणजे आपल्याबरोबर कुटुंबातील माणसांना सुरक्षितपणे घेऊन जाणे. याचा प्रचंड शारीरिक आणि मानसिक ताण असतो. याशिवाय कठीण रस्ता, लपूनछपून जाणे, नैसर्गिक समस्या जसे ऊन, पाऊस, वादळवारा, अन्नधान्याची टंचाई, आजारपण, पाठलाग करणारा शत्रू इत्यादी समस्या असतातच. यामध्ये अनेक लोक मृत्यू पावतात.

सुरक्षित ठिकाणी पोहचल्यावर नवीन समस्या असतात. कामधंदा शोधणे, राहण्यासाठी जागा आणि इतर रोजचे प्रश्न यांना तोंड द्यावे लागते. दुसऱ्या राष्ट्रातील भाषा, संस्कृती भिन्न असेल तर त्याच्याशी जुळवून घेण्यात अडचणी येतात. ज्या राष्ट्रात निर्वासित आश्रय घेतात तेथील समाज त्यांना स्वीकारेलच, असे सांगता येत नाही. उलट निर्वासितांची संख्या वाढल्यामुळे राष्ट्रावरचा बोजा अधिक वाढतो. जीवनावश्यक वस्तूंची टंचाई निर्माण होते, गुन्हेगारीचे प्रमाण वाढते, महागाई वाढते. स्थानिकांच्या नोकऱ्यांवर गदा येते, शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. अशा अनेक समस्या निर्माण होतात. त्यामुळे निर्वासितांना आसरा देण्यास आणि त्यांचे पुनर्वसन करण्यास अनेक राष्ट्रे तयार होत नाहीत.

निर्वासितांच्या बाबतीत आंतरराष्ट्रीय स्तरावर १९५१ मध्ये काही तरतुदी करण्यात आल्या. त्यानुसार निर्वासितांना त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्या मूळच्या देशात परत पाठवता येणार नाही, अशी तरतूद केली गेली. त्याचप्रमाणे त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या उच्च आयुक्तांचे कार्यालयही स्थापन करण्यात आले आहे.

मानवी हक्कांची जोपासना व त्यांचे संवर्धन सर्वच राष्ट्रांनी केल्यास अन्याय, शोषण व हिंसाचार कमी होईल. सर्व लोकांना सुरक्षितपणे आपला विकास साधता येईल. पर्यावरणाचे रक्षण करून आणि दहशतवादाचे संपूर्ण निर्मूलन केल्यास मानवी हक्क अधिक प्रभावीपणे अमलात आणता येतील. जगात कोणत्याच लोकसमूहाला निर्वासित व्हावे लागणार नाही. यासाठी प्रयत्न झाल्यास मानवी असुरक्षितता दूर होईल. यासाठी सर्व राष्ट्रांनी एकत्र येणे, आपल्यातील सहकार्य वाढवणे, ठोस कृती करणे व प्रत्यक्षात बदल घडवून आणणे इत्यादी प्रयत्न केले पाहिजेत.

पुढील वर्षी आपण या आधारे स्वतंत्र भारताने कोणती वाटचाल केली आहे याचा अभ्यास करणार आहोत.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण लिहा.**

(१) पुढीलपैकी कोणती समस्या आंतरराष्ट्रीय स्वरूपाची आहे.
- (अ) महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद
- (ब) कावेरी पाणीवाटप
- (क) निर्वासितांचे प्रश्न
- (ड) आंध्र प्रदेशातील नक्षलवाद

(२) पुढीलपैकी कोणत्या हक्काचा समावेश मानवी हक्कांमध्ये होत नाही.
- (अ) रोजगाराचा अधिकार
- (ब) माहितीचा अधिकार
- (क) बालकांचे अधिकार
- (ड) समान कामासाठी समान वेतन

(३) पुढीलपैकी कोणता दिन आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा केला जातो ?
- (अ) शिक्षक दिन
- (ब) बालदिन
- (क) वसुंधरा दिन
- (ड) ध्वजदिन

**२. पुढील विधाने चूक का बरोबर हे सकारण स्पष्ट करा.**

(१) पर्यावरणीय ऱ्हासावर उपाययोजना शोधण्यासाठी सर्व राष्ट्रांनी सहकार्य करणे गरजेचे आहे.

(२) निर्वासितांना आश्रय देण्यास राष्ट्रे तयार होतात.

**३. पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

(१) मानवी हक्क (२) पर्यावरणीय ऱ्हास
(३) दहशतवाद

**४. दिलेल्या सूचनेप्रमाणे कृती करा.**

पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.

पर्यावरणीय ऱ्हास

**कारणे**
१.
२.
३.
४.

**दृश्य परिणाम**
१.
२.
३.
४.

**उपाययोजना**
१.
२.
३.
४.

**५. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) मानवी हक्क प्रस्थापित करण्यातील भारताची भूमिका स्पष्ट करा.

(२) दहशतवादामुळे काय परिणाम होतात हे सांगून दहशतवादाला आळा घालण्यासाठी उपाय सुचवा.

### उपक्रम


(१) राज्य बालहक्क आयोगाची माहिती शिक्षकांच्या मदतीने मिळवा.

(२) चीनमधील 'चिमणी मारो' आंदोलन आणि भारतातील 'चिपको आंदोलन' यांची माहिती मिळवा.

(३) मोठ्या धरणामुळे समस्या निर्माण होतात का ? तुमचे मत लिहा.


(४) शाळेत साजरा झालेल्या वसुंधरा दिनाचा अहवाल लिहा.

FGRYXU




































- पाठ्यपुस्तक मंडळाची वैशिष्ट्यपूर्ण पाठ्येत्तर प्रकाशने.
- नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांच्या साहित्याचा समावेश.
- शालेय स्तरावर पूरक वाचनासाठी उपयुक्त.

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५








महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

इतिहास व राज्यशास्त्र इ. ९ वी (मराठी माध्यम)

₹ ५४.००